श्री स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय

देवगड

# रसराज

१९८८–८९

## श्री स. ह. केळकर महाविद्यालय



कनिष्ठ विभागाची नूतन वास्तू

शिक्षण विकास मंडळाचे

## श्री सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड

# रसराज वार्षिक

## १९८८-८९

### अंक ९ वा

संपादक मंडळ

**प्राचार्य आर. ए. कुलकर्णी** – अध्यक्ष

**प्रा. विनायक पाटील** – कार्यकारी संपादक

सहाय्यक संपादक

| वरिष्ठ विभाग | कनिष्ठ विभाग |
| --- | --- |
| प्रा. आनंद जरग | प्रा. लता वळसंगकर |
| प्रा. वसंत कांबळे | प्रा. हेमंत चव्हाण |

★ संपादन सहाय्य ★

| वरिष्ठ विभाग | कनिष्ठ विभाग |
| --- | --- |
| संजय कुळकर्णी | अजीत पुरळकर |
| रत्नकांत पवार | दया खाडिलकर |
| विनायक ठाकूर | मंदार जोशी |
| संजय पांचाळ | मधुबाला मुणगेकर |
| संजीवनी शिरसाट | |

## श्री सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड

# स्थानिक नियामक समिती

वरिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. वसंतराव साटम | अध्यक्ष |
| २) | ,, अमृतराव राणे | सदस्य |
| ३) | ,, भा. गो. पाटणकर | ,, |
| ४) | ,, गु. शां. शिरसाट | ,, |
| ५) | ,, द. बा. भिडे | ,, |
| ६) | ,, स. ज. पारकर | ,, |
| ७) | ,, डॉ. अरुण खाडिलकर | ,, |
| ८) | प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | कार्यवाह |
| १०) | प्रा. भारत भोसले | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ९) | प्रा. सुरेश सोनटक्के | ,, |
| ११) | ,, एम्. व्ही. लेले | कर्मचारी प्रतिनिधी |

कनिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. वसंतराव साटम | अध्यक्ष |
| २) | ,, अमृतराव राणे | सदस्य |
| ३) | ,, भा. गो. पाटणकर | ,, |
| ४) | ,, गु. शां. शिरसाट | ,, |
| ५) | प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | कार्यवाह |
| ६) | प्रा. प्रकाश उपाध्ये | शिक्षक प्रतिनिधी |

---


'रसराज' वार्षिकांकाच्या स्वामित्वाबद्दल व तपशीलाबद्दल निवेदन व नमुना ४– ( नियम ८ )

| | |
|---|---|
| १) प्रकाशन स्थळ | श्री. स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड |
| २) प्रकाशन कालावधी | वार्षिक |
| ३) मुद्रकाचे नांव | श्री. पद्माकर पां. गोगटे |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | अमेय प्रिंटिंग प्रेस जामसंडे, देवगड |
| ४) प्रकाशकाचे नांव | प्राचार्य आर. ए. कुलकर्णी |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | श्री. स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड |
| ५) संपादकाचे नांव | प्रा. विनायक पाटील |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | श्री. स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड |
| ६) नियतकालिकाची मालकी | श्री. स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड |

★ वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.
★ या अंकातील लेखकांच्या मतांशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही
★ केवळ खाजगी वितरणासाठी

आर. ए. कुलकर्णी
प्रकाशकाची सही

# अंतरंग

**चित्रमुद्रा**–मास ॲडव्हरटायझींग, कोल्हापूर **छाया**– रामदास छाया कलागृह, देवगड

## वरिष्ठ विभाग

### मराठी विभाग


| | | |
|---|---|---|
| ज्ञानपीठ सन्मानित ‘ कुसुमाग्रज ’ | संजय कुळकर्णी | १ |
| कुसुमाग्रजांच्या काव्यातील सामाजिक जाणीव | शोभा जोशी | ४ |
| कुसुमाग्रजांचे ‘ पृथ्वीचे प्रेमगीत ’ | गणेश सावंत | ८ |
| ‘ कवी ’ मंगेश पाडगांवकर | शोभा जोशी | १० |
| दूरदर्शन रामायण मालिका : एक दृष्टिक्षेप | विनायक ठाकूर | १३ |
| धर्म आणि लोकशाही | रघुनाथ चव्हाण | १७ |
| २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावरील भारत | अनिषा वेलणकर | १९ |


प्रवास वर्णन


| | | |
|---|---|---|
| १) पुण्यभूमी । गोमंतभूमी ।। | संजीवनी शिरसाट | २१ |
| २) ‘ दक्षिण भारत सहल ’ | रवींद्र करंदिकर | २४ |
| वारस (कथा) | कल्पना बापट | २५ |


### कविता


| | | |
|---|---|---|
| जीवन | संजू वायंगणकर | २८ |
| सायंकाळ | संजू वायंगणकर | २८ |
| कैदी | रघुनाथ चव्हाण | २८ |
| ऱ्हास | प्रकाश पाटणकर | २९ |
| प्रवासी | रघुनाथ चव्हाण | २९ |
| रणकंद | दत्तात्रय प्रभू | ३० |
| आयुष्य | रोहिदास गांवकर | ३० |
| राष्ट्रप्रेम | मंगला राणे | ३१ |
| माझे गणित | भालचंद्र तारी | ३१ |
| काय करु ? | ज्योत्स्ना मांजरेकर | २ |
| अपेक्षा | श्रीकांत मिठबांवकर | ३२ |
| विचारीन म्हणते– प्रश्न एक ! | संध्या मराठे | ३२ |
| हे स्नेहसंमेलन की वैरसंमेलन ? (विशेष लेख) | शरद गोडबोले | ३३ |

### English Section


| | | |
|---|---|---|
| Satanic Verses – Democracy and Religious Fundamentalism | Manojkumar Khadye | ३५ |
| Satyajit Ray– The Recipient of 'Legion of Honour' | Sangita Koyande | ३८ |
| Jane Eyre– A Study | Neeta Kale | ४० |
| Human Sacrifice : Superstitions and Scientific attitude | Sangita Nene | ४२ |
| Moon– The Stepping stone | Babaji Haram | ४५ |


### Poems


| | | |
|---|---|---|
| The Mind | Shrikant Mithbaonkar | ४८ |
| Oh ! My Life ! | Shrikant Mithbaonkar | ४८ |
| What is Life? | Ed. Kalpana Bapat | ४८ |


## कनिष्ठ विभाग

### मराठी विभाग


| | | |
|---|---|---|
| मातृभाषेचे शिक्षणातील महत्व | वैशाली जोईल | ४९ |
| फिल्मी दुनियेचा राजा– राजकपूर | महेश जावकर | ५० |
| बलशाली भारताच्या माझ्या कल्पना | रेखा मिठबांवकर | ५२ |
| आम्हाला असे शिक्षण हवे ! | गीता गोखले | ५३ |
| 'आव्हान' चे आवाहन | स्मिता सोमण | ५७ |
| आघात | मधुबाला मुणगेकर | ५९ |


### कविता


| | | |
|---|---|---|
| पण का ...... ? | मधुबाला मुणगेकर | ६२ |
| न्याय | संतोष कोयंडे | ६२ |
| श्रावण आला | राजेश आंबेरकर | ६३ |
| कशासाठी ...... ? | अशोक मसुरकर | ६३ |
| मुंबयचो झिलगो | गणेश राणे | ६४ |
| ते फूल | प्रमोद कोयंडे | ६४ |
| मृगदिन | सत्यवान घाडी | ६५ |
| निसर्गलीला | विद्याधर जोशी | ६५ |


### English Section


| | | |
|---|---|---|
| The place of English in India Today | Daya Khadilkar | ६६ |
| Non– Violence | Rajashree Velankar | ६८ |
| The Importance of Trees | Prasad Gothoskar | ७० |

# संपादकीय

रसिक मित्रहो,

' रसराज ' चा वार्षिक अंक आपणास मोठ्या अभिमानाने सादर करीत आहोत. देवगडसारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कला व साहित्यगुणांचा आविष्कार म्हणजे 'रसराज'! म्हणूनच रसिकजनांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या मर्यादा लक्षात घेऊन या अंकाचे मूल्यमापन करावे, असे प्रथमतःच नम्रपणे सांगावेसे वाटते. ' रसराज ' च्या गौरवशाली परंपरेला साजेसाच अंक प्रतिकूल परिस्थितीतही देण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न असतो.

शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडाक्षेत्रात महाविद्यालयाने यावर्षीही अभिमानास्पद कामगिरी बजावली. बारावी व पदवी परिक्षेत आमचे विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याची परंपरा आहेच. पण सतत तिसऱ्यांदा आमच्या महाविद्यालयाने विद्यापीठाच्या परीक्षेत वरचा क्रमांक मिळविण्याचा विक्रम केला. १९८८ च्या विद्यापीठ परीक्षेत इतिहास विभागात कु. भारती नार्वेकर ही विद्यार्थिनी द्वितीय आली. सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील सर्वच यशदायी घटनांचा आढावा ' वाटचाल ' या सदरात घेतलेला आहेच. कनिष्ठ विभागातील इंग्रजी विषयाचे प्रा. हेमंत चव्हाण यांनी शिवाजी विद्यापीठाची एम्. फील. ही पदवी प्राप्त केली. इतरही काही प्राध्यापक एम्. फील., पी. एच्. डी. साठी संशोधन करीत आहेत. महाविद्यालयाने विज्ञान विभाग सुरु करण्याचा संकल्प यापूर्वीच सोडला होता. त्याची परिपूर्ती आज झाली आहे हे सांगण्यास मला आनंद वाटतो. विज्ञान विभागासाठी मुख्य इमारतीनजीकच प्रयोगशाळा व इतर सुविधासह एक भव्य वास्तू बांधली असून यावर्षी ११ वी शास्त्रचा वर्ग सुरु झाला आहे. क्रमशः पदवीपर्यंतचे शिक्षण ह्या विज्ञान वास्तूमध्ये उपलब्ध करुन देण्याचा निश्चय महाविद्यालयाने केला आहे. त्याचप्रमाणे ग्रंथालय, सभागृह व प्राध्यापकांसाठी निवासगृहे ही स्वप्नेही लवकरच साकार होतील अशी आशा करुया.

महाविद्यालयाची ही यशोगाथा चाळतानाच एका गोष्टीचे अत्यंत दुःख वाटते. ते म्हणजे, आमच्या संस्थेचे उपाध्यक्ष व आश्रयदाते श्री. कृष्णाजी जयराम ठाकूर व कनिष्ठ विभागातील एक तरुण प्राध्यापक पी. एस्. निलाखे यांचे दुःखद निधन झाले. महाविद्यालयातर्फे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

हा अंक दर्जेदार होण्यासाठी ' I know what is new' हा मूलमंत्र जपलेले आमचे प्राचार्य आर. ए. कुलकर्णी यांचे डोळस मार्गदर्शन आम्हास नेहमीच मिळते. त्याचप्रमाणे या अंकासाठी साहित्यनिर्मिती करणारे नवोदित विद्यार्थी साहित्यिक, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व जामसंडे येथील अमेय प्रिंटिंग प्रेस यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्यांचे आम्ही ऋणी आहोत.

**प्रा. विनायक पाटील**

श्री सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड

# विद्यार्थी महामंडळ १९८८- ८९

## वरिष्ठ विभाग

| | | |
|---|---|---|
| १) | जनरल सेक्रेटरी | शरद गोडबोले |
| २) | विद्यार्थिनी प्रतिनिधी, आस्वाद व विविधा. | संगीता नेने |
| ३) | क्रीडा विभाग | प्रकाश पाटणकर |
| ४) | 'रसराज' भित्तीपत्रक | संजय कुळकर्णी |
| ५) | सांस्कृतिक मंडळ | संदीप फडके |
| ६) | सहल, प्लॅनिंग फोरम | संजय धुरी |
| ७) | इतिहास मंडळ, वाङ्मय मंडळ व भूगोल मंडळ | विद्याधर राणे |
| ८) | निसर्ग मित्रमंडळ | शरद गोडबोले<br>संगीता नेने |

## कनिष्ठ विभाग

| | | |
|---|---|---|
| १) | जनरल सेक्रेटरी | श्यामसुंदर जोशी |
| २) | विद्यार्थिनी प्रतिनिधी | गीता मेस्त्री |
| ३) | सांस्कृतिक मंडळ व 'रसराज' भित्तीपत्रक | अजित पुरळकर |
| ४) | वाङ्मय, आस्वाद, विविधा | श्यामसुंदर जोशी<br>गीता मेस्त्री |
| ५) | क्रीडा विभाग | नागेश मणचेकर |
| ६) | सहल | श्रीकृष्ण गीरकर |
| ७) | प्लॅनिंग फोरम | महेंद्र पिसे |
| ८) | विज्ञान मंडळ | विपुल शहा |

शिक्षण विकास मंडळ, देवगड

## नियामक समिती

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. शां. कृ. पंतवालावलकर | अध्यक्ष |
| २) | ,, अ. अ. नलावडे | उपाध्यक्ष |
| ३) | ,, रा. गो. मिराशी | ,, |
| ४) | ,, व. स. साटम | कार्यवाह |
| ५) | ,, गु. शां. शिरसाट | सहकार्यवाह |
| ६) | ,, भा. गो. पाटणकर (भाऊसाहेब केळकर यांचे प्रतिनिधी) | ,, |
| ७) | ,, अ. ग. राणे | सभापती, नियामक समिती |
| ८) | ,, डॉ. अ. रा. खाडिलकर | कोषाध्यक्ष |
| ९) | ,, स. ज. पारकर | सदस्य |
| १०) | ,, य. द. राणे | ,, |
| ११) | ,, ह. अ. नलावडे | ,, |
| १२) | ,, ल. य. कोयंडे | ,, |
| १३) | ,, डॉ. मा. रा. नेने | ,, |
| १४) | ,, य. ग. पोकळे | ,, |
| १५) | ,, स. भि. जामसंडेकर | ,, |
| १६) | ,, रा. धों. पाटणकर | ,, |
| १७) | ,, द. बा. भिडे | ,, |
| १८) | ,, डॉ. के. एन्. बोरफळकर | ,, |
| १९) | ,, आ. ल. गोरे | ,, |
| २०) | ,, रा. वि. कदम | ,, |
| २१) | ,, ना. बा. तेली | ,, |
| २२) | ,, डॉ प्र. वा. आपटे | ,, |
| २३) | ,, प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | निमंत्रित |
| २४) | ,, आ. गो. बांबुळकर | ,, |
| २६) | ,, श. ज. कुलकर्णी | ,, |
| २५) | प्राचार्या सौ. प्र. रा. राजेशिर्के | ,, |

# प्राध्यापक वर्ग १९८८-८९

## वरिष्ठ विभाग

१) प्राचार्य आर. ए. कुलकर्णी इंग्रजी, मराठी
२) प्रा. पुरुषोत्तम शां. गोठोस्कर इंग्रजी
३) ,, ल. दा. गोलतकर इतिहास
४) ,, मधुकर म. गावडे भूगोल
५) ,, हेरंब ल. पटवर्धन अकौंटन्सी
६) ,, सुरेश मु. सोनटक्के अर्थशास्त्र
७) ,, दत्तात्रय बा. बलवान कॉमर्स
८) ,, भारत ना. भोसले संख्याशास्त्र
९) ,, अरुण श्री. गोगटे कायदा
१०) ,, श्रीकृष्ण शं. बोराटे भूगोल
११) ,, एम्. व्ही. पाटील कॉमर्स
१२) ,, विनायक अ. पाटील इतिहास
१३) ,, शिवाजी शा. पाटील अर्थशास्त्र
१४) ,, आनंद शं. जरग इंग्रजी
१५) ,, आर. जी. जाधव अर्थशास्त्र
१६) ,, वसंत भा. कांबळे मराठी
१७) ,, विजय श्री. काजळे ग्रामीण विकास
१८) ,, प्रकाश ग. पाटील ग्रामीण विकास

## कनिष्ठ विभाग

१) प्रा. प्रकाश म. उपाध्ये इंग्रजी
२) ,, श्याम सा. पाटील कॉमर्स
३) ,, बजरंग म. माळी इतिहास
४) ,, माणिकराव ग. शिर्के कॉमर्स
५) ,, प्रवीण बी. सकटे भूगोल
६) ,, लता वळसगकर मराठी
७) ,, बी. एस्. पोवार भूगोल
८) ,, मोरेश्वर ना. जोशी कॉमर्स
९) ,, पी. बी. पाटील अर्थशास्त्र
१०) ,, दीपक बी. पाटील अर्थशास्त्र
११) ,, हेमंत जे. चव्हाण इंग्रजी
१२) ,, बी. टी. पवार मराठी
१३) ,, एस्. व्ही. केसरकर गणित, भौतिकशास्त्र
१४) ,, व्ही. बी. मगदूम रसायनशास्त्र, जीवशास्त्र
१५) ,, पी. एस्. निलाखे इतिहास

## शिक्षकेतर कर्मचारी

१) श्री. एस्. एस्. पाटील ग्रंथपाल
२) श्री. यशवंत तु. देऊलकर ग्रंथालय मु. शि.
३) ,, गणेश आ. गोडबोले अधीक्षक
४) ,, महेश्वर वा. लेले मुख्यलिपिक
५) कु. मंदा चौकेकर लिपिक
६) श्री. डी. जी. किरकिरे लिपिक
७) श्री. बा. वि. पेडणेकर लिपिक
८) ,, चंद्रकांत य. महाडोक शिपाई
९) ,, वसंत वा. धोपटे ,,
१०) ,, नामदेव दा. केतकर ,,
११) ,, चंद्रकांत सा. कदम ,,
१२) ,, अरुण कृ. बाणे रखवालदार

# आमचे स्फूर्तीस्थान



**माननीय श्री.शां. कृ. तथा**
**बापूसाहेब पंतवालावलकर**
अध्यक्ष
शिक्षण विकास मंडळ, देवगड

## सहवेदना



**के. जे. ठाकूर**
संस्थेचे उपाध्यक्ष



**प्रा. पी. एस. निलाखे**
ज्युनिअर कॉलेज

" तेजस्वी ताऱ्याच्या मालवण्याने
अंधार पसरतो क्षणाक्षणाने
आम्हा अभाग्यांच्या नशिबातही
असेच घडले यांच्या जाण्याने ! "

आमच्या संस्थेचे उपाध्यक्ष कृष्णाजी जयराम ठाकूर, संस्थेचे हितचिंतक विष्णू जयराम ठाकूर, शामराव गोखले, विजयदुर्गचे श्री. परुळेकर, बाळकृष्ण परशुराम जोशी, महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील प्रा. पी.एस. निलाखे, माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, कोकणचे सुपुत्र भाईसाहेब सावंत, राजकीय नेते हेमवतीनंदन बहुगुणा, गंगाधर फडणवीस, भिकुचंद दोंदे, सहकार सम्राट गुलाबराव पाटील, जागतिक कीर्तीचे पुरातत्त्वज्ञ एच. डी. सांखलीया, ज्ञानपीठ पारितोषिक विजेते गुजराथी साहित्यिक उमाशंकर जोशी, हिंदी साहित्यिक जैनेंद्रकुमार, मराठी साहित्यिक डॉ. वि. स. वाळींबे, गं. बा. सरदार, श्री. ज. जोशी, चंद्रकांत काकोडकर, तुकाराम कोठावळे, सोबतकार ग. वा. बेहरे, पिंगेज क्लासेसचे एम. एम. पिंगे, चंदेरी दुनियेतील अभिनेते राजकपूर, दिग्दर्शक गजानन जहागिरदार, अभिनेत्री रत्नमाला, माधवराव वाटवे, किर्तनसम्राट गोविंदस्वामी आफळे, बॅडमिंटनपटू सय्यद मोदी आणि महाराष्ट्राचे अग्रगण्य नेते एस. एम. जोशी व काळाच्या पडद्याआड गेलेल्या सर्व ज्ञात–अज्ञात मान्यवरांना आमची भावपूर्ण श्रद्धांजली.

## कीर्तीपताका . . .

### तृतीय वर्ष कला प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



भारती नार्वेकर    सुशीला पाटणकर    उषा घाडी    रंजना माणगावकर    संजय गोगटे    श्रीकांत गावकर

### बारावी कला प्रथम श्रेणीत उत्तीर्ण





माधुरी वाडेकर    देवेंद्र पेडणेकर

### बारावी वाणिज्य प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



संदेश किंजवडेकर    प्रज्ञा देवधर    संगीता राणे    प्रकाश रानडे    तुषार बांदकर

## नेतृत्व ...

शरद गोडबोले संगीता नेने प्रकाश पाटणकर



विद्यार्थिनी प्रतिनिधी
**गीता सेस्त्री**

विद्यापीठ प्रतिनिधी
**नंदकुमार हिरनाईक**



विद्यार्थिनी प्रतिनिधी
**ज्योति तानवडे**

ज्युनिअर जनरल चँपियनशीप
**खेमराज परब**



सिनियर जनरल चँपियनशिप (विभागून)

सिनियर जनरल चँपियनशिप

सिनियर जनरल चँपियनशिप (विभागून)

# वर्ग प्रतिनिधी विद्यार्थी महामंडळ

| प्रकाश पाटणकर | शरद गोडबोले | संगीता नेने | विद्याधर राणे | संजय धुरी | संदीप फडके | संजय कुळकर्णी |
|---|---|---|---|---|---|---|



| तृतीय वर्ष कला | तृतीय वर्ष वाणिज्य | द्वितीय वर्ष कला | द्वितीय वर्ष कला | द्वितीय वर्ष वाणिज्य | प्रथम वर्ष कला | प्रथम वर्ष वाणिज्य |
|---|---|---|---|---|---|---|

| शामसुंदर जोशी | गीता मेस्त्री | श्रीकृष्ण गिरकर | नागेश मणचेकर | महेंद्र पिसे | अजित पुरळकर | विपुल शहा |
|---|---|---|---|---|---|---|



| बारावी कला (अ) | बारावी वाणिज्य | बारावी कला (ब) | बारावी वाणिज्य | अकरावी कला | अकरावी वाणिज्य | अकरावी विज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|

# राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी समिती



| सरिता नाईकसाटम | शरद शिंदे | गणेश सावंत | सुरेंद्र लांबोरे | दत्तात्रय प्रभू |
|---|---|---|---|---|

# रसराज संपादक मंडळ

## वरिष्ठ विभाग-विद्यार्थी संपादक समिती



संजय कुळकर्णी | विनायक ठाकूर | संजीवनी शिरसाट | संजय पांचाळ

## कनिष्ठ विभाग



अजित पुरळकर | दया खाडिलकर | मधुबाला मुणगेकर | मंदार जोशी

## संपादक मंडळ



प्रा. वसंत कांबळे | प्रा. आनंद जरग | प्रा. विनायक पाटील | प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | प्रा. लता वळसंगकर | प्रा. हेमंत चव्हाण

# स्नेहसंमेलन—छायावृत्त

## कनिष्ठ विभाग



प्रमुख पाहुणे
**श्री जगदीश खेबुडकर**
पारितोषिक वितरण करताना



उत्कृष्ट गायक—**प्रसाद रानडे**



उत्कृष्ट गायिका — **सरला कुबल**

# स्नेहसंमेलन–छायावृत्त



प्रमुख पाहुणे
**प्राचार्य गोपाळराव मयेकर**
बांदेकर कॉलेज, म्हापसा (गोवा)



**व्याख्यान ऐकण्यात तल्लीन झालेला श्रोतृवृंद**

**कोळी नृत्य**



# स्नेहसंमेलन—छायावृत्त



दीपनृत्य



एकांकिका : पंचनामा

# स्नेहसंमेलन–छायावृत्त



एकांकिका : पेटलेली अमावस्या

# स्नेहसंमेलन—छायावृत्त

नृत्य







संजय जोईल

लता चोपडेकर

वैयक्तिक नृत्य : प्रथम क्रमांक (विभागून)

## उपक्रम . . .



राष्ट्रीय सेवा योजना : मादकद्रव्य विरोधी प्रचार यात्रा



स्वयंसेवक श्रमदान करताना



## केल्याने देशाटन...



इतिहास विभाग : गोवा भ्रमन्ती



भूगोल विभाग
दक्षिण भारत सहल



ग्रामीण विकास विभाग : कऱ्हाडच्या कृषिउत्पन्न बाजारात

# निरोप



प्राचार्यासमवेत तृतीय वर्ष कला विद्यार्थी



प्राचार्यासमवेत तृतीय वर्ष वाणिज्य विद्यार्थी

## श्रीमती नीराबाई जगन्नाथ पारकर विद्यानगरी

**कल्पवृक्षाच्या छायेत . . .**



श्री स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय



श्री शां. कृ. पंतवालावलकर अध्यापक महाविद्यालय

## स्थलचित्रे . . .



सायन्स कॉलेज



प्राचार्य क्वार्टर्स

## स्थलचित्रे . . .



शिपाई क्वॉर्टर्स



वसतिगृह



आंबा कलम बाग

# उपक्रम ...

## विद्यापीठ आयोजित कार्यात्मक प्रौढ साक्षरता मोहीम



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना
डॉ. गोडे

कार्याची पाहणी





विविधा आयोजित
राज्यस्तरीय कथाकथन स्पर्धेतील
महाविद्यालयाने जिंकलेला करंडक

कवि कुसुमाग्रजांना 'ज्ञानपीठ' पुरस्कार
मिळाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे हार्दिक अभिनंदन.

वि. वा. शिरवाडकर
नाशिक : २

सप्रेम नमस्कार,

आपलं अभिनंदन पोचलं.
फार समाधान वाटलं.

आजवरच्या प्रवासात आपल्या निरपेक्ष प्रेमानं प्रोत्साहन मला लाभलं हे माझं महत् भाग्य. आपुलकीनं येथवर पोचलो. हे प्रेम पुढेही लाभेल असा मला विश्वास वाटतो. मी ऋणी आहे

आपला
वि. वा. शिरवाडकर

महाविद्यालयाचा विद्यार्थी विनायक ठाकूर यास कुसुमाग्रजांनी
अभिनंदन स्विकारल्याचे पाठविलेले पत्र

## वरिष्ठ विभाग

शब्दांनो मागुते या।

– शरणकुमार लिंबाळे

# वरिष्ठ विभाग

# ज्ञानपीठ सन्मानित 'कुसुमाग्रज'

**संजय कुळकर्णी**

प्रथम वर्ष वाणिज्य

सलग चौदा वर्षांच्या तपश्चर्येनंतर ज्ञानपीठ पारितोषिकाचा सन्मान वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रजांनी मराठी साहित्य शारदेला मिळवून दिला. त्या निमित्ताने त्यांची धावती ओळख–

कुसुमाग्रजांचा जन्म पुण्यात झाला. परंतु शालेय शिक्षण मात्र नाशिकात झाले. त्यांना 'तात्यासाहेब' या घरगुती नावानेच सर्वजण ओळखतात. त्यांच्या जन्मानंतर त्यांचे वडील लगेचच नाशिकला रहावयास गेले. व्यवसायाने ते वकील होते. नाशिक जिल्ह्यातील 'पिंपळगाव बसवंत' जवळील 'शिरवाड' हे तात्यासाहेबांचे मूळ गांव. तात्यासाहेबांना एकूण पाच भाऊ व एक बहिण आहे.

## वाटचाल

तात्यासाहेबांचे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले. पदवी घेतल्यानंतर त्यांनी सिनेमात शिरण्याचा प्रयत्न केला. मामा शिंदे यांच्या 'सती सुलोचना' चित्रपटाची कथा-पटकथा त्यांनी लिहिली. तसेच या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही वठविली. परंतु ही सिनेमा काढणारी कंपनीच बंद पडली. त्यानंतर मामा शिंदे यांनी नाशिकातून चित्रपट काढण्याचा प्रयत्न केला. त्यांना कुणीतरी लेखक हवा होता आणि तात्यासाहेबांना काहीतरी काम हवे होते. त्यातूनच हा चित्रपट निर्माण झाला. परंतु त्याने आर्थिकदृष्टया मार खाल्ला. शेवटी मामा शिंदे यांनी आगपेटीच्या कारखान्यात साधा मजूर म्हणून नोकरी धरली आणि तात्यासाहेबांनी एका सिनेमा कंपनीत शिरण्याचा प्रयत्न केला. परंतु हा प्रयत्न देखील फसला आणि तात्यासाहेबांनी वर्तमानपत्रात पत्रकार म्हणून काम सुरु केले.

## प्रभा उगवलीच नाही

पुण्याच्या 'सकाळचे' संस्थापक नानासाहेब परुळेकर यांनी आपल्या 'प्रभा' नावाच्या साप्ताहिकात तात्यासाहेबांना घेतले, पण 'प्रभा' चांगले चालत नसे. त्याची आर्थिक परिस्थिती अशी होती की त्यांच्या जवळ पगार मागणे शक्य नव्हते. साहजिकच सहाच महिन्यांनी तात्यासाहेबांनी 'प्रभा' सोडले.

तात्यासाहेब 'प्रभा' नंतर पुण्यातच वालचंद कोठारी यांच्या 'प्रभात' या दैनिकात लागले. तात्यासाहेबांनी 'गर्जा जयजयकार' ही अजरामर कविता, 'प्रभात' च्याच कचेरीत लिहून काढली. तीन ते चार वर्षे ते प्रभातमध्ये होते. या काळात ते कविता लिहू लागले व प्रसिध्दीसाठी त्या 'जोत्स्ना' मासिकात पाठवू लागले. वि. स. खांडेकर हे 'जोत्स्ना' मासिकाचे त्यावेळी संपादक होते. तात्यांचा 'विशाखा' हा

कविता संग्रहही खांडेकरांनीच पुढाकार घेऊन स्वखर्चाने छापला. त्यानीच तात्यासाहेबांना 'प्रभात' दैनिकामधून 'सारथी' या साप्ताहिकात नेले. परंतु फारच थोडाकाळ ते 'सारथी' मध्ये राहिले कारण हे साप्ताहिक अल्पावधीतच बंद पडले. त्यानंतर तात्यासाहेब धनुर्धारी, नवयुग अशा साप्ताहिकांतून लिहीत होते. अशा प्रकारे मुंबईत दोन-तीन वर्षं काढून तात्यासाहेब नाशिकला परतले.

नाशिकला आल्यानंतर तात्यासाहेबांनी 'स्वदेश' नावाच्या साप्ताहिकात काम केले. परंतु इथेही तात्यासाहेबांच्या समोर दुर्दैव उभे होते. हे साप्ताहिक देखील पुढे बंद पडले. त्यानंतर तात्यासाहेबांनी लेखनावरच उपजिविका करण्याचा निर्णय घेतला आणि ते नाशिकात स्थायिक झाले. इथूनच तात्यांची लेखनशैली खऱ्या अर्थाने विकसित झाली.

## साहित्य प्रवास

गडकऱ्यांची प्रेरणा घेऊन तात्यासाहेबांनी साहित्य क्षेत्रात प्रवेश केला तो काव्याच्या महाव्दारातून आणि ते महाकवी झाले. १९३३ मध्ये त्यांचा 'जीवनलहरी' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आणि महाराष्ट्रीयन रसिकांनी त्याला अग्रस्थान दिलं. नंतरच्या विशाखानं तर महाराष्ट्रात क्रांतीच्या ज्वाळा भडकवल्या विशाखेतल्या कवितांनी तत्कालीन तरुणांच्या मनात क्रांतीसन्मुखता निर्माण केली. समाजवादी विचार सरणीला तात्त्विक अधिष्ठान प्राप्त झाले. केशवसुतांची कविता आणि कुसुमाग्रजांची कविता त्यांच्या सामा. विचारांचे नाते परस्परांशी जुळणारे आहे. त्यांच्या सर्व कवितांच्या मुखाशी जीवनासंबंधीचे सखोल चिंतन व समष्ठी मनाचा आविष्कार आहे. केशवसुतांची कविता ही समष्ठी मनाचा आविष्कार करणारी असली तरी कुसुमाग्रजांची कविता काळानुसार आणि आशय दृष्टया वेगळी आहे. मानवी सुखदुःखांशी तिने आपले संबंध जोडले आहेत. तात्यांच्या कवितेने रविकिरण मंडळाचे संस्कारही पचविले आहेत. तरीपण यापूर्वी राष्ट्रीय कवितेत नसणारे वैशिष्ठ्य कुसुमाग्रजांच्या कवितेत आढळते. क्रांतीला उत्सुक संगीन सज्ज जमाव ब्रिटिश राजसत्तेला 'गर्जा जयजयकार' म्हणून सामोरा जातो. हे सामूहिक दृष्यच मुळी मराठी कवितेला अपूर्व आहे. स्वतंत्र मानवाचा ध्यास तात्यांच्या कवितेत आढळतो. तात्यांच्या कवितेतून दलितांच्या विदारक दुःखाचा आविष्कार घडतो, तसेच आदिवासी लोकांबद्दलचा कळवळाही त्यांच्या कवितांमधून आणि शब्दांमधून नेहमी जाणवतो. अलिकडच्याच एका कवितेत तात्यासाहेब म्हणतात,

मी पाहिले आदिवासी स्त्रीच्या
उघड्या स्तनाच्या अग्रावर
दिल्लीचे पार्लमेन्ट
आणि दुसऱ्यावर आमचे साहित्य संमेलन.

मानवतेचा मंत्र घेऊन समष्ठीमनाचा आविष्कार घडविणारा, चंद्राची शीतलता व सूर्याचे तेज देणारा तात्यांचा काव्यप्रवास अखंड चालू आहे

ध्येय प्रेम आशा
यांची कधि होतसे का पूर्ती,
वेड्यापरी पुजितो या आम्ही
भंगणाऱ्या मूर्ती

महाराष्ट्राला, मराठीला, मराठीच्या प्रतिमेला, मराठीच्या साहित्य शारदेला लाभलेले 'कुसुमाग्रज' हे जणू 'साहित्यिक कौलंबसच' होत.'

## नटसम्राट तात्यासाहेब

मराठीच्या काव्य जगतात यशस्वी घोडदौड चालू असतानाच तात्यासाहेबांचे नाट्य लेखनही प्रगती पथावर होते. त्यांची एकाहून एक सकस अशी नाटके

रंगभूमीवर येत होते. तात्यासाहेब म्हणतात, " गडकऱ्यांच्या शब्दांची ओळख झाली नसती तर मी कवी झालो नसतो आणि भालेरावांची भेट झाली नसती तर मी नाटककार झालो नसतो." गडकऱ्यांच्या शब्दांच्या सामर्थ्याने तात्यांनी नाट्यक्षेत्रात पाऊल टाकलं. नाटक हे दृष्य आणि श्राव्य काव्य आहे. नाट्य संहितेला आकार देणारा नाटककार आणि त्याने उभ्या केलेल्या पात्रात आपल्या अभिनय गुणांनी प्राण ओतणारा कलावंत, यातून निर्माण होणारा कलापूर्ण आविष्कार म्हणजे नाटक होय.

तात्यासाहेबांची नाटके ही नुसतीच काव्य नाट्ये नाहीत तर त्यांच्यातल्या कवीने त्यांच्यातल्या नाटककारापासून वेगळे अंतर राखलेले आहे. सर्व नाटकांमध्ये डोळे दिपवून टाकणारी कल्पनाशक्ती आणि प्रतिमासृष्टी आपणास आढळते. तात्यांच्या नाटकांमधून एकेक पात्रच जिवंत होत असते. त्यांच्या नाटकात पौराणिक नाटकेही अंतर्भूत आहेत. तात्यांच्या नाटकांतील नाट्यांचा उगम जीवनानुभवांतून झाला आहे. मानवी मनाच्या सौंदर्याचा साक्षात्कार त्यांच्या नाटकात हु तो. नाटकांतील संघर्ष कलात्मक असले तरी व्यक्तीदर्शन प्रभावी असते. काव्यमयता हे तर त्यांच्या नाटकांचे एक विशिष्ट अंग आहे. 'नटसम्राट' मधील काव्य हे तर संपूर्ण नाटक प्रभावी ठरण्यास परिणामकारक झाले आहे. उत्तुंग कल्पनाशक्ती आणि अलंकारिकता हें तात्यांच्या नाटकांचे वैशिष्ठ्य नाट्यरचनेच्या बाबतीत तात्यासाहेब इतरांपेक्षा वेगळे ठरतात. मुखवट्यांच्या जगात मुखवटा टाकून जगणारा आणि प्रेक्षकांच्या सहानुभूतीचा विषय ठरणारा विदुषक (विदुषक), असामान्य व्यक्तीमत्वाच्या बाजीरावाच्या जीवनातील मस्तानी (बाजीराव मस्तानी), कर्णाच्या जीवनाला असणारा मातृहीनत्वाचा शाप (कौंतेय), झाशीच्या राणीचे असामान्य धैर्य (वीज म्हणाली धरतीला), ययातीच्या जीवनातील अधोगती (ययाती आणि देवयानी), नीती–अनितीच्या कल्पनासंघर्षात सापडलेली स्त्री (एक होती वाघीण) हृदयाला हेलावून सोडणारा आणि मनाला मुग्ध करणारा आनंद (आनंद) हे सर्व विषय कोणतेही असोत, पण त्यामध्ये मानवी मनाच्या भावभावना ओतून शिरवाडकर ह्या पात्राला आणि कथानकाला इतके जिवंत करतात की प्रेक्षकही नाटकाचाच एक भाग बनून जातो. 'आमचं नाव बाबुराव', 'विदूषक' मध्ये तात्यांच्या विनोदी बुद्धिचा आविष्कार घडतो.

## नाटक असं असतं राजा

ज्या काळात आपणा सर्वांच्या भावभावनांना गदगदून सोडलं, ते तात्यांचं नाटक म्हणजे 'नटसम्राट'. गणपतराव बेलवलकर एकेकाळचे एका पिढीचे प्रतिनिधी तर तरुण मुलंही दुसऱ्या काळाचे प्रतिनिधी. या दोघांतील संघर्षाने नटसम्राट चितारले आहे.

म्हातारपण कसं असहाय्य असतं, एके काळचा 'नटसम्राट' आयुष्यभर कमावलेली सारी दौलत मुलाबाळांवर उधळतो, परंतु ही पोटची मुलंच त्याला दूर करतात, परंतु माणुसकी शिल्लक असलेला रस्त्यावरचा बुटपॉलीशवाला त्याला आश्रय देतो· मुलांवर संपत्ती उधळणारा आप्पा बेलवलकर स्वतःच्या मुलांच्याच घरी चोर ठरतो, आपल्या लाडक्या नातवंडांना भेटायला महाग होतो, आणि शेवटी राजाच्या मांडीवर देह ठेवताना म्हणतो, " नाटक असं असतं राजा, नाटक असं असतं " तेव्हा प्रेक्षकांचे डोळे पाण्याने डबडबलेले असतात. असा हा मराठीचा, महाराष्ट्राचा नाट्यसम्राट. याने प्रतिभावंतांना दाखवून दिले की " नाटक असं असतं राजा. नाटक असं असतं."

तात्यासाहेबांनी कथा, कादंबऱ्याही लिहिल्या. पण कादंबरीकार म्हणून ते फारसे उजेडात आले नाहीत आणि त्यांना वाचकांचीही फारशी मान्यता मिळाली नाही. 'जान्हवी' 'वैष्णव' 'कल्पनेच्या तिरावर'

या कादंबऱ्या नाटकाच्या धर्तीवर वाटतात. पण त्यांनी लिहिलेल्या कथा मात्र एक वेगळाच विरंगुळा देऊन जातात.

## सामाजिक कार्यातही हातभार

साहित्य सेवेबरोबरच तात्यांचे समाजकार्यही उल्लेखनीय आहे. नाशिकच्या सांस्कृतिकच नव्हे तर सर्वच दृष्टीने झालेल्या जडणघडणीत तात्यांचा सिंहाचा वाटा आहे. १९५० साली लोकहितवादी मंडळ स्थापन करून नाशिकच्या सांस्कृतिक जीवनात उज्वल परंपरा निर्माण केली. तात्यांच्या प्रेरणेमुळे नाशिकात सार्वजनिक वाचनालयें, नाट्यगृहे निर्माण झाली.

असा हा स्थीतप्रज्ञ, मानवतेचा नंदादीप, माणुसकीचा महासागर, महामानव वि. वा. शिरवाडकर यांच्या साहित्य कार्याचा गौरव 'ज्ञानपीठ' या पुरस्काराने झाला. पुरस्कार मिळाल्याने काही व्यक्ती मोठ्या होतात, नावारुपास येतात. परंतु तात्यासाहेबांमुळे या पुरस्काराचाच गौरव झाला आहे. आपल्या लेखणीच्या खडतर प्रवासानंतर मराठीची प्रतिभा शिखरावर पोहोचविणाऱ्या तात्यासाहेबांना लाख लाख शुभेच्छा.

★★★

---

# कुसुमाग्रजांच्या काव्यातील सामाजिक जाणीव

('विशाखा' काव्यसंग्रहाधारे)

**शोभा जोशी**
प्रथम वर्ष कला

भारतीय ज्ञानपीठ' तर्फे कवी कुसुमाग्रज यांना भारतीय साहित्यातील उत्कृष्ठ कामगिरीबद्दलचा १९८७ सालचा २३ वा ज्ञानपीठ पुरस्कार अर्पण करण्याचा भव्य सोहळा लोकसभेचे सभापती श्री बलराम जाखर यांच्या गौरवपूर्ण भाषणासह व टाळ्यांचा प्रचंड कडकडाटात " बिर्ला मातोश्री " सभागृहात साजरा झाला.

शनिवार दिनांक ११ मार्च १९८९ रोजी कुसुमाग्रजांचा (वि. वा. शिरवाडकरांचा) गौरव करीत असताना " कुसुमाग्रज हे तर साहित्यिक कोलंबस " अशा शब्दांत बलराम जाखरांनी तर रविवार दिनांक ५ मार्च १९८९ च्या दैनिक लोकसत्तेमध्यें प्रा. शरद देशमुख यांनी "कुसुमाग्रज म्हणजे महाराष्ट्राच्या प्रतिभेला आलेलं सूर्यफूल. या सूर्यफुलानं आपलं सूर्यतेज सबंध भारताला दाखवून दिलं आणि मराठी भाषेच्या मुकुटात मानाचा तुरा खोवला " असे गौरवोद्गार काढले आहेत.

ज्ञानपीठ पुरस्कार स्विकारताना कुसुमाग्रजांनी म्हटले– " हा पुरस्कार मला देऊन आपण माझा आणि माझ्या साहित्याचा फार मोठा गौरव केला आहे. हा गौरव माझ्या मायभाषेचा आहे. वाङमयीन परंपरेचा आणि मराठी साहित्यिकांचा आहे. मातृभाषेचा दुराभिमान माझ्या ठिकाणी नाही, पण अभिमान मात्र आवश्य आहे. राष्ट्राच्या उभारणीसाठी संवादभाषा हिंदी आहे हिन्दी आणि मराठी या एकमेकींच्या सखी आहेत. परंतु मराठीवर आज इंग्रजीचे लज्जास्पद प्राबल्य प्रस्थापित झाले आहे, याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला.

"भाषेचा प्रश्न हा केवळ अभिमानाचा नसून समाजाच्या अस्मितेचा आणि म्हणून अस्तित्वाचाही प्रश्न आहे. समाजाच्या परिवर्तनाची वा क्रांतीची प्रेरणा ही स्वभाषेच्या किनाऱ्यावरच होवू शकते" असे विचार व्यक्त करुन "कवितेने मला जगविले, काव्याचे आणि पर्यायाने सर्व साहित्याचे फलित, सत्यम् शिवम् सुंदरम या उक्तीत सामावलेलं आहे. काव्य हे अखेरतः सुंदरतेचा शोध घेते आणि सत्याची साधना करते. आणि हे सर्व करताना जे असुंदर आहे, अशिव आहे, असत्य आहे, त्याच्याशी मुकाबला करीतच त्याला पुढे जावे लागते. म्हणून माणसाला उत्कट अनुभूतीचे जेवढे क्षेत्र आहे ते सर्व काव्याचेही क्षेत्र आहे."

काव्याच्या दृष्टीने सागराची अथांगता जेवढी खरी तेवढीच खरी अश्रूंची अगतिकताही. डोंगर जेवढा खरा तेवढाच खरा सामाजिक व्यवस्थेतील अन्याय. कवी हा समाजात जगत असतो आणि त्या समाजजीवनाच्या जाणिवा त्याच्या आत्मतेत समाविष्ट होत असतात. कुसुमाग्रज हे नाव उच्चारल्या बरोबर 'विशाखा' हा त्यांचा काव्यसग्रह आठवतो.

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते वि. स. खांडेकर यांनी या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहिली आहे. वि. स. खांडेकर आणि वि. वा. शिरवाडकर यांचे अनेक बाबतीत साम्य असलेले आढळते. या साम्यामध्ये आणखी एक मोलाची व गौरवपूर्ण भर पडली आहे. ती म्हणजे दोघांनीही ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त केला आहे.

'विशाखा' मध्ये कुसुमाग्रजांच्या व्यक्तिमत्वाचे सारे पैलू प्रकर्षाने प्रकट झाले आहेत. प्रत्येक कवीच्या काव्यात त्यांची वेगवेगळी वैशिष्ट्ये दिसून येतात. म्हणूनच टिळक हे फुलामुलांचे कवी होते, गोविंदाग्रज हे कल्पनारम्य प्रणयाचे कवी होते, तसे कुसुमाग्रज हे मानवतेचे कवी आहेत.

आजच्या सामाजिक असतोषाचा ज्वालामुखी त्यांच्या कवितांतून नुसता धुमसत नाही, तो अग्निरसाचा वर्षाव करीत सुटतो. सामाजिक विषमता, पिळवणूक, गांजणूक आणि अन्याय यांच्याविषयीची बहुजन समाजाची चीड कुसुमाग्रजांनी अत्यंत उत्कटपणे आपल्या 'विशाखा' या काव्यसंग्रहातील काही कवितांतून व्यक्त केली आहे. 'बळी' 'लिलाव' 'पाचोळा' 'माळाचे मनोगत' 'सहानुभूती' इत्यादि कविता या दृष्टीने अतिशय सरस आहेत. गरीबांनी मरमर मरावे नि श्रीमंतांनी त्यांच्या जीवावर चैन करावी हा आजच्या विषम समाजातला सर्वात मोठा अन्याय आहे. या अन्यायाला बळी पडलेल्या एका साध्या भोळ्या निष्पाप जीवाचे कवीने 'बळी' या कवितेत केलेले वर्णन आतडे पिळवटून टाकील असेच आहे.

दूर देशी राहिलेले दीन त्याचे झोपडे!
बापुडा अन् आज येथे पायवाटेला पडे!
लाज झाकाया कटीला लावलेली लक्तरे
अन् धुळीचे माखलेले तापलेले कातडे!

आजच्या समाजरचनेच्या कुजलेल्या अंतरंगाचे भेदक चित्रण करणारा हा कवी आहे. भारतीय संस्कृतीची ही ध्वजा आणि तेहतीस कोटी दैवतांच्या दयेचे फलीत सांगताना ते म्हणतात -

मानवांच्या संस्कृतीची काय लागे ही ध्वजा
तीस कोटी दैवतांच्या की दयेचे हे मढे!

'लिलाव' या कवितेत सावकारांच्या कर्जाच्या बोजामुळे उध्वस्थ झालेल्या एका गरीब शेतकऱ्याच्या दिनवाण्या परिस्थितीचं वर्णन मराठी रसिकाला हृदयस्पर्शी वाटल्याशिवाय रहाणार नाही. सावकाराची कर्जफेड ठराविक मुदतीत न झाल्यामुळे कष्ट करुन अर्धपोटी राहणाऱ्या त्या गरीब शेतकऱ्याच्या झोपडीतून धान्य, बाजले, थाळी इत्यादी वस्तू लिलावाकरिता बाहेर काढल्या जातात, परंतू सावकाराची कर्जाची परतफेड होत नाही. उपाशी पोर भुकेने व्याकूळ होऊन रडू

लागते. गरीब बिचारी शेतकरीण त्याला शांत करण्याकरिता पाजू लागते. लगेच सावकाराचे लक्ष तिच्याकडें जाते आणि—

'ऊर उघडे ते तिचे न्याहळोनी
थोर थैलीतील वाजवीत नाणी
'आणि ही रे!' पुसतसे सावकार
उडे हास्याचा चहुकडे विखार !'

ज्या समाजरचनेत गरिबांच्या जगण्याच्या हक्काचा आणि स्त्रीच्या शीलाचा असा लीलाव मांडला जातो ती समाजरचना शक्य तितक्या लवकर नामशेष झाली पाहिजे असा उग्र त्वेष रसिकांच्या मनात उत्पन्न करण्याची शक्ती या कवितेत नक्कीच आहे.

'पाचोळा' या कवितेतही दलितांच्या गांजणुकीचे चित्र कवीने किती सहृदयतेने काढले आहे . . .

दीन, दरिद्री आणि दुःखमय जीवन दलितवर्ग पिढयान् पिढ्या कंठीत आहे! पण झोपडीत राहणारांची पर्वा महालातल्या मिरासदारांनी कधी केली नाही आणि बंगल्यातले बडे लोक कधी करणार नाहीत हे कविला माहीत आहे. दलितांच्या पोटी जन्माला आलेल्या गुणी माणसालाही दलितच व्हावे लागते. आर्थिक, बौद्धिक आणि सामाजिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचा एकसुद्धा मार्ग या उपेक्षितांना आम्ही मोकळा ठेवलेला नसतो. 'पाचोळ्या' च्या रुपाने कुसुमाग्रजांनी दलितवर्गाच्या या कारुण्यपूर्ण जीवनाचे भेदक चित्रण केले आहे. झाडाच्या पायथ्याशी पडलेल्या पाचोळ्याला उषा हसवू शकत नाही अथवा (रात्र) निशा रिझवू शकत नाही. झाडावरील हिरवीगार पाने आणि झाडाखालचे हिरवेगार गवत ही सदैव हसुन त्यांचा उपहास करीत असतात. वाटसरु त्याला तुडवून जातो, पण बिचारा पाचोळा शांतच असतो, शेवटी—

'आणि अंती दिनि एक त्या वनात
येइ धावत चौफेर क्षुब्ध वात
दिसे पाचोळा, घेरुनि तयाते
नेइ उडवूनि त्या दूर दूर कोठे!'

## शिरवाडकर आणि खांडेकर

★ वि. स. खांडेकर आणि वि. वा. शिरवाडकर या दोघांनाही ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला.

★ दोन्ही लेखकांबद्दल अपूर्व असा आदर मराठी साहित्य प्रेमिकांत आढळतो.

★ दोघांचेही नाव विष्णु आहे.

★ दोघेही दत्तक गेलेले.

★ दोघांनाही वयाच्या पंचाहत्तरच्या आसपास पुरस्कार लाभले.

★ समाजाबद्दल तळमळ, दलित, आदिवासी यांच्याबद्दल आस्था, शोषितांबद्दल कळवळा, मानवता, प्रेम आणि समाजवादाकडे झुकलेली विचारसरणी हे दोघांचेही वैशिष्ठय.

★ दोघांनीही पुण्या मुंबईसारख्या महानगरापासून दूर राहून हयात घालविली.

★ कुसुमाग्रजांचा 'विशाखा' संग्रह निघावा म्हणून खांडेकरांनीच पुढाकार घेतला.

★ दोघांच्याही लेखनात अन्याय, अंधश्रद्धा, जुलूम, पिळवणूक यांचा निषेध जाणवतो.

★ ज्ञानपीठ पुरस्कार लाभला तेव्हा दोघांच्याही पत्नी निवर्तलेल्या होत्या.

★ दोन्ही लेखकांकडे लोकांचा मोठा राबता.

संकलन—संजय कुळकर्णी
प्रथम वर्ष वाणिज्य

आणि हा जीर्ण पाचोळा उडून गेल्यानंतर
पुढें काय? अशी परिस्थिती निर्माण झाली असताना
पुढें कुसुमाग्रज लिहितात–

'आणि जागा हो मोकळी तळाशी
पुन्हा पडण्या वरतून पर्णराशी!'

सामाजिक परिस्थिती ही अशी आहे. एक प्रश्न सुटतो न सुटतो तोच दुसऱ्या (प्रश्नाची) समस्येची नांदी झालेली आपणास पहायला मिळते.

स्वातंत्र्योत्तर काळातील आपल्या कवितेत कुसुमाग्रजांनी आर्थिक विषमतेमुळे समाजाच्या खालच्या वर्गातील लोकांची होणारी दुर्दशा, जातीभेद, स्वार्थलोलुपता इत्यादी अनर्थांना वाचा, फोडली आहे. समाजातील या विषमतेचा त्यांनी उपहासपूर्ण शब्दात निषेध केला असून मानवतेवरील प्रेमाचा पुरस्कार केला आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समता, मानवतावाद या सामाजिक मूल्यांचा त्यांनी पुरस्कार केला आहे.

आजच्या सामाजिक जीवनातल्या अश्रू, असंतोष, चीड, व्देष इत्यादी साऱ्या गोष्टी कुसुमाग्रजांच्या कवितेत आढळतात. या सर्वांचे फक्त चित्रण करुन ते थांबत नाहीत, त्याचे अश्रू दुबळे नाहीत. त्यातून दुर्दम्य आशावादाच्या ठिणग्या उडत आहेत. म्हणूनच कवी म्हणतात–

'मार्ग आमुचा रोधू शकती ना घन ना वारा
घराची वा वितभर कारा
मानवतेचे निशाण मिरवू महासागरात
जिंकूनी खंड खंड सारा'!

★★★

## कुसुमाग्रजांची साहित्य संपदा

### नाटके

| | |
|---|---|
| दूरचे दिवे | दुसरा पेशवा |
| वैजयंती | कौंतेय |
| राजमुकुट | ऑथेल्लो |
| आमचं नांव बाबुराव | नटसम्राट |
| ययाती आणि देवयानी | बेकेट |
| वीज म्हणाली धरतीला | विदुषक |
| एक होती वाघीण | मुख्यमंत्री |
| चंद्र जिथे उगवत नाही | महंत |
| आनंद | मेघदूत |

### काव्यसंग्रह

| | |
|---|---|
| जीवनलहरी | हिमरेषा |
| विशाखा | वादळवेल |
| समिधा | रसयात्रा |
| किनारा | छंदोमयी |
| मेघदूत | मुक्तायन |
| मराठी माती | |

### एकांकिका

| | |
|---|---|
| दिवाणी दावा | नाटक बसते आहे |
| देवाचें घर | |

### कादंबऱ्या

| | |
|---|---|
| वैष्णव | जान्हवी |
| कल्पनेच्या तीरावर | |

### कथा संग्रह

| | |
|---|---|
| फुलवाली | काही वृद्ध काही तरुण |
| सतारीचे बोल | बारा कथा |
| प्रेम आणि मांजर | |

### ललीत लेख

| | |
|---|---|
| आहे आणि नाही | विराम चिन्हे |

# कुसुमाग्रजांचे ' पृथ्वीचे प्रेमगीत '

**गणेश सावंत**
तृतीय वर्ष वाणिज्य

कवी कुसुमाग्रजांच्या पद्यात प्रतिभेचा भव्य वटवृक्ष निर्माण झाला आहे. ज्याप्रमाणे वटवृक्षाच्या फांद्याफांद्याला पारंब्या सुटतात व नंतर नक्की त्या वृक्षाचा बुंधा, मूळ, खोड कुठे हे समजत नाही त्याप्रमाणे त्यांच्या पद्यातील प्रतिभेच्या वटवृक्षाने त्यांच्या संपूर्ण शरीरात पारंब्या सोडल्या आहेत व त्यांच्या हाताच्या बोटातून सुद्धा प्रतिभा वहात असते. त्यांची एकेक कविता म्हणजे मराठी कवितेच्या अनेकधारी प्रवाहातून निर्माण झालेली एक वैशिष्ठ्यपूर्ण धारा आहे.

कवी कुसुमाग्रजांचे आतापर्यंत नऊ–दहा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यातील त्यांचा ' रसयात्रा ' हा निवडक कवितासंग्रह इतका गाजला की रविकिरण मंडळातील एक उत्कृष्ट काव्यसंग्रह म्हणून त्याला पारितोषिक मिळाले होते. याच काव्यसंग्रहातील प्रेमाची उत्कट ओढ व्यक्त करणारी त्यांची ' पृथ्वीचे प्रेमगीत ' ही कविता अत्यंत महत्वाची ठरते.

आत्तापर्यंत अनेक कवींनी अनेक प्रकारच्या कविता लिहिल्या. बहुसंख्य कवींच्या कविता या प्रेयसीवरील, आईवरील, भावावरील व इतर प्रेमावर अवलंबून असतात. त्यांच्या कवितेतून त्या व्यक्तीबद्दल वाटणारे प्रेम, जिव्हाळा व्यक्त होतो. पण हे सर्व प्रेम साणसावरचे किंवा सजीवांवरचे असते. सध्याच्या युगात सर्वसामान्य कवीसुद्धा प्रेयसीवरील प्रियकराचे प्रेम की प्रियकरावरील प्रेयसीचे प्रेम एवढे आकर्षक रेखाटतो की वाचणारा त्याच्यात अगदी तल्लीन, बेभान होऊन जातो. पण या सर्वांहून अगोड असे प्रेम व्यक्त करणारे कवी म्हणजे कुसुमाग्रज.

मराठीत सुंदर, सूक्ष्म आणि तरल प्रेमगीत काही थोड्या–थोडक्या कवीने लिहिली नाहीत. प्रत्येक कवीने याबाबतीत आपली प्रतिभा पणाला लावून पाहिली आहे. पण ' पृथ्वीचे प्रेमगीत ' लिहिण्याचे सुचले आणि साधले कुसुमाग्रजांनाच.

त्यांच्या या कवीतेतील पृथ्वी प्रौढ आहे. सावित्रीसारखी निष्ठावंत आहे. बाहेरुन शांत दिसली तरी तिच्या अंतःकरणातील प्रेमज्योत जळती, जागती आहे. तारे, चंद्र, शुक्र, मंगळ, ध्रुव आणि धुमकेतू आपापल्या परिने आणि आपापल्या स्वभावानुसार तिचे मन जिंकण्याचा प्रयत्न करतात. पण पृथ्वी ही प्रेयसी सूर्याला आपला प्रियकर मानून त्याच्या पायाखालचा एक धूलीकण बनून राहण्यास तयार होते.

पृथ्वीचे हे प्रेमगीत अथपासून इथपर्यंत समर्थ प्रेमाचा साक्षात्कार घडवण्याच्या दृष्टीने अप्रतिम तर आहेच, पण त्याचबरोबर गृहगोलाविषयीच्या आपल्या शास्त्रीय ज्ञानाचा कलादृष्ट्या किती श्रेयस्कर उपयोग करुन घेता येतो याचेही या कवितेत समर्थ असे प्रत्यंतरही आपल्याला मिळते.

कुसुमाग्रजांच्या या कवितेत पृथ्वी सूर्याला विनवणी करताना म्हणते–

युगामागुनी चालली रे युगे ही
करावी किती भास्करा वंचना
किती काळ कक्षेत धावू तुझ्या मी
कितीदा करु प्रीतीची याचना

युगामागूनी एक एकयुगे चालली आहेत तरी तुझी मी विनवणी करीत आहे व प्रेमाची भीक मागण्यासाठी तुझ्या मागोमाग मी धावत आहे. असे पृथ्वी सूर्याला सांगते. त्याचबरोबर ती सांगते. पूर्वीसारखी मी तरूण राहिले नाही. तरुणपणी असलेली माझ्या अंगातील आग आता उरली नाही. तरुणपणीच्या यौवनातल्या माझ्या मशाली विझून आता फक्त काजळी उरली आहे पण हे सर्व असले तरी ती म्हणते--

> परी अंतरी प्रीतीची ज्योत जागे
> अविश्रांत राहिल अन् जागती
> न जाणे न नेणे कुठे चालले मी
> कळे तू पुढे आणि मी मागुती!

माझ्या अंतःकरणात प्रेमाची ज्योत तेवते आहे. आणि ही ज्योत अशीच तेवत राहिल. यापुढेही जाऊन पृथ्वी म्हणते -- 'मला एवढं समजत नाही की मी कुठे चालली आहे. तू पुढं चालतो आहेस आणि म्हणून मी मागून येते आहे.'

पृथ्वीला जिंकण्यासाठी तारे नटून--थटून येऊन तिच्या मस्तकावर उल्कारुपी फुलांचा वर्षाव करत आहेत. याशिवाय चंद्र तर तुझा उसना प्रकाश घेऊन दारुण तपाचार स्वीकारुन मला मोहवीत आहे. पहाटेच्या वेळी प्रभेचा पिसारा उभारुन हा प्रेमळ शुक्र मला आपली करू पाहातोय तर मंगळ लाजून माझ्याकडे प्रीतीची याचना करतो आहे. ध्रुव हा संन्यस्त होऊन उत्तरेला जाऊन बसला आहे. धूमकेतु सुध्दा पिसाटासारखे केस पिंजारुन माझ्याकडे प्रेमाची याचना करीत आहे. असं पृथ्वी सूर्याला सांगते आहे.
पण याचवेळी ती--

> परी भव्य ते तेज पाहून पूजून
> घेऊ गळ्याशी कसे काजवे
> नको क्षुद्र शृंगार तो दुर्बलांचा
> तुझी दूरता त्याहूनी साहवे

असे उद्‌गार काढते, दिव्य दिक्षामंत्रासारखे हे शब्द कानी पडताच आपण थरकतो, चमकतो, अंतर्मुख होतो. आम्हा माणसांच्या शृंगाराचा कस मनातल्या मनात तपासतो. पृथ्वी सांगते मला तो शृंगार काही नको त्यापेक्षा तुझी दूरताच मला अधिक चांगली वाटेल. माझ्या मनात जागणारा प्रेमाचा निखारा केव्हा केव्हा वर येतो. अंग शहारुन येते व माझ्या हृदयातून-- डोळ्यांतून प्रेमाच्या धारा वाहू लागतात. ती म्हणते--

> 'गमे की तुझ्या रुद्र रुपात जावे
> मिळोनी गळा घालुनिया गळा
> तुझ्या लाल ओठातली आग प्यावी
> मिठीने तुझ्या तीव्र व्हाव्या कळा!'

असं वाटतं की तुझ्या रुद्र रुपात जाऊन तुझ्या गळ्यात गळा घालून तुझ्या लाल आगीसारख्या ओठातली आग प्यावी व तुझ्या मिठीने तृप्त होऊन जावे. मित्रा, तुझी थोरवी अमर्याद आहे. अगाध आहे. मला माहित आहे मी तुझ्यापुढे एक धुळीचा कण आहे.

> अमर्याद मित्रा, तुझी थोरवी
> मला ज्ञात मी एक धुलीकण

तुझ्या पायाची दासी होण्यासाठी मला तुझ्या पायाखालच्या धुळीत जरी जागा दिलीस तरी चालेल, मी माझे ते भूषण समजेन.

कवी कुसुमाग्रज यांनी किती कल्पकतेने ही जीवंत कविता लिहिली आहे हे आपणास समजून येईल.

शृंगाराला उदात्ततेची इतकी उत्तुंग बैठक कलापूर्ण रीतीने देणारी दुसरी कविता व अशी कविता लिहिणारा कवी दुर्मिळच म्हटला पाहिजे.
या कवितेतील कुसुमाग्रजांचे यश अनन्य साधारण आहे.

★★★

# ' कवी ' मंगेश पाडगांवकर

( जिप्सीच्या अनुषंगाने )

**शोभा जोशी**
प्रथम वर्ष कला

कवी मंगेश पाडगांवकर या मराठीतील प्रतिभावंत कविला गेल्या १० मार्च १९८९ रोजी वयाची साठ वर्षे पूर्ण झाली. सतत चाळीस वर्षे काव्यसंसार करुन त्यांनी मराठी रसिकांच्या मनात आपली अशी एक वेगळी प्रतिमा निर्माण केली आहे. पाडगांवकरांच्या साठाव्या वाढदिवशी महाराष्ट्रातील हजारो रसिकांबरोबर आम्हीही त्यांना आमच्या महाविद्यालयामार्फत शुभकामना देत आहोत.

मराठी कवितेला जेव्हा ओहोटी लागली असे वाटले तेव्हा ती अत्यंत अल्पकालीन ठरली आहे. गोविंदाग्रजानंतरची ओहोटी रविकिरण मंडळाने, त्यानंतरची कुसुमाग्रजांच्या तेजस्वी कवितेने अल्पकालीन ठरविली. १९४० च्या सुमारास कविता लतेला बहर आला. १९४५ मध्येच नवकाव्य जन्मास येवून आधुनिक मराठी काव्यलतेला एक नवीन फांदी फुटली.

बा. सी. मर्ढेकर, शरच्चंद्र मुक्तिबोध, विंदा करंदीकर, वसंत बापट, मंगेश पाडगांवकर हे कवी या काळात प्रकाश झोतात आले.

' धारानृत्य ' या पहिल्या काव्यसंग्रहातच पाडगांवकरांनी निसर्गकवी म्हणून आपली मुद्रा मराठी कवितेत प्रस्थापित केली. ' निसर्ग माझ्या अनुभवापासून वेगळा काढता येणार नाही ' असा आपला काव्यानुभव त्यांनी स्वतःच स्पष्ट केला आहे. ते जीवननिष्ठ कवी आहेत. त्यांचे मन अत्यंत संवेदनशील आहे. एवढेच नव्हे, आपल्या कवितेची वाटचाल डोळसपणे पाहणारा हा कवी आहे.

सुरुवातीच्या काळात पाडगावकरांच्या कवितेवर बोरकरांच्या कवितेची छाया पडलेली होती. बोरकरांच्या कवितेप्रमाणेच ते आपले अनुभव व्यक्त करीत होते. पण हळूहळू स्वतःचे अनुभवविश्व त्यांना गवसले. आपले अनुभव वेगळ्या रीतीने ते प्रकट करु लागले आणि ' जिप्सी ' या संग्रहामध्ये त्यांच्या काव्याला सर्वस्वी वेगळे वळण प्राप्त झाले. त्यांच्या निसर्ग कवितेला देखील असेच निराळेपण लाभले आहे. आपले अनुभव वेगळ्या प्रकारे प्रकट करण्याचे सामर्थ्य त्यांच्या प्रतिभेत निर्माण झाले. पाडगांवकर निसर्गाला त्याच्या उपजत रंगात पाहतात, त्याचाच समूळ आविष्कार करतात. ते निसर्गाला आपल्याकडे ओढीत नाहीत तर निसर्गाकडे ते ओढले जातात. आणि त्या निसर्गाचे त्याच्या सूक्ष्म वैशिष्ठ्यासह चित्रण करतात. उदा. –

> हळुच चांदणे ओले, ठिबके पानांमधुनी
> कसला क्षण सोनेरी, उमले प्राणामधुनी !
> संथ निळे हे पाणी, वर शुक्राचा तारा
> दरवळला गंधाने, मौनाचा गाभारा !

पाडगांवकर आपल्या निसर्ग कवितात प्रतिमांचा वापर अगदी वैशिष्ठ्यपूर्ण रीतीने करतात, तसेच त्या प्रतिमांना कमालीचे सजीव करतात. निसर्गाच्या हृदयात शिरुन तिथली अभिजात

थरथर, वेदना कमालीच्या ताकदीने प्रकट करतात. ऐंद्रिय संवेदना साकार करण्यात ते यशस्वी झाले आहेत. काही कवितांतून निसर्गाचे चित्रमय वर्णन अतिशय रेखीव व मोजक्या शब्दांतून प्रकट करुन ते निसर्गदृष्य रसिकांच्या मनासमोर जसेच्या तसे प्रकट करतात. नुसती चित्रमयता पाहिली तरी त्यांचे निसर्गवेड लक्षात येईल.

भरुन काजव्यांनी हा
चमके पिंपळ सारा
स्तिमित होऊनि तेथे
अवचित थबके वारा!
किरकिर रात किड्यांची
नीरवतेस किनारी
ओढ लागुनी छाया
थरथरी अंधारी!

काजव्यांच्या प्रकाशामुळे चमकणारा पिंपळ, त्याला पाहून स्तिमितपणे थबकणारा वारा, रातकिड्यांची किरकिर, किनाऱ्याची नीरवता आणि थरथरणाऱ्या अंधाऱ्या सावल्या या सर्वांचे मिळून एक चित्र आपल्या मनासमोर साकार होते.

निसर्गाचे भावना संवेदना यांचे ओथंबलेले दर्शन घडवून देत असताना पाडगांवकर आपणास आलेला प्रेमविषयक अनुभवही निसर्गातूनच व्यक्त करतात. प्रेम भावनेचा आविष्कार करताना निसर्गातूनच तो अनुभव प्रकट करतात. 'तू असतीस तर' या कवितेत ते लिहितात -

तू असतीस तर झाले असते
गडे उन्हाचे गोड चांदणे
मोहरले असते मौनातुन
एक दिवाणे नवथर गाणे

यामध्ये प्रेयसीच्या सहवासाची अपेक्षा ते निसर्गातून व्यक्त करतात. अशावेळी त्यांचा प्रेमभाव वेगळा होत नाही. निसर्गातून प्रेमभाव प्रकट करणाऱ्या त्यांच्या या कविता बोरकरांपेक्षाही अधिक एकरुप झालेल्या आहेत असे वाटते.

कवी मंगेश पाडगांवकरांनी मराठीतील निसर्ग कवितेच्या परंपरेला एका वेगळ्या, पुढील वळणावर आणून पोहोचविले आहे असे त्यांच्या या कवितांच्या अभ्यासावरुन वाटते.

पाडगांवकरांच्या कवितेतील अनुभूतीचे विश्व संपन्न असून नवथर प्रीतीच्या स्पर्शापासून तृप्त मीलनापर्यंतच्या भावछटा त्यात सामावल्या आहेत. त्यात सफल प्रीतीच्या तृप्तीचे निःश्वास आहेत तसे विफल प्रीतीचे विकल करणारे उच्छवासही आहेत. प्रेमभावाच्या साध्या, सरळ अभिव्यक्तिपासून ते अत्यंत समिश्र अशा सखोल आणि अनोख्या अनुभवापर्यंत विविध भावछटांची आंदोलने तिच्यातून प्रकट होतात.

एकमेकांकडे आकर्षित होणाऱ्या प्रणयीजनांची अवस्था काहीशी द्विधा होते. त्यांना एकरुप होण्याचीही ओढ असते आणि त्यातही स्वत्व जपण्याची धडपड. 'जवळपणाचे झाले बंधन' या कवितेत याच अवस्थेचे चित्रण आहे. स्वतःचे स्वत्व जागृत ठेऊन परस्पर एकरुपतेची ही अपेक्षा खास वेगळी आहे. हे स्पष्ट करताना कवी म्हणतात -

जवळ जवळ ये, पण सीमेचे भान असू दे
रात्र असो, पण पहाटही वेगळी दिसू दे
स्वरजुळणीतुनी एक गीत—तरि
हवेच अंतर सात सुरातून.

ज्याप्रमाणे फुलाने आपला सुवास कितीही दडवून ठेवला तरी तो दरवळणारच, त्याचप्रमाणे प्रेमिकांनी आपल्या मनाचे भाव एकमेकांपासून कितीही लपवून ठेवले तरी ते प्रकट होणारच हे स्पष्ट करण्यासाठी कवी म्हणतो—

ते किती लपविले तरीही
मज नकळत कळते कळते
पाकळ्यात दडले तरीही
गंधातून गूढ उकलते

निसर्गप्रतिमांतून प्रेमप्रकटीकरण करण्याची पाडगांवकरांची कुशलता अविस्मरणीय अशी आहे.

कॉलेज जीवनातील सुखद स्मृतींचं वर्णनही त्यांनी 'अलगूज' 'मज नव्हते ठाऊक' या कवितांतून केले आहे. पतिपत्नीच्या जीवनातील नाजूक प्रेमाचे भावसंबंधही कवीने अतिशय सुंदर रीतीने 'पांघरुण' सारख्या कवितेतून चित्रीत केला आहे.

प्रियकराच्या जीवनात होणाऱ्या प्रेयसीच्या 'काल्पनिक' स्पर्शाने जणूकाही त्याचा भविष्यकाळच उज्ज्वल होणार आहे असे त्याला वाटते. तिच्या मिलनाच्या सुखद कल्पनेने तो भारावून जातो. तिच्या प्राप्तीने 'पूर्ण मनोकामना' अशी मनोमन तृप्ती त्याला लाभते आणि प्रत्यक्षात प्रिया मीलन न होताच त्याचा आनंद त्याला होतो. म्हणून तो म्हणतो–

आज तुझ्या रुपातून
झाला अरुपाचा भास
उरी पहाटे आधीच
जाग आली प्रकाशास

प्रियकराच्या जीवनात घडलेला हा चमत्कार फक्त स्वप्नातच होवू शकतो. असे प्रेमातील स्वप्नमय जीवनही पाडगांवकरांनी मोठ्या कलात्मकतेनं रेखाटलं आहे.

जीवन जगण्याची कल्पना प्रत्येक व्यक्तीच्या अनुभवानुसार बदलत असते. कवींसारख्या हळूवार प्रवृत्तीच्या, प्रतिभावंताच्या मनातील विचार त्याच्या निर्मितीमधून म्हणजेच त्याच्या कवितेतून प्रकट होत असतात.

'जिप्सी' या काव्य संग्रहातील काही कवितांतून पाडगांवकरांचा जीवन विषयक दृष्टीकोन स्पष्ट होतो. त्यामुळे त्यांच्या व्यक्तीत्वावर देखील प्रकाश पडतो.

'ब्रह्मसत्य जगन्मिथ्या' या रुढ कल्पनेस धक्का देणारा विचार पाडगांवकरांनी 'जय जय हे पार्थिवते' या कवितेत मांडला आहे. तर "एखादे वेळी पायी काटे बोचले तरी अथवा दुःखाने घेरले तरी अंधार पिऊन चांदण्याचा वर्षाव करण्यातच, स्वतःचें दुःख विसरुन दुसऱ्याला आनंद देण्यातच जीवनाचा खरा आनंद आहे." हा तत्वविचार "आनंदयात्री" या कवितेत मांडला आहे. जन्म आणि मृत्यु, सुख आणि दुःख यांचे ऋतुचक्र सदैव फिरत असतेच. पण या परिस्थितीत सुद्धा जगण्याची जिद्द कविच्या मनात आहे. 'गाणे' या कवितेत कवी म्हणतो–या जगात सर्वत्र विनाशच भरुन राहिला आहे. घराघरातून व मनामनातून ज्या मूर्तींची पूजा केली त्या सर्वांचे दगड झाले, युद्धाचे वारे सर्वत्र वाहू लागले त्यामुळें प्रत्येकजण आपल्या सुकलेल्या स्वप्नांना जगापासून चोरुन ठेवत जगत आहे. पण अशा या निराश, उदास वातावरणातही कवीचा जीवंतपणा, सौंदर्यवृत्ती मेलेली नाही कारण–

वसंतात पण या झाडांना
येती बघ ना हिरवी पानें
म्हणूनि तरळतें अजूनही ओठावर गाणें.

कवीचे मन, वृत्ती त्याच्या कवितेत स्पष्ट होत असल्यामुळे कवीची कविता म्हणजें त्यांचे जीवनभाष्यच होय असे म्हणावयास हरकत नाहीं "Who touches my book touches my heart" असे एका इंग्रजी कवीने म्हटले आहे, त्याचा मतीतार्थ हाच.

'सामाजिक जाणिवेचे काव्य' हा एक स्वतंत्र काव्यप्रकार आहे. सामाजिक कवितेची परंपरा आधुनिक मराठी कवितेत केशवसुतांपासून सुरू झाली. सामाजिकता हे मंगेश पाडगावकरांच्या कवितेचे खास वैशिष्ठ्य आहे असे मात्र म्हणता येणार नाही. परंतु त्यांच्या काही कवितात सामाजिकतेच्या

जाणिवेचा आविष्कार झाला आहे यात शंकाच नाही. 'पळवाट' या कवितेत समाजातील अनेक अनिष्ट प्रवृत्तीवर टिकेची झोड उठविली आहे. एक काळ असा होता की माणूस समाजामध्ये सन्मानाने जगत होता. योग्य मार्गाने उपजीविकेची साधने त्याला उपलब्ध होत होती. पण आज प्रत्येकजण राजमार्ग सोडून आडमार्गांचा अवलंब करत आहे. प्रत्येक गोष्टीत पळवाट शोधली जात आहे. म्हणून कवी उपहासाने म्हणतात–

नको प्रकाशाची वाट, नको अमृताची वाट
फक्त हवी पळवाट, नवी नवी पळवाट !

भारतीय संस्कृती जगात आदर्श मानली जात होती. हळूहळू आम्हाला आमच्या संस्कृतीचा, आमच्या श्रेष्ठ परंपरेचा विसर पडला. 'जुनं ते सोनं' ही भावना नष्ट होऊन प्रत्येक जुनी वस्तू चेष्टेचा विषय होवू लागली. हे सर्व पाहून कवीला संताप येतो. कोणतीच जुनी गोष्ट आम्हाला नको आहे. क्रौंचवध, वाल्मीकीरामायण यांचा आम्हाला विसर पडत चालला आहे. आज सहा पानात सात खून पडणाऱ्या रहस्यकथा बाजारात चालतात. पदयात्रा काढून सौंदर्याचा आस्वाद घेण्यापेक्षा व पायांना त्रास देण्यापेक्षा आजचा युवक थिएटरांच्या पुढे तिकीटांसाठी रांगा लावतो. आजच्या संस्कृतीची व्याख्या करताना पाडगांवकर म्हणतात–

आज संस्कृती म्हणजे रेशमचा बुशकोट
ज्याच्यावरती विचित्र हत्ती, घोडे आणि उंट
आता संस्कृती म्हणजे लाल रंगलेले ओठ
आता संस्कृती म्हणजे प्रचार नि जाहिरात.

'कसरत' या कवितेत सामाजिक तिरस्काराचे, उपहासाचे रुप प्रकट झाले आहे. मनात जपलेला चंद्र आणि सामाजिक व्यवहारातील रुपयाचे सत्यस्वरुप यातील विसंगती किंवा त्यांची सांगड साधण्याचा कवींनी केलेला प्रयत्न कौतुकास्पद आहे. अशाप्रकारे पाडगांवकरांच्या सामाजिक कवितांचा देखील अभ्यास व पाडगांवकरांची सामाजिक मनोवृत्ती आपणाला समजून येते.

याशिवाय त्यानी ईश्वरविषयक, गूढगुंजनपर अशाही काव्याची निर्मिती केली आहे. त्यांची काही गीतेही अतिशय श्रवणीय अशी आहेत.

अशी ही पाडगावकरांच्या काव्यातील विविधता व त्या विविधतेतून त्यांची विकसित झालेली मनोवृत्ती दिसून येते. ★★★

# दूरदर्शन रामायण मालिका : एक दृष्टिक्षेप

**विनायक ठाकूर**
तृतीय वर्ष कला

दिवस रविवारचा. वेळ - सकाळचे ९ वाजून ३० मिनिटे. दूरदर्शनसंच असलेल्या प्रत्येक घरात माणसांची अतोनात गर्दी. टी. व्ही. पहाण्यासाठी पाय आणि माना उंचावून चाललेली प्रत्येकाची धडपड, गर्दीला सरावलेले घर मालक बैठक व्यवस्था करीत आहेत. जागा मिळेल तेथे प्रत्येक जण शरीराची पर्वा न करता उभा राहतो आहे. उद्देश फक्त एकच. टी. व्ही. चा छोटा पडदा दोन डोळ्यांच्या कक्षेत आला पाहिजे. बस्स ! ही सारी धडपड कशासाठी ? वेगळे सांगायला नको. आम्हाला गेलं वर्षभर अक्षरशः वेड लावलं, त्या तुफान लोकप्रिय रामायण मालिकेचा पुढचा भाग पाहण्यासाठी. गेलं वर्षभर रविवार नेहमी नवे चैतन्य घेऊन यायचा. दिवस उजाडला की सर्व मंडळी आन्हीके आटोपून ९.३० पूर्वी तयार ! स्वतःच्या घरात टी. व्ही. असला तर प्रश्नच मिटला, अन्यथा जिथं तो असेल तिकडे पाय वळलेच म्हणून समजा.

मग तिथे ओळख असो अथवा नसो, सरळ घुसखोरी करायची.

३१ जुलै ८८ लाही चित्र याहून वेगळं नव्हतं. तीच गर्दी, तीच उत्सुकता, सगळं तेच आणि तसंच, मात्र तरीही रोजच्या पेक्षा किंचित काहीतरी वेगळं होतं. हेही तितकंच खरं. काय वेगळं होतं? हेच की आज रामायण मालिकेचा शेवटचा भाग प्रसारित होणार होता. या समाप्तीच्याच जाणीवेमुळे मनाला कुठेतरी हुरहुर वाटत होती. ' रामायणा ' विना पुढील रविवार सुने-सुने वाटणार ही उदासवाणी जाणीव मनात पिंगा घालत होती. समोर टी. व्ही वरचा शेवटचा भरत-भेट, राज्याभिषेकाचा हा भाग पहाताना फक्त डोळेच टी. व्ही. कडे होते, मन विचारांच्या आवर्तात इतस्ततः भरकटत होतं. रामायणाची लोकप्रियता त्यातील पात्रांच्या मुलाखती, भूमिका, चमत्कार, संवाद, बुजुर्गांच्या प्रतिक्रिया इ. एक ना अनेक आठवणींचे काहूर मनात दाटले होते. एक मन विचारीत होतं, ' खरंच गेलं वर्षभर रामायण पाहून आपण काय मिळवलं ? खरंच नक्की काय मिळविलं ?

अवखळ मनाच्या या प्रश्नाला अनेक उत्तरे होती, आहेत. ही रामायण मालिका पाहून आपण खूप काही नसलं तरी थोडंसं काहीतरी मिळवलं नक्कीच- ते शब्दात सांगणं अशक्य नसलं तरी थोडंसं अवघड आहे. लौकिकार्थानं बोलायच झालं तर ज्ञान, मनोरंजन, सुविचार, आदर्श प्रेम, त्याग, निष्ठा, राजनीती, शौर्य, भक्ती, विरह, मीलन अशा विविध पैलूंचं दर्शन आपणाला या मालिकेने घडविलं. अनेक मानवी स्वभाव वैचित्र्य जवळून पाहायला मिळाली. प्रत्येक व्यक्ती आपल्या स्वभाव वैचित्र्यांमुळे आपल्या परिनं लोकप्रिय झाली. मात्र या सर्व व्यक्तींपेक्षाहो शौर्य, अहंकार, दुष्टपणा. भक्ती, स्वार्थ, सत्तांधता इ. अनेक गुणावगुणांनी युक्त स्वभावाचा रावण हा लोकांच्या जास्त लक्षात राहिला आणि लोकांच्या आदरासही पात्र ठरला. अरविंद त्रिवेदी या नटाने आपल्या अभिनय कौशल्याने ही किमया करुन दाखवली. टी. व्ही. वरील रामायणात ज्या दिवशी रावणवध झाला त्या दिवशी रावणाच्या (अरविंद त्रिवेदी) जन्मगावी लोकांनी शोकाकूल होऊन त्या दिवशी उत्स्फूर्त बंद पाळला. त्या दिवशी सर्व बाजारपेठ बंद ठेवण्यात आली. हे एकच उदाहरण रावणाच्या लोकप्रियतेचे उत्कृष्ट द्योतक आहे.

महर्षि वाल्मीकींच्या रामायणातील ' रावण ' हा प्रत्यक्षात एक खलनायक म्हणून रंगविण्यात आला आहे. त्यामुळे प्रथमतः त्याच्या विषयीचे जनमत हे प्रतिकुलच होतं. या उलट ' श्री राम ' म्हणजे मर्यादा पुरुषोत्तमाचे लोकोत्तर व्यक्तीमत्व म्हणून लोकांच्या अपरंपार आदरास पात्र होऊन देव्हाऱ्यात पूजास्थानी बसलेले. असा विरोधाभास असूनही टी.व्ही.वरच्या रावणाला निर्मात्याने कुशलतेने सादर केल्याने तो सरस वाटला. प्रथमतः निर्माता दिग्दर्शक रामानंद सागर यांनी रावणाची भूमिका आतापर्यंतच्या रामायणकालीन चित्रपटात सादर केली गेली, त्याचप्रमाणे " Loud Method " ने सादर करण्याचे ठरविले होते. पण अभिनेते अरविंद त्रिवेदी यांनी ती " Under play Method " ने करण्याचे ठरविले. त्यामुळेच रावण हा पहिल्यापासून शेवटपर्यंत ' एकसाची ' न वाटता प्रसंगानुसार भिन्न वाटला व त्याच्यातील निद्रिस्त माणसाचे दर्शन प्रसंगोपात आपणास घडले. या उलट इंद्रजीतची (मेघनाद) भूमिका Loud Method ने मांडण्यात आली. त्यामुळे काहिसा मग्रुर, अहंमन्य, फाजील आत्मविश्वासाने वल्गना करणारा, प्रसंगी आपल्या ' पिताश्री ' पेक्षाही वरचढ वाटणारा असा इंद्रजित पहायला मिळाला.

श्रीराम हे जगातील सर्व आदर्श गोष्टींचे मूर्तरुप असल्याने त्या भूमिकेत विशेष वैविध्य नव्हते. गंभीर प्रसंगीही उदास न होणारा, कोणत्याही कठीण संकटांना धीरोदात्तपणे सामोरा जाणारा आणि अंती यशस्वी होणारा, तोच महापुरुष श्रीराम! असेच चित्र कोटी कोटी हिंदूंनी पूर्वीपासून जोपासले आहे.

किंबहुना श्रीराम म्हणजे [illegible] जगातील सर्वोत्तम–उदात्त उन्नत–महन्मंगलतेचा च[illegible]ता–बोलता संगम आहे. अशा समजुतीमुळे सर्वजण त्या[illegible]ा देव मानतात. आणि त्याचा अभिनय कसा अ[illegible]वा याची चौकट ठरलेलीच होती. रावणा[illegible]ा अभिनय मांडणीतील भिन्नतेमुळे वैविध्यपूर्ण व [illegible]टला. स्वतःला श्रीरामा समोरुन माघार घ्यावी [illegible]ागल्याने अस्वस्थ होऊन स्वतःवर चिडलेला राव[illegible], प्रत्येक नव्या योध्दयाची रामवधाची [illegible]तिज्ञा ऐकून क्षणीक संतुष्ट झालेला रावण, कुंभकर्ण, मेघनादसारख्या महारथी योध्दयांच्या मृत्यूने अस[illegible]य अगतिक झालेला आणि मनोधैर्य गमावलेल[illegible] रावण, तत्पूर्वी मेघनादाकडून रा[illegible]–लक्ष्मण नागपाशात बध्द झाल्याचे ऐकून आन[illegible]ाने बेहोश झालेला रावण, अशी रावणाची अ[illegible]नेक रुपे पहायला मिळाली. त्यात रावणाच्य[illegible] उत्कृष्ट अभिनयाचे प्रक्षकांना प्रत्यंतर आले.

दूरदर्शनवरील प्रस्तुत मा[illegible]केने जरी परमावधीची लोकप्रियता मिळविली अस[illegible]ी, तरीही तिला सर्वांगसुंदर म्हणणे एकांगी [illegible]रेल. कारण अशा मोठ्या कार्यामध्ये चांगल्या बरोब[illegible] वाईट असणे हे गृहीतच धरले जाते. किंबहुना थोडे[illegible] मीठ असल्याखेरीज पदार्थास चव येत नाही त[illegible]वतःच हेही. म्हणून अशा ठिकाणी कार्यामागील सद्[illegible]तू लक्षात घेऊन वाईटाकडे दुर्लक्ष केले जाते किंवा ते [illegible]ोत असते.

या मालिकेवर अनेक वृत्त[illegible]ांनी, नियतकालिकांनी प्रासंगिक लेख प्रसिद्ध केले [illegible] आणि आपली मते, व्यक्त केली. काही वृत्तपत्र[illegible]मधून या मालिकेबाबत मान्यवरांच्या प्रतिक्रीया व्य[illegible]क्त करण्यात आल्या. मात्र या सर्व मान्यवरांच्या [illegible]तिक्रिया काहीशा खोडसाळ होत्या. त्यात प्रा[illegible]णिकपणाचा अभावच होता. किंबहुना प्रत्येक मा[illegible]राला आपण कसा तिरकस विचार करतो आ[illegible]हेच जणू वाचकांना दाखवायचे होते. प्रत्येक प्र[illegible]क्रीयेचा रोख बहुधा निर्मात्यावर व त्याच्या कल[illegible]ारांवर होता. अशोक कुमार सारख्या ज्ये[illegible] अभिनेत्यानेतर, "हे सागर रामायण आहे, [illegible]त्यांत काय पहायचे ? सोडून द्या." अशी कुत्सित प्रतिक्रिया व्यक्त केली. काहीजणांनी 'मूळ कथाच चांगली असल्याने त्यात निर्मात्याचे कोणतेही कौशल्य नाही.' असे म्हणून रामानंद सागरांच्या श्रमांना कमी लेखले. पण ही तथाकथीत 'मान्यवरांची' चार मोजकी मते वगळली तर जिच्यासाठी ही मालीका तयार केली गेली, त्या आमजनतेने तिला खुपच असा अपुर्व प्रतिसाद दिला.

रामायणातील काही प्रसंगांमुळे वाद–प्रतिवाद निर्माण झाले. उदा. इंद्रजीताकडून राम–लक्ष्मण सर्पपाशात सापडून बेशुध्द पडणे, श्री शंकराने श्रीरामांना नमस्कार करणे, इ. या वादांचे मुख्य कारण असे सांगता येईल की निर्मात्याने फक्त वाल्मीकी रामयणाशी प्रामाणिक न राहता त्याचे निरनिराळ्या भाषांतील अनुवादही अभ्यासिले व तेही मांडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मूळ कथेत नाही म्हटले तरी थोडासा फेरफार झालाच.

माझ्यामते एखाद्या पौराणिक कथेचे किंवा महाकाव्याचे असे चित्रण करताना निर्मात्याने मूळ कथेलाच जास्त प्राधान्य दिले पाहिजे. त्यावरील इतर टीका कितीही अभ्यासपूर्ण व लोकप्रिय असल्या तरी त्या टीका म्हणजे मूळ कथा होऊ शकत नाहीत. तर ते त्या टिकाकाराचे स्वतःचे मत असते. आणि असे मत प्रदर्शन हे व्यक्ती सापेक्षतेमुळे पूर्वग्रहमुक्त असण्याचा धोका संभवतो. परिणामी मूळ कथेचे सार व पर्यायाने लेखकाचा हेतू हा काहीसा दुर्लक्षिला जातो. म्हणून मूळ कृतीशी निर्मात्याने प्रातारणा करु नये इतकेच पुन्हा सांगावेसे वाटते.

दुसरी एक लोकांची कुजबूज ऐकू येत होती की, श्रीरामांना प्रत्येक वेळी देवांनी मदत केली. त्यामुळे ते रावणावर विजय मिळवू शकले. अन्यथा रावणच पराक्रमी ठरला असता. तसेच श्रीरामांनी वालीला झाडामागून बाण मारणे, बिभीषणाने धर्माच्या नावाखाली केलेली फितुरी, ब्रह्मदेव, शंकर, इंद्र, गरुड इ. देवतांनी एकाकी रावणाविरुद्ध

प.ला सहाय्य करणे, इ. गोष्टी श्रीरामांच्या
यास लांछीत करतात. या नकारात्मक
कोनालाही उत्तर आहे, ते असे की– श्रीरामांना
ांनी सहाय्य केले हे योग्यच. कारण देव हे
ी न्यायाच्याच व सत्याच्याच बाजूने उभे असतात.
हुता सत्य आणि न्याय म्हणजेच देवत्व आणि
या विरुद्ध ते दानवत्व. म्हणजेच राम व रावण
केवळ व्यक्तींचा लढा नसून तो या दोन पूर्वापार
त आलेल्या परस्पर विरोधी प्रवृतीचा लढा
. आणि वाल्मीकींनी त्याचे प्रतीकात्मक
(ymbolic) वर्णन केलेले असावे असा व्यापक
प्राप्त होतो. अंतीम विजय सत्याचाच
त्याने नेंहमीच सत्प्रवृत्ती म्हणजेच देवत्व
स्वी झाले.

रामांनी वालीला झाडामागून बाण मारणे हे
तदर्शनी अप्रीय वाटत असले, तरी त्यामागचा
हेतू लक्षात घेतला पाहिजे. वाली पडल्यावर जेव्हा
राम त्याच्या जवळ आतात, तेव्हा वाली त्यांना
न बार मारल्याबद्दल कटू वचने बोलतो. तेव्हाच्या
ंगाला अनुसरुन ' गीतरामायणात ' ग. दि.
डगूळकरानी श्रीरामांच्या मुखातून दिलेले उत्तर
र मार्मिक आहे

" मी धर्माचे केले पालन
वाली वध ना खल निर्दालन. "

णजेच वाली वध हे केवळ निमित्त असून
टांचे निर्दालन करणे हाच त्यामागील सद्हेतू
ता श्रीरामांना ' धर्म युध्द नव्हे हे ' असे
ाणारा वाली स्वत: कोणता धर्म पाळीत होता?
ासनेच्या आहारी जाऊन रागाच्या भरात त्याने
त्राप्रमाणे असलेंल्या आपल्या धाकट्या भावाची
ग्रीवाची पत्नी पळवून नेली होती त्याचे हे वर्तन
शूसमान होते. असा हा वासनांध वाली , स्वत:
अधर्माने वागून मृत्यू जवळ आल्यावर धर्माच्या
ोष्टी बोलू लागला तेव्हा श्रीराम त्याला म्हणाले

" तू तर पुतळा मूर्त मदाचा
सुयोग्य तूज हा दंड वधाचा
अंत असा हा विषयांधांच "
मरण पशूचे पारध होऊन "

श्रीरामांचें हे मार्मिक वक्तव्य खरोखरच स्मिर्म
करणारे आहे. दूरदर्शन वरील रामायण मालि
आम्हाला अंतर्मुख होऊन इतका विचार करण्य
प्रवृत्त केले.

आणखी एक महत्वाचे म्हणजें रामायणातील
पात्रांकडें आजवर आम्ही केवळ दैवी अवतार
एका विशिष्ट दृष्टीकोनातूनच पाहात होतो.
आपणाला श्रीराम, लक्ष्मण इ. ची एकच बा
दिसली परंतू दूरदर्शन वरील रामायणामुळे
ह्यां पात्रांना केवळ देवता न समजता त्याच
माणूस म्हणून. पहाण्याची दृष्टी आम्हाला र
लोकमान्यांनी म्हटण्याप्रमाणे" कोणताही म
सर्वथैव निर्दोष असणे कठीण आहे " म्हणजे
मनुष्याच्या हातून केव्हा ना केव्हा चूका होत
तरीही आपले आचार विचार हे जर पवित्र
तर नराचा नारायण होऊ शकतो म्हणून एक
मनुष्य म्हणून श्रीरामाकडे पाहिल्यास त्यांच
घडलेले काही आक्षेपार्ह प्रसंग आपणास नेह
प्रमाणे एखाद्या मनुष्याच्या हातून घडलेल्या
गोष्टीप्रमाने स्वाभाविक वाटतात परंतू या
दृष्टी निकोप असणे महत्वाचें अन्यथा " दृष
मार्ग विचार उभा राहीला की दृष्टयाचा अ
बदलतो, " त्याप्रमाणे देवता म्हणून श्रीरा
पाहिल्यास त्यांच्या हातून घडलेल्या चुका
वाटतील. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पा
की कोणताही मनुष्य जन्मत:च देवत्व घेऊन
किंवा त्याला ते उपजत मिळत नाही खडत
तपश्चर्येने ते मिळवावे लागते. म्हणूनच
अग्नीदिव्ये करुन, छन्नी हातोड्याचे घाव
तावून–सुलाखुन निघावे लागते तेव्हाच ल
आकार प्राप्त होतो, दगडाचा देव होतो.
मिळवणें आणि मग ते टिकविणे ह्या
महत्प्रयासाच्या गोष्टी आहेत.

" जया अंगी मोठेपण तया यातना कठिण "
ही उक्ती तर सर्वश्रृतच आहे.

" रामायण वाचुनिया नंतर
बोध कोणता घ्यावा आपण
श्री रामासम मिळता नायक
वानर सुद्धा मारीती रावण "

असे कविवर्य विंदा. करंदीकरांनी म्हटले आहे.

श्रीरामांसारख्या लोकोत्तर व्यक्तिमत्वालाही देवत्व प्राप्त करुन घेण्यासाठी चौदा वर्षे वनवास, राजत्याग, मातृ–पितृ–पत्नी विरह, मनस्ताप लोकनिंदा असे अपरंपार कष्ट सहन करावे लागले. मग आपल्या सारख्या सर्वसामान्य जनांची काय कथा? आणि त्यांच्या तुलनेने आपण कुठे आहोत? हे प्रत्येकाने स्वतःशीच पडताळून पहावे म्हणजे झाले.

★★★

# धर्म आणि लोकशाही

रघुनाथ चव्हाण
तृतीय वर्ष वाणिज्य

आपल्या समाज, राजकारण, सांस्कृतिक जीवनावर धर्माचा जबरदस्त प्रभाव आहे. आपल्या तत्व विचारात परिवर्तनाची वृत्ती अजिबात नाही. असे एका थोर व्यक्तीने म्हटले आहे. धर्म ही वैयक्तिक उपासनेची बाब आहे. ते हत्यार म्हणून वापरले जाते, ते योग्य आहे का ? याचा विचार करताना प्रथम धर्म म्हणजे काय हे पाहिले पाहिजे.

**धर्म म्हणजे काय ?**

धर्म म्हणजे समाजातील, देशातील किंवा जगाच्या पाठीवर अस्तित्वात असलेला असा एक विशाल मानवगट की जो ठराविक नितीमूल्यांनी, संस्कारांनी रुढींनी आणि विचारांनी विशिष्ट वर्तनाशी बांधला गेलेला आहे.

**धर्माला सध्याच्या युगात असणारे स्थान**

जगात अनेक देशात अनेक धर्म अस्तित्वात आहेत. मग ते हिंदू,मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध कोणतेही असोत. प्रत्येक धर्माची कार्यप्रणाली थोडयाफार फरकाने समान आहे.
परंतु आजपर्यंत धर्म हे एक ' साधन ' म्हणून त्याचा उपयोग करुन घेतलेला आहे. राष्ट्रासमोरचे प्रश्न म्हणजेच बेकारी, शिक्षण यांचा विचार केला गेला पाहिजे. परंतु धर्मामुळे मूळ प्रश्नाला बगल दिली जाते. त्याचा साधन म्हणून विचार केला जातो. धर्म हे दुधारी शस्त्र आहे. नैतिक मूल्यांसाठी, सद्गुणोपासनेसाठी ते वापरले जात होते. पण संघर्षासाठी सुद्धा ते उपयोगात आणता येते. हें आज आपल्याला दिसत आहे.

**लोकशाही म्हणजे काय ?**

लोकशाही म्हणजे 'लोकांच्या इच्छेनुसार, लोकांनी बनवलेल्या योग्य आणि नैतिकता समाविष्टीत कायद्याने चालणारे राज्य.'
देशाची शासनव्यवस्था लोकशाही व न्यायाधिष्ठित मार्गाने चालावी या करता ही जबाबदारी न्यायसंस्थेवर, शासनयंत्रणेवर टाकण्यात आलेली असते.

धर्म आणि लोकशाही या दोन्ही संकल्पना लक्षात घेतल्यानंतर या दोहोंतील भेद कोणते आहेत, हे समजाऊन घेणे आवश्यक आहे.
सर्वसाधारणपणे समाजाची धारण करतो तो म्हणजे धर्म, असे मानले जाते. तरीही समाजाचो कर्तव्ये

ज्याच्यामध्ये सांगितली आहेत तो म्हणजे धर्म हे सुद्धा तितकेच खरे आहे. असे असले तरी धर्मग्रंथ हे धर्माचे केंद्रबिंदू मानले जात आहेत. धर्मग्रंथामध्ये जे तत्वज्ञान सांगितले आहे, त्याच्याशी धार्मिक लोक बांधले गेलेले असतात, म्हणजेच धर्माधिष्ठित राष्ट्रात व्यक्तिस्वातंत्र्य शिल्लक रहात नाही.

जी राष्ट्रे धर्माधिष्ठित आहेत, धर्माचा आधार घेऊन चाललेली आहेत, त्या राष्ट्रात एकतंत्री कारभार चालत असतो असे म्हटल्यास मुळीच वावगे ठरणार नाही.
मात्र लोकशाही राष्ट्रात धर्म ही संकल्पना बसत नाही. कारण धर्माधिष्ठित राष्ट्रात व्यक्ती स्वातंत्र्य शिल्लक राहात नाही. मुळात लोकशाहीमधील शासनयंत्रणा लोकशाही व न्यायाधिष्ठित मार्गाने चालत असते. त्यामुळे माणूस किंवा समाजातील कोणताही मानवी घटक स्वातंत्र्यपूर्ण जीवन जगू शकतो, त्यामुळे लोकशाहीत व्यक्तिस्वातंत्र्य हे असते.

लोकशाही राष्ट्रात संपूर्ण मानव गटाला त्यांच्या हितांचे, हक्कांचे रक्षण करण्याकरता, अत्याचाराविरुद्ध जाब विचारण्याकरिता व्यक्तिला स्वातंत्र्य मिळालेले असते.
लोकशाही राष्ट्रांमधील कारभार किंवा कोणत्याही क्षेत्रामधील प्रवेश हा सार्वत्रिक स्वरुपाचा असतो, एकतंत्री नसतो.

## धर्मामध्ये विभाजनाची बीजे

हिंदू हेच देशाचे नागरिक किंवा ख्रिश्चन, बौद्ध, मुस्लीम हेच देशाचे नागरिक अशी व्याख्या त्या त्या देशाला धोकादायक आहे. या व्याख्येनुसार संबंधित धर्म वगळता इतर धर्मिय लोक नागरिकत्वातून बाद होतील.
जर्मनीमध्ये हिटलरने ज्यू धर्मियांची कत्तल केली, हे कशाचे प्रतीक आहे? धर्मांधतेचे! हिंदुस्थानची १९४७ साली फाळणी झाली, पाकिस्तान–भारत ही दोन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण झाली. पाकिस्तानमध्ये असलेल्या असंख्य हिंदू धर्मियांचा मुस्लिमांनी अमानुषपणे छळ, कत्तल केली, दंगली घडवून आणल्या. हे कशाचे प्रतीक आहे? हे सुद्धा धर्मांधतेचेच प्रतीक आहे.
सध्या भारतात हिंदू–मुस्लीम असे कडवे जातीय दंगे, संघर्ष चालू आहेत. हिंदू–मुस्लीम एकमेकांना एकमेकांचे कट्टर वैरी समजत आहेत. याचे कारण काय ? धर्माचा अतिरेक हेच याचे प्रमुख कारण आहे. सध्या पंजाबमध्ये दंगे, कत्तली चालू आहेत. तेथील काही लोक शीख हा स्वतंत्र धर्म समजू लागले आहेत, जो मुळात हिंदू धर्मातील एक पंथ आहे.

या साऱ्या गोष्टी म्हणजे राष्ट्र विभाजनाची प्रतिके आहेत. कारण त्यात राष्ट्र विभाजनाची खोलवर बीजे रुजली आहेत, ज्याला अधिक खतपाणी घातले जात आहे.

## हिंदूत्व आणि राष्ट्रीयत्व

आज संपूर्ण भारतामध्ये 'गर्व से कहो, हम हिंदू है,' आणि 'गर्व से कहो, हम मुस्लीम है,' या द्वंद्वामधला विचाराचा मागोवा घेण्याचा प्रयत्न चाललेला आहे.
आज हिंदूत्व म्हणजे राष्ट्रीयत्व, असा नवीन विचार दृढ होवू पहात आहे. ही राष्ट्रीयत्वाची कल्पना अलिकडची आहे. मग राष्ट्रीयत्व म्हणजे काय ? वेगवेगळ्या धर्मांनी एकत्र आलेला समाज म्हणजे राष्ट्रीयत्व होय.'

संकटाच्या वेळीच एकत्र येणे म्हणजे राष्ट्रीयत्व न मानता सुख, समाधानाने जगताना सुद्धा एकत्र येणे म्हणजे राष्ट्रीयत्व. बंधुभाव अधिष्ठीत राष्ट्र ते राष्ट्रीयत्व. पण आज राष्ट्रीयत्वाच्या कल्पना कठीण, कठोर झालेल्या दिसतात.

धर्माधिष्ठित राष्ट्र ही कल्पना कालविसंगत आहे. राष्ट्रीयत्वाच्या संदर्भात ते पूर्ण अवास्तव आहे. आपल्या भारत देशाच्या संविधानाने 'धर्म निरपेक्ष राष्ट्र' एकदा मान्य केल्यानंतर धार्मिकतेच्या दृष्टिकोनातून घोषणा देणे हे न पटणारे आहे. कारण धर्मांतर म्हणजे नक्कीच राष्ट्रांतर नव्हे.

राष्ट्राचे खरे आदर्श राष्ट्र बनण्यासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुभाव देशात निर्माण झाला पाहिजे. सध्यकालीन स्थिती पाहता लोकशाहीमध्ये आज सत्ता काबीज करण्यासाठी धर्माचा आधार घेतला जात आहे.

याच तत्वावर जर राष्ट्राची यंत्रणा चालत राहिली तर त्याचे भीषण आणि दूरगामी परिणाम घडून येतील. देशामध्ये जातीयता वाद, भाषावाद, प्रांतवाद, धर्मवाद निर्माण होऊन देश विभाजनाच्या एका महाभयंकर दरीकडे वाटचाल करेल.

**लोकशाही: दृष्टिकोन व विकास**

आज जगातील असंख्य राष्ट्रांनी लोकशाही शासन यंत्रणेचा स्वीकार केलेला आहे. लोकशाहीधिष्ठीत राष्ट्रांत व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक स्वातंत्र्य तसेच समता, बंधुभाव या भावना अस्तित्वात राहतात. लोकशाहीतील समानतेमुळे जातीभेद, भाषाभेद, प्रांतभेद, धर्मभेद, वर्णभेद अस्तित्वात राहू शकत नाहीत.

आज निकोप लोकशाही वृत्तीची जोपासना होणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता – जी लोकशाहीची मूलभूत मूल्ये आहेत, त्यांची जोपासना होणे व मूल्यांची प्रखरता जाणवणे अत्यावश्यक आहे. आज जगातील प्रत्येक राष्ट्रात औद्योगिकरणाची लाट आलेली आहे. औद्योगिकरणाबरोबरच वैज्ञानिक प्रगती घडून येत आहे. या साऱ्या गोष्टींचे आणि लोकशाहीच्या तत्त्वांचे जवळचे संबंध आहेत, पर्यायाने लोकशाही हे मानव घटकाचे एक महत्वाचे अंग ठरले आहे.

राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक गरजा सोडवण्यासाठी जीवनाचा विचार धर्मापलिकडे जाऊन लोकशाहीच्या निकोप दृष्टीकोनातून केला गेला पाहिजे.

★★★

# २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावरील भारत

**मनिषा वेलणकर**
प्रथम वर्ष कला

" आकांक्षा पुढती जिथे गगन ठेंगणे " असं श्री. कृ. कोल्हटकरांनी म्हटलेलं आहे. सध्याची भारताची औद्योगिक प्रगती पहाता खरंच २१ व्या शतकाकडे जाण्यास सज्ज असलेल्या भारताचे हे स्वप्न साकार होईल का ? असं मला वाटतं. भारतात सध्या संगणक बहुतांशी ठिकाणी पोहोचला आहे. आता फक्त २१ व्या शतकाचीच तो चातकासारखी वाट पहात आहे.

एवंगुणविशिष्ठ संगणक महाराज आखूड शिंगी बहुदुधी गायीप्रमाणेच सर्वांचे लाडके होऊन आज अनेक क्षेत्रात स्थापना होत आहे. मे महिना आला की, आमच्या चार्टर्ड अकौंटंसी कंपनीत रात्र-रात्र काम करावं लागतं. सर्वच क्लायंट्सचे रिटर्न्स तयार करता करता, आकडेमोड करुन मेन्दुला मुंग्या येतात' अशा प्रकारचे बोल आपणास नेहमी ऐकावयास मिळतात. ही चित्रं आता लवकरच भूतकाळात जमा होणार आहेत. इलेक्ट्रॉनिक्स युगाने आपला पगडा सर्वत्र बसवला आहे. भारतासारख्या विकसनशील देशातही चाचपडत का असेना परंतु साशंकपणे त्याने प्रवेश केला आहे. १९९० पर्यन्त ऑफिसात कागदाचा कपटाही ठेवला नाही तरी चालेल असेही आता म्हटले जाते. कारण सर्व माहिती आता वर्ड प्रोसेसरमध्ये साठवलेली रहाते. माहितीची जणू काही बँकच स्थापन होईल आणि आपल्याला हवी तेव्हा ती माहिती मिळविता येईल.

आज २० व्या शतकाच्या जवळजवळ अखेरीस अत्याधुनिक तंत्रज्ञान, संगणकाचे बहुमोल सहाय्य यामुळे हवा तो माल ग्राहकांसाठी निर्माण करण्याची

क्षमता आता आली आहे. साचेबंद उत्पादन आणि साचेबंद विक्री ही पध्दतही जवळजवळ नष्ट होऊ लागली आहे. आपल्या आवडीप्रमाणे १०-२० प्रकारच्या मोटारी मिळू लागल्या आहेत. त्यांच्या किंमतीही वेगवेगळ्याअसल्याने संस्कृतीतसुध्दा हरतऱ्हेचे वर्ग निर्माण होतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका यांच्या संस्कृतीत असणारे बरेच मोठे अंतर हे आहे.

नवशतकात पाऊल ठेवताना शिक्षणाला नवी दिशा द्यावयास पाहिजे. शिक्षणामध्ये राजकीय स्पर्धा, समाजसेवा, खेळ इ. चा समावेश केला पाहिजे. तसेच संशोधन आणि प्रसारमाध्यमांची पुनर्रचना करावयास पाहिजे. सध्याची प्रसारमाध्यमं काही बाबतीत असमर्थ ठरत आहेत. राजकारणापासून संगीतापर्यंत मतवैविध्य वाढविलं पाहिजे आणि त्यासाठी दिल्लीपासून गल्लीपर्यंत प्रत्येकाकडे रेडिओ, टी.व्ही. असणे अत्यंत आवश्यक आहे.

भारताची वाढती लोकसंख्या लक्षात घेता तसेच मनुष्यबळ, दळणवळण साधने, नैसर्गिक साधन संपत्ती, आर्थिक असमतोल, सर्वसामान्य माणसाची शारीरिक आणि वैचारिक कुवत या सर्वांचा विचार आपल्या राज्यकर्त्यांनी करावयास हवा अशी अपेक्षा कुणीही धरणे अगदी साहजिक आहे. आणि अशी अपेक्षा कुणी केली तर ती गैर ठरविता येणार नाही.

येथील समाजवादी समाजरचनेचा घोष करणारे राजकीय पक्ष आणि आणीबाणीनंतरच्या अडीच वर्षांचा काळ वगळता विद्यमान सत्ताधारी पक्ष समाजवादी रचनेच्या दृष्टिने राष्ट्राची आगेकूच करण्यास कटिबद्ध आहे असे सांगून ' गरिबी हटाव ' सारख्या घोषणा करुन मोठ्या अहंभावाने आणि बहुमताने सत्तेवर रहातो. परंतु आपल्या देशातील वाढत्या लोकसंख्येला दोन वेळेस पुरेसे अन्नही मिळू शकत नाही. त्यासाठी परकीय देशांकडून मोठ्या प्रमाणावर अन्नधान्य, खनिजतेल वगैरेची आयात करावी लागते. आपल्या देशावर कर्जाचा बोजा इतका जास्त आहे की, मार्च ८८ अखेर भारताला जवळजवळ ५५ कोटी रु. चे कर्ज आहे. २१ व्या शतकात पाऊल ठेवताना कर्जाच्या ओझ्याने दबत-दबत पाऊल टाकायचे की, अभिमान, स्वाभिमानाने ताठ मानेने ? याचा विचार डोकं ठिकाणावर ठेऊन सर्वांनी केला पाहिजे.

या सर्वांच्याही आधी म्हणजे १९५१ पासून पंचवार्षिक योजना राबविल्या गेल्या पाहिजे असे सरकारचे धोरण होते. त्याही राबविल्या गेल्या. परंतु त्याचाही विशेष असा उपयोग झालेला दिसत नाही. त्याही अयशस्वीच ठरल्या. या सर्वांचा परिपूर्ण विचार राज्यकर्त्यांनी प्रथम केला पाहिजे. गेल्याच वर्षी म्हणजे १९८७ मध्ये ' शून्याधारित अर्थसंकल्प ' ही नवीन योजना महाराष्ट्रात राबविण्यात आली. परंतु ही योजनाही पाहिजे तेवढी यशस्वी झाली नाही.

भारतासारख्या विकसनशील देशात आज इतकी विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे की माणूस जेव्हा प्रथम शेतीकडे वळला तेव्हाचे उत्पादन हात व स्नायू यांच्याशी निगडीत होतं. उत्पादक आणि ग्राहक यांचा प्रत्यक्ष संबंध येत होता. पण औद्योगिक क्रांतीच्या कालखंडात ही उत्पादन व्यवस्था बदलून एकसारख्या साचेबंद उत्पादनाची वृद्धी झाली. पुढे येणाऱ्या शतकातील मानव तीव्र संवेदनाशील होईल, कलेमध्ये कृत्रिमता येईल, यांत्रिकता, साचेबंदपणा येईल असं जे औद्योगिक काळात वाटत होते ते आता खोटं ठरु पहात आहे. सध्याच्या ज्या अत्यंत ढोबळ, कल्पकतेचा अभाव असलेल्या जुन्या कायदेपद्धती आहेत, त्यामध्ये बदल होईल आणि वीर्य शीतपेटीत ठेवून, बापाच्या मृत्यूनंतर 'टेस्ट टयूब बेबीचा जन्म ' हा कायदेशीर मानावा लागेल.

२१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर असताना आज सगणकाद्वारे नव्हे तर बंदुकीच्या गोळीने आपण प्रश्न सोडवू पहात आहोत. विघटीत आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या समाजात बहुमतावर चालणारी राजकीय पद्धती किती प्रमाणात चालेल ? असा प्रश्न पडला आहे.

महत्त्वाच्या विषयावर मतप्रदर्शन करणार आहेत.

"बहु असोत सुंदर, संपन्न की महा।
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥"

या ओळी पुन्हा भारत संपन्न होणेबाबत खऱ्या ठरु पहात आहेत. २१ व्या नवयुगात पदार्पण करताना ' वाढता वाढता वाढे भेदीले शून्यमंडळा ' असा भीमरुपी लघुकायी संगणक आपल्या परिसराचा भाग बनून गेलेला असणार !

★★★

प्रवास वर्णन

# १)पूण्यभूमी । गोमंतभूमी ।।

**संजीवनी शिरसाट**
तृतीय वर्ष कला

शैक्षणिक सहल ! पर्यटनातून ज्ञानार्जन हा शैक्षणिक सहलीचा प्रमुख उद्देश असतो. ज्ञानार्जनाबरोबरच एकमेकांतील हेवेदावे विसरुन, हसण्याखेळण्यासाठी परस्परांना एकत्र आणून नवा आनंद, नवा उन्माद लुटावयास लावणारा प्रसंग म्हणजेच सहल.

अर्थात याला अपवाद न ठरता आम्ही चालू वर्षी तृतीय वर्ष कला इतिहास विभागाची सहल नैसर्गिक सौंदर्याच्या विपुलतेने नटलेल्या आणि इतिहास प्रसिद्ध अशा गोवा या पर्यटनस्थळी नेण्याचे ठरवले. पोर्तुगीजकालीन अवशेष आणि त्या ठिकाणी आता झालेली प्रगती याचे अवलोकन करणे हा गोवा स्थळ निवडण्यामागचा उद्देश होता.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी

१४९८ मध्ये वास्को-द-गामाने भारताचा शोध लावल्यानंतर समुद्रमार्गे पोर्तुगीज भारतात आले आणि १५१० मध्ये त्यांनी गोवा हीच आपली राजधानी बनविली. पोर्तुगीजांची सत्ता हिंदुस्थानात व गोव्यात स्थापन करण्याचे श्रेय अल्बुकर्कला द्यावे लागेल. त्यानंतर जवळ जवळ ४०० वर्षे गोव्यावर पोर्तुगीजांचे वर्चस्व होते. भारताच्या स्वातंत्र्यानंतर १९६० मध्ये शेवटी गोवा प्रदेश पोर्तुगीजांकडून भारताने जिंकून घेतला अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेला गोवा प्रदेश सहलीसाठी निवडणे आम्हाला अधिक संयुक्तिक वाटले. त्यानिमित्ताने या सहलीबाबत आम्हाला आलेले अनुभव सांगण्याचा हा छोटासा प्रयत्न.

## राजधानी पणजी

३ मार्च रोजी देवगड-पणजी या पहाटेच्या गाडीने आम्ही गोव्याकडे निघालो. वाटेत शक्य होतील तेवढे थांबे आमच्या एक्सप्रेस (!) गाडीने घेतले. कणकवली, कुडाळ, सावंतवाडीमार्गे आम्ही बेती पर्यंत गेलो. पलीकडे दिसणारं भव्य व सुंदर पणजी शहर, तेथील गगनचुंबी इमारती, निसर्ग सौंदर्य पाहून तेथे पोहोचण्याची आमची उत्कंठा क्षणाक्षणाला वाढत होती. तथापि, आम्हाला आता बसमधून उतरणं अपरिहार्य होतं. कारण समोरच शिल्लक राहिलेले अवशेष सांभाळीत मांडवी पूल कोसळलेल्या स्थितीत उभा होता. मांडवी पूल कोसळल्याने गोवा सरकारने बेती ते पणजी प्रवाशांची ने-आण करण्यासाठी मोफत फेरीबोटीची व्यवस्था केलेली आहे. या फेरीबोटीतूनच आम्ही पणजीत गेलो. समोरच दिसणारं टुरिस्ट हॉटेल प्रथम दर्शनीच नजरेत भरत होतं. तेथून जवळच असणाऱ्या भारत लॉजवर आम्ही आमचा मुक्काम केला. खाणेपिणे आटोपल्यावर थोडीशी विश्रांती घेऊन आम्ही पणजी पहाण्यासाठी निघालो. आमचे पाय

प्रथम वळले ते मिरामार बीचकडे. मऊ, रेशमी वाळू ल्यालेला तो बीच पहाताना वेगळाच आनंद मिळतो. प्रत्येक बीचवर फॉरीन टूरिस्ट असतातच हे सांगणे नकोच! त्यांचो 'सनबाथ' ही अत्यंत आवडती गोष्ट. या बीचवरील सुरुच्या झाडांची बाग अत्यंत मनमोहक आहे. एव्हाना सूर्य मावळतीला लागला होता. त्यामुळे किरकोळ खरेदी करुन आम्ही तेथून निघालो. येताना आम्ही पणजीत मा. दिनानाथ मंगेशकर नाट्यगृहातील कलादालनात भरविलेलं हस्तकलेचं प्रदर्शन पहायला गेलो. प्रदर्शनात करवंटी, शंख, शिंपले इ. टाकाऊ वस्तुंपासून प्रेक्षणीय तसेच संग्राह्य वस्तू मोठ्या कौशल्याने बनवलेल्या होत्या. या सर्व वस्तू गोव्यातील लोकांच्या कलात्मकतेची साक्ष देत होत्या. ते प्रदर्शन पाहून आम्ही लॉजवर परतलो.

## चर्च-मंदिरांचे वास्तुशिल्प

पर्यटनाच्या दृष्टीने गोव्याचे दक्षिण व उत्तर गोवा असे दोन भाग करण्यात आले आहेत. ४ मार्च यादिवशी आम्ही दक्षिण गोवा दर्शनास निघणार होतो. सकाळी ९ वा. आम्ही एका टूरिस्ट बसने पणजीहून निघालो. प्रथमत: आम्ही Dona Paula पॉईंटवर गेलो. तेथे प्रचंड जनसमुदाय जमलेला दिसला. त्याला कारणही तितकच खरं होतं हे आमच्या नंतर लक्षात आलं 'आझाद देश के गुलाम' या चित्रपटाचं शुटिंग रेखा, ऋषि कपूर, प्राण, प्रेमचोप्रा यांच्या समवेत चालू होतं. तेथील ती गर्दी पाहून आजच्यायुगात माणसाला फिल्मी दुनियेचं किती आकर्षण निर्माण झालं आहे याचा प्रत्यय आला. या पॉईंटवर बऱ्याच चित्रपटांचे शुटिंग झाल्याचे आमच्या टूरिस्ट गाईडने सांगितले.

तद्नंतर आम्ही 'जुना गोवा' पहाण्यासाठी गेलो. तेथील पोर्तुगीजकालीन चर्च प्रसिद्ध आहेत. कट्टर कॅथॉलिक पंथीय पोर्तुगीजांचे सुमारे चारशे वर्षे येथे वास्तव्य होते त्यामुळे येथे चर्चची संख्या फारच दिसते. यापैकीच सेंट कॅथेराईन चर्च हा आशियातील काही मोठ्या चर्चपैकी एक म्हणून ओळखतात. पोर्तुगीज वास्तूशिल्पाचे ते एक महान प्रतीक आहे. यामध्ये सहा ते सातहजार माणसे एकावेळी बसू शकतात.

यावरुन आपणास या चर्चच्या भव्यतेची जाणीव होऊ शकते. सेंट झेवियर यांचा पार्थिव देह येथे ठेवलेला आहे. दर दहा वर्षांनी ३ डिसें. ते ३ फेब्रु. पर्यंत या देहाचे प्रत्यक्ष दर्शन देण्यात येते. या चर्चची प्राचीनता, भव्यता, तेथील शांतता व कुशल नक्षीकाम पाहून मन मोहून जातं. त्यानंतर तेथील सुखद क्षण मनात साठवूनच आम्ही गोव्यातील प्रसिध्द मंगेशी मंदिर, शांतादुर्गा मंदिर रामनाथ मंदिर पाहाण्यासाठी निघालो. शांतादुर्गा व मंगेशी देवालय पाहिल्यानंतर भारतातील हिंदू-संस्कृतीच्या वास्तुशिल्पाच्या वैभवशाली परंपरेची कल्पना आली.

त्यानंतर वास्को-द-गामा हे दक्षिण गोव्यातील आणखी एक सुंदर ठिकाण पहाण्यास गेलो. भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील हे एक प्रमुख नैसर्गिक बंदर आहे. खनिजांची वाहतूक करणाऱ्या महाकाय बोटी बंदरात उभ्या होत्या. सर्वसामान्यांना बंदरात प्रवेश नसल्याने शुकशुकाटच होता. बंदर पाहिल्यानंतर आम्ही कोलवा बीच पहाण्यासाठी गेलो. या सर्व बीचवर शंखशिंपल्यांपासून बनवलेल्या कलाकुसरीच्या वस्तूंची दुकानं, कोल्ड्रिंक्स, आभूषणांची दुकानं यांची हजेरी असायचीच. त्या दिवसातला हा शेवटचा पॉईंट असल्याने आमची गाडी आता पणजीच्या दिशेने निघाली आणि ७ वा. आम्ही पुनश्च लॉजवर येऊन ठेपलो.

## उत्तर गोवा

५ मार्च या दिवशी आम्ही उत्तर गोवा भ्रमंतीसाठी सकाळी ९ वा. निघालो. सर्वप्रथम साखळी येथील दत्तमंदिर, जवळच असलेलं विठ्ठल मंदीर पाहिलं. त्यानंतर नेत्रदिपक सौंदर्य लाभलेला अर्वलेम धबधबा पाहून आम्ही मयेलेककडे वळलो. हे तळे बोटिंगसाठी प्रसिध्द आहे. तळ्यात स्वच्छंद विहार करणारी बदकं सर्वांचं लक्ष आपल्याकडे वेधून घेत होती. ती बदकं पहाताच आम्हालाही जलविहार करण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. त्यामुळे साहजिकच आम्ही बोटिंगच्या आनंदाचा लाभ घेतला. या तळ्याकाठची खास व्यवस्था ठेवून सौंदर्य

टिकवलेली बाग अप्रतिम आहे. तेथून मग आम्ही डिचोली येथे गेलो तेथील ' कापडी भोजनालय ' मध्ये जेवण घेतलं आणि पुढील प्रवासास निघालो.

तेथून आम्ही कळंगुट बीच पहावयास गेलो. हा गोव्यातील सर्वात उत्कृष्ठ बीच आहे. पणजीपासून सुमारे १६ कि. मि. अंतरावर हा बीच आहे. येथे मच्छिमारी नौका आढळत नाहीत. त्यामुळे हा बीच स्वच्छ व सुंदर आहे. त्यानंतर आम्ही अंजूना बीच व बागतोर बीच हे बीचही पाहिले. मऊ, रेशमी वाळू ल्यालेले किनारे, कल्पवृक्षांच्या विपुलतेने नटलेल्या टेकड्या. शंख शिपल्यांच्या वस्तूंची दुकानं, कपड्यांची दुकानं ही या सर्व बीचवरील ठळकवैशिष्ठ्ये आहेत. असे हे सगळे बीच पाहिल्यानंतर आम्ही त्या दिवसातला शेवटचा पॉईंट म्हणजे अग्वाद किल्ला बघण्यासाठी वळलो. हा मार्ग चांगलाच विकसित आहे. या किल्ल्यात सध्या सेंट्रल जेल आहे.

## सुखकर प्रवासी वाहतूक

एकंदरीत या दोन-तीन दिवसांच्या गोवा- दर्शनात आमच्या जे निदर्शनास आलं ते म्हणजे येथे गोवा शासनप्रणित कदंबा महामंडळाच्या बसेस व खाजगी कंपन्यांची वाहतूक व्यवस्था आढळली. खाजगी वहातूक कंपन्या मोठ्या प्रमाणात असल्याने तेथील वाहतूक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी वाहतूक कंपन्या आपली वाहने अधिकाधिक सुशोभित व आकर्षक ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्यामुळे महाराष्ट्रात दिसणारा एस्. टी. गाड्यांचा निकृष्टपणा तेथे आढळत नाही

' पर्यटन व्यवसाय ' हे येथील अर्थव्यवस्थेचे मुख्य अंग आहे. पर्यटन व्यवसायाचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला आहे. शिवाय मच्छिमारी हा देखील येथील लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. गोव्याची राजधानी पणजी हे एक सुंदर शहर आहे. तेथील बाजारपेठ, दुकाने अत्यंत आधुनिक तशीच आकर्षक आहेत. या शहराची दिवसेंदिवस अधिक प्रगती होत आहे. येथील उंचच उंच इमारती, आलिशान हॉटेल्स वाहनांची विपुलता, लोकांचं राहणीमान या सर्व गोष्टी पणजीच्या नेत्रदिपक प्रगतीचीच साक्ष देतात.

## सांस्कृतिक जीवन

गोव्यात कोंकणी भाषिक लोक जास्त असूनही दैनंदिन व्यवहारात मराठीचाच वापर केला जातो. गोव्याच्या कोंकणी भाषेत आढळणारा गोडवा कोंकणी लोकांच्या स्वभावातूनही जाणवतो. येथे ख्रिश्चन व हिंदू दोन्ही धर्माचे लोक एकत्र जीवन व्यतीत करताना निदर्शनास आले. येथे ख्रिसमस व गणेश चतुर्थी हे दोन्ही उत्सव सारख्याच उत्साहाने साजरे केले जातात. यावेळी सर्वधर्मीय एकमेकांच्या आनंदात सहभागी होतात.
गोवा फिरताना तेथील लोकांच्या विशेषतः स्त्रियांच्या वेषभूषेतील व केशभूषेतील फरक प्रकर्षाने जाणवला. महाराष्ट्रात इतरत्र दिसणारी साडी तेथे क्वचितच दिसली. मात्र फ्रॉक्स, स्कर्टस आणि टी-शर्टस् हीच तेथील स्त्रियांची आवडती वेशभूषा असावी असे वाटते.

## कोकणचा गोवा तरी होऊ दे !

एकंदरीत तसं पाहिल्यास आपला कोकण व गोवा यांच्यात बरचसं भौगोलिक व सामाजिक साम्य दिसतं. गोव्यात दिसणारे मनमोहक, मऊशार समुद्र किनारे, नैसर्गिक सौंदर्य, तेथील भाषा, मंदिरे वगैरे गोष्टी कोकणातही आढळतात. परंतु प्राप्त परिस्थितीचा, नैसर्गिक साधनसंपत्तीचा गोव्यातील लोकांनी जसा आपल्या प्रगतीसाठी उपयोग करुन घेतला तसा कोकणवासियांनी करुन घेतलेला दिसत नाही. त्यामुळे तेथील सर्व पॉईंटस् पाहताना आपणाकडे हे सर्व असूनही आपण मात्र मागासलेलेच आहोत याची वेळोवेळी खंत वाटत होती. तेथे जाऊन तेथील लोकांनी वरील गोष्टींचा कसा फायदा करुन घेतला हे केवळ पहायचे काम आपण करतो. पण आपल्या कृतीत मात्र ते उतरत नाही. आपण कोकणचा कॅलिफोर्निया करण्याची स्वप्ने पहातो. कोकणचा किमान गोवा झाला तरी खूप होईल.

तेथील लोकांची कलात्मक दृष्टी, राज्याच्या प्रगतीसाठी शासनाकडून मिळणारी मदत आणि निसर्गाचा लाभलेला वरदहस्त हेच गोव्याच्या अकल्पित सौंदर्याचे व विकासाचे गमक आहे. ६ मार्च या दिवशी सकाळी आम्ही भारत लॉज सोडलं आणि परतीच्या प्रवासास निघालो. अर्थात तेथे पाहिलेले सौंदर्य, गुणविशेष आणि अनुभवलेले सुखद क्षण मनात साठवूनच !

★★★

## २) " दक्षिण भारत सहल "

**रवींद्र करंदीकर**
तृतीय वर्ष कला

'सहल' हा शब्द उच्चारताच समोर उभे रहाते ते औत्सुक्य आणि प्रत्येकामध्ये असलेला उत्साह ! अशा या औत्सुक्यपूर्ण वातावरणातच आम्ही आमच्या भूगोल विभागाचे सर्व विद्यार्थी देवगड बस स्टँडवर १९ फेब्रुवारीच्या भल्या पहाटेच हजर झालो आणि कोल्हापूरला प्रयाण करते झालो. कोल्हापुरहून आम्ही दुपारी जेवणाचा आस्वाद घेऊन पुढील प्रवासाचा पाया रचला. सायंकाळी जेव्हा आम्ही कर्नाटक हद्दीत आलो. तेव्हा खरोखरच आपण सहलीला जात असल्याचे जाणवले. कारण तोपर्यंत आम्ही आमच्याच राज्याचे राजे होतो. रात्री जेव्हा धारवाडचे कर्नाटक विश्वविद्यालय पाहण्यास गेलो तेव्हा त्याची भव्यदिव्यता पाहूनच मन भारावून गेले. रात्री पुन्हा धारवाड ते बेंगलोर या सुमारे ४५० कि. मि. लांबीच्या प्रवासासाठी निघालो. परंतु बेंगलोर येईपर्यंत मात्र आम्हाला झोप येणे शक्यच नव्हते. कारण उत्सुकता आम्हाला स्वस्थ झोपू देणार नव्हतीच !

आणि एकदाचा त्या बेंगलोर शहरामध्ये प्रवेश केला तो अर्थातच दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता. तेव्हा आम्ही सर्वच जण अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात जणू तरंगतच होतो. अर्थातच प्रथम दर्शन झाले ते टिपू सुलतानच्या भव्य दिव्य अशा लाकडी महालाचे. तेथील लाकडावरील कोरीव काम पाहून ते करणाऱ्या कारागिरांचे हात किती समृद्ध असतील याची कल्पनाच केलेली बरी ! आणि त्यानंतर आम्ही प्रवेश करते झालो ते गुलाबी लालबागेत. बागेचे विस्तृत असे २४० एकरचे क्षेत्र पाहून तर थक्कच झालो. सगळीकडे जणू हिरवीगर्द वनराई आणि त्याचे सौंदर्य अधिकच वाढवत असलेले ते ग्लास हाऊस ! खरंच एकापेक्षा एक वैशिष्ठ्यपूर्ण गोष्टी. याबरोबरच बेंगलोर राजभवन, हस्तकला केंद्र मनसोक्त पाहून घेतले. आणि नंतर मात्र आम्ही गप्पा, संवाद करता करता केव्हा निद्रिस्त झालो ते समजलेच नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा आम्ही जागे झालो तेव्हा साक्षात सूर्यनारायण आमचे स्वागत करायला आपल्या सोनेरी किरणांसह हजर होता. आम्हाला पुढील प्रवासासाठी निघायचे असल्याने थोडी घाई होतीच. पुढील प्रवास सुरु झाला. श्रीरंगपट्टणम् येथे आलो तेव्हा सकाळचे ११ वाजले होते आणि त्या उन्हातही आपल्या पाठीवर मानवांना घेऊन तो ' कावेरी संगम ' जलविहाराचा मनसोक्त आनंद देत होता. अर्थातच त्यामध्ये आम्हीही होतोच आणि त्यानंतर पुढे काही अंतरावर दर्शन झाले ते २०० वर्षे आपल्या राजाच्या स्मृती घेऊन उभ्या असलेल्या एका भव्य अशा इमारतीचे ! नंतर आला तो टिपूचा किल्ला.

आणि मग आम्ही प्रवेश करते झालो ते भगवान शेषशाही विष्णुमंदिरामध्ये. खरंच एवढ्या आधुनिक

युगातही तो भगवान मात्र एका शिलेवरतीच पहुडला होता, अगदी प्रसन्नपणे ! ते मंदिर म्हणजे जणू सर्व गोष्टी विसरुन एकांत मिळविण्याचे तसेच ईश्वराच्या सान्निध्यात काही काळ घालविण्याचे एक हक्काचे ठिकाणच होते. आम्हीही त्याचा आस्वाद घेतलाच आणि इच्छा नसुनही त्या मंदिरातून बाहेर पडलो. पण मन मात्र तिकडेच धाव घेत होते.

त्यानंतर म्हैसूर मधील अनेक भव्यदिव्य वास्तू आणि बगीचे दोन दिवस पहातच होतो. फिलोमीन चर्च, वसंत पॅलेस ......एकापेक्षा एक सरस इमारती आणि नंतर आम्ही पाहिला तो वैजयंती मालाचा राजवाडा की जेथे आज दूरवाणी केंद्राने कुरघोडी केलेली दिसते. तसेच ललितमहाल पॅलेस खरंच भव्य आणि सुंदर. चामुंडी हिल हा शब्द उच्चारताच समोर उभे रहातात ते चंदन आणि निलगिरी यांचे वृक्ष आणि सर्वात शेवटी दर्शन होते ते महिषासूर मर्दिनीचे ! त्यानंतर आमचा मोर्चा वळला तो स्थापत्यशास्त्रातील एका अप्रतिम, नमुनेदार अशा महाराजा पॅलेसवर, लक्ष्मी विलास पॅलेसवर ! खरच एक प्रचंड, नितांत सुंदर वास्तू की ज्याची फक्त कल्पनाच न करणे इष्ट. अशा या राजवाड्याचे सौंदर्य वाढवित होत्या त्या राजवाड्यातील पालख्या, सिंहासने, हत्यारे इ. सारेच अगदी विलक्षण !

म्हैसूरात गेल्यानंतर 'वृंदावन बाग' न पहाणे म्हणजे एक आश्चर्यच. पृथ्वीवरील स्वर्ग असा या बागेचा आज उल्लेख केला जातो. पण ती बाग पहायचे सुदैव मात्र आम्हाला लाभले नाही. कारण त्याच्या प्रवेशद्वारामध्ये बगीच्या ऐवजी दिसले ते मोठे ओंडके आणि सिक्युरिटी ऑफिसर्सचा संप ! अर्थातच आमची दूधाची तहान ताकावर सुध्दा भागणे शक्य नव्हते. इलाज नव्हता. अनेक हौशी पर्यटकांप्रमाणेच आमच्याही उत्साहावर विरजण पडले.

२२ फेब्रुवारी हा दिवस ऊजाडला जणू काही एक वेगळाच उत्साह आणि औत्सुक्य घेऊन. त्याच उत्साहात आम्ही सकाळी पुढील प्रवासाला निघालो. तो म्हणजे निसर्ग सान्निध्यात असलेल्या उटीला ! उटी म्हटले की आठवतात ते वाटेत प्रवासात लागणारे उंचच उंच निलगिरीवृक्ष, घनदाट अरण्य, तेथील अनेक प्राणी. सर्वच आल्हाददायक आणि निसर्गरम्य ! हा सर्व आनंददायी प्रवास व अनुभव पाठीशी घेऊनच म्हैसूरच्या परतीच्या प्रवासाला निघालो. वाटेत थोडी विश्रांती घेऊन आम्ही पुढील प्रवासाची मनाची तयारी करतच झोपी गेलो.

आता आम्हाला वेध लागले होते आपल्या मायभूमीचे. प्रवासातील सुखद अनुभूती बरोबर घेऊनच आम्ही सर्व सोबती कोल्हापूरमार्गे देवगडला परतलो. एकंदरित दक्षिण भारत सहल ही आमच्या कॉलेज जीवनातील एक आनंदाची घटना ठरली.

★★★

# वारस

**कल्पना बापट**
प्रथम वर्ष वाणिज्य

मानसीची घरची आर्थिक परिस्थिती चांगली नसली तरी सर्व माणसे सुशिक्षित होती. गावातील परिस्थितीही तशी जून्या वळणाचीच होती. शिक्षण वगैरे गोष्टी सर्वांनाच पटत नव्हत्या. मुलींना शिक्षण ही पद्धत तर मुळीच मान्य नव्हती. स्त्रियांची मजल चूल व मूल या पुरतीच मर्यादित पाहिजे. त्यांना शिकून काय करायचं आहे ? अशीच सर्वांची भूमिका होती.

मानसी चांगल्या मार्कसनी दहावी पास झाली, तेव्हा तिला कॉलेजला घालण्याचा विचार घरात पक्का झाला. कॉलेजमध्ये मानसीला प्रवेश मिळाला. एक तारखेपासून कॉलेज सुरु होणार होतं. अजून दहा दिवस शिल्लक होते.

मानसी कॉलेजच्या स्वप्नात रंगली होती. आपल्या मागच्या जीवनातील गंमती-जमती आठवून हरवून जात होती.

अचानक तिच्या कानावर बाबांचे शब्द पडले. बाबा आईला सांगत होते, 'आपला मोठा मुलगा जवळ असता तर ! ' पुढचं बोलणं मानसीला ऐकू गेलंच नाही. म्हणजे मी पास झाले याचा बाबांना आनंद झाला नाही तर. मुलगा व मुलगी यात काय फरक आहे ? मुलाकडून बाबांना माझ्यापेक्षा आणखी काय जास्त मिळणार होतं ? या विचारातच ती झोपी गेली. पुढचे दहा दिवसही याच विचारात गेले.

आज कॉलेजचा पहिला दिवस. सर्व मुले-मुली नवीनच होत्या. सर नवीन होते. एकमेकांच्या ओळखी करण्यात चार दिवस केव्हाच निघून गेले. मानसीची व तिची वर्गमैत्रिण माधवी हिची चांगलीच मैत्री जमली. मधल्या सुट्टीत त्या बागेत बसल्या होत्या. दहावीपर्यंतच्या अनेक गोष्टी चालल्या होत्या.

'मानसी, तो मुलगा बघ अगदी तुझ्यासारखा दिसतो आहे ! ' माधवी म्हणाली. ' नाक, डोळे तुझ्यासारखेच आहेत. तुझ्यासारखाच गोरा आहे. ' मानसीने माधवीच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही, पण तिला मनोमन त्या मुलाच्या व आपल्या चेहऱ्यात साम्य वाटले. काय त्या मुलाचं नाव असेल ? कुठून येत असेल तो ? आज आपण हजेरीच्या वेळी लक्ष ठेवायचे असे ठरवून मानसी शांत झाली.

सर वर्गात आले. ' हजेरी घ्या पाहू ! १, २, ३, ४, ५...... पाच नंबर......कोण आहे का ? मंदार वर्धम् '– ' येस सर. ' ' कुठे लक्ष आहे ? चार वेळा नंबर घेतला, ऐकू आले नाही ? ' सर कडाडले, कुठून येतोस तू ? '

' कवठयाहून, ' मंदारने सांगितले ' वर्गात लक्ष ठेवत जा ! ' मानसीला त्या मुलांचे नाव आणि गांवही कळलं होतं. पण त्याच्या व आपल्या चेहऱ्यात साम्य असण्याचं कारण काय बरं ? कॉलेजच्या सांस्कृतिक कार्यक्रमात मानसी आणि मंदारनेही भाग घेतला होता. त्यामुळे त्यांची ओळख झाली. ती एकमेकांशी बोलू लागली. कॉलेज म्हटल्यावर सर्व गोष्टी आल्याच. मुलांनी ओरड करायला सुरुवात केली. पण अशा गोष्टी कोणी कुणाच्या तोंडावर बोलत नसतात. त्यामुळे त्या व्यक्तींना आपल्याबद्दल काय बोललं जातं हे कळतच नसतं. त्याचप्रमाणे या दोघांनाही त्याची कल्पना नव्हती.
' मंदार, आपल्या दोघांच्या चेहऱ्यात तुला काही साम्य वाटतं का ?' मानसीने एक दिवस धाडसाने विचारलं.

मंदारने एक उसासा टाकला. ' तुला मोठा भाऊ होता का गं ? तू कधी घरी विचारलं आहेस ? '
' नाही, पण माझा दहावीचा निकाल लागला त्या दिवशी बाबा आईला म्हणाले होते, आपला मुलगा जवळ असता तर?'
' आज घरी गेल्यावर तू बाबांना या विषयावर विचारशील? '
' हो, विचारीन ना! पण तू असं का म्हणतोस? तुला नक्की काय म्हणायचंय ? असं कोडयात बोलू नकोस. '

' हा विषय तुला कसा सांगावा या विषयी मी विचार करीत होतो. तू कॉलेजला येण्यापूर्वी मला माहीत नव्हतीस, पण पहिल्या दिवशी तुला पाहिली आणि मी घरी विचारलं, 'तुम्ही मला ज्यांच्याकडून दत्तक घेतलंत, त्यांना मुलगी होती का?' 'होय, मानसी नाव आहे तिचं. तुझ्यापेक्षा एक वर्षाने लहान आहे ती' बाबांनी सांगितलं.

मानसी सुन्न होऊन सर्व ऐकत होती.
'मानसी, त्या दिवसापासून मी तुला ओळखतो आहे.
पण कसं सांगावं? तुला हे माहित असेल का?
म्हणून मी काहीच बोललो नाही.'

कॉलेज सुटल्यावर मानसी घरी आली. पायातील चप्पल भिरकावून ती घरात गेली. नेहमी स्वयंपाक घरात गेली पण ताट वाढून घेऊन जेवायला बसली नाही. आज तिला बाबांना जाब विचारायचा होता. ती बाहेर येऊन बसली. ती जेवली नाही हे पाहून आई बाबांना म्हणाली.
'हल्ली हिचे असेच थेर चाललेत. कॉलेजला जाताना नीट बोलत नाही. व्यवस्थित जेवतही नाही. काही विचारल तर सरळ उत्तर देत नाही.'
काय बोलावं हे मानसीला सुचत नव्हतं. पण बाबांनीच विषय काढला, 'मानसी, आज का जेवली नाहीस?'

मानसीचा मनावरचा ताबा एकदम सुटला. ती म्हणाली, 'बाबा, आजपर्यंत माझ्यापासून तुम्ही एक गोष्ट लपवून का ठेवलीत? का सांगितलं नाहीत की मला भाऊ होता, आहे म्हणून? सांगा, सांगा बाबा.'
मानसीच्या या प्रश्नाने आई-बाबा स्तब्धच झाले. आज कसं कळलं हे?
'तुला काहीतरी गैरसमज झालाय मानसी, तुला कुणी सर्व सांगितले हे?'

'ठेवा, अजूनही माझ्यापासून लपवून ठेवण्याचा प्रयत्न करा. पण मला सर्व सत्य समजलं आहे. सांगा, का दिलात आपल्या मुलाला दत्तक? आणि आता आपल्याला मुलगा नाही म्हणून का रडता? सांगा, बोला ना आता!'
मानसीच्या भडीमाराने बाबा गारच झाले. तिला सर्व सांगून टाकावं म्हणून ते म्हणाले, 'ऐक मानसी!' आपली परिस्थिती कशी आहे याची तुला कल्पना आहेच. त्यावेळी याहीपेक्षा बिकट परिस्थिती होती आमची. आम्हाला एक मुलगा होता. मधु नाव त्याचं. तो एक वर्षाचा होता. दुसऱ्या वेळी तुझ्या आईला दिवस राहिले तेव्हा तिला खूप त्रास सहन करावा लागला. तिचं ऑपरेशन करावं लागणार होतं. पैशांची गरज होती. त्यावेळी आमच्या घरात माधव वर्धम नावाचे गृहस्थ भाड्याने रहात होते. पैसा-अडका भरपूर होता, पण मूल नव्हतं. आम्ही त्यांच्याकडे जाऊन उसण्या पैशांची मागणी केली. ती त्यांनी एकदम नाकारली. पण एक अट मात्र सांगितली. तुमच्या मुलाला माझ्या स्वाधीन करा व एक हजार रुपये घ्या. 'मानसी,' बाबा अश्रू गिळत बोलत होते, 'त्यावेळची परिस्थितीच अशी होती की काहीही करुन तुझ्या आईचा जीव वाचवणे आवश्यक होते. मी मनाशी विचार केला, मुलगा आपल्याला परत होईल, पण मालती गेली तर काय करणार? त्यावेळी एक हजार रुपयांत ऑपरेशन होऊन आणखी बरंच काही होणार होतं. संध्याकाळी जाऊन वर्धम साहेबांना भेटलो. त्यांनी ताबडतोब एक हजार रुपये काढून दिले व मधूला ताब्यात घेतला. दुसऱ्याच दिवशी ते गाव सोडून निघून गेले. कुठे गेले, काय झालं, काहीच कळलं नाही.

मालतीचं ऑपरेशन व्यवस्थित झालं, तिनं तुझ्यासारख्या मुलीला जन्म दिला, पण ......
...... पण वर्धम साहेबांना वारस देऊन आमच्या वारसाचा मार्गच खुंटला होता.

★★★



# कविता

## जीवन

वाटेवरी जीवनाच्या
आहेत अनेक फाटे !
फूल फुलते एकदाच
उरी घेऊन काटे ।
जीवन म्हणजे केवळ गाणे
सप्तसुरांनी नटलेले ।
आंसू म्हणती जीवन म्हणजे
अपेक्षा भंगानी बिटलेले ।
अर्थ शोधण्या जीवनाचा
आपण सर्व रंगून जातो ।
अर्थ लागता जीवनाचा
तेव्हा आपण संपून जातो ।

**संजू वायंगणकर**
द्वितीय वर्ष वाणिज्य

## सायंकाळ

सोन्याचा गोळा परतुनी गेला
दूर क्षितिजावरती ।
पाखरांची माळ चालली
शिक्षणात भाषेला महत्व का प्राप्त झाले ? तर भाषेच्या महत्वावरुन. मातृभाषेला शिक्षणात महत्वपूर्ण स्थान आहे. लहान मूल हे घर, समाज, शाळा येथे सतत मातृभाषेच्या वातावरणात वावरत असते. त्याचे श्रवण-भाषण हे व्यवहार मातृभाषेतूनच होत असतात. मातृभाषेतून सहज व सुलभपणे त्याला लेखन व वाचन, ज्ञान या गोष्टी प्राप्त करुन घेणे शक्य असते. हिंदू मनुष्याला तीव्र वेदना झाली तर त्याच्या तोंडून 'आई' हा उद्‌गार बाहेर पडतो, यावरुन तो कसा मातृभाषेशी एकरुप झालेला आहे ते स्पष्ट

होते. मातृभाषा हे शिक्षणाचे व ज्ञानप्राप्तीचे उत्कृष्ट माध्यम आहे. मातृभाषा व बालकाचा सर्वांगीण विकास यांचा घनिष्ट संबंध आहे.

मातृभाषेच्या अभ्यासामुळे विद्यार्थी भरपूर वाचन करतात व आपले विचार मोकळेपणाने मांडू शकतात. कल्पना समजावून घेऊ शकतात. यामुळे विषयज्ञानाचा पक्का पाया होऊ शकतो, व या भक्कम पायावर उच्च शिक्षणातील ज्ञानोपासनेची इमारत चांगली बांधली जाऊ शकते. स्वभाषेत तो समरस होऊन आपले विचार अगदी स्वतंत्रपणे मांडू शकतो. कोणत्याही विषयाची स्पष्ट कल्पना, विषय ज्ञानाची व्याप्ती, परिपक्वता ही मातृभाषेच्या माध्यमातून सहज सुलभ शक्य होते. भाषा ही विद्यार्थ्यांला घडविण्याचे कार्य करते.

समाज हा भाषेमुळेच अस्तित्वात राहतो. म्हणूनच मातृभाषेला आपल्या जीवनात अतिशय महत्वाचे स्थान लाभलेले आहे. त्यामुळेच मातृभाषेबद्दल आपल्या हृदयात आदराची, आपुलकीची भावना असली पाहिजे. मातृभाषेची श्रवण-भाषण, वाचन-लेखन ही उद्दिष्टचे मातृभाषेच्या अभ्यासाने सफल होतात. भावनात्मक समरसता कौशल्य, भाषण कौशल्य, लेखन कौशल्य इ. गुणांचा मातृभाषेच्या अभ्यासातुन विकास होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी मातृभाषा हेंच सर्वोत्तम शिक्षणाचे माध्यम आहे.

मातृभाषेच्या सहाय्याने इतर कोणत्याही विषयाचा अभ्यास सहजपणे करता येतो. मातृभाषेतील अध्यापनामुळे विद्यार्थ्यांना निर्भेळ आनंदप्राप्ती होते. मातृभाषेद्वारे मनुष्य आपले विचार, भावना, इच्छा आकांक्षा, सुख-दुःख समजून घेऊ शकतो. मानव हा नवनवीन क्षितीजे शोधून काढून आपले जीवन समृद्ध करण्याकडे वळला आहे. हे सारे धन नव्या पिढीला देण्याचे कार्य शिक्षण करते, मग ते शिक्षण संस्थांतर्गत असो वा शाळेबाहेरचे असो, या शिक्षणात भाषेला, भाषाबद्ध साहित्याला व माध्यमाला फार महत्व असते.

आजचा विद्यार्थी उद्याचा नागरीक होणार आहे. त्याचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य प्रामुख्याने समाज, कुटुंब शाळा यांच्यावर असते. ही शाळेवर सर्वात मोठी जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांचा खराखुरा विकास हा मातृभाषेच्या माध्यमातूनच होत असतो. कारण मातृभाषा ही माणसाच्या सर्वांगीण विकासाची, उन्नतीची कर्ती व धात्री आहे.

★★★

# फिल्मी दुनियेचा राजा-राजकपूर

महेश [illegible]कर
बारावी वाणिज्य

चेहऱ्यावर भोळेभाबडेपणाचे भाव आणून विदुषकी मुखवट्याआड रुपेरी पडद्यावर जीवनाच्या गहिऱ्या रंगाची दुःखे असलेला अभिनय करुन प्रेक्षकाला आनंदमय करण्याची क्षमता असलेला कलाकार म्हणजे राजकपूर

गेली चाळीस वर्षे या राजकपूरने आपले आयुष्य चित्रपट तयार करण्यात घालविले आणि याच त्याच्या गडगंज कामगिरीचा गौरव करण्यासाठी यंदाचा 'फाळके पुरस्कार' राजकपूरला देण्याची घोषणा करण्यात आली. राजकपूरचा जन्म १४ डिसेंबर १९२४ सालचा. पेशावरला जन्मलेल्या या राजचे नांव

रणवीर. आपले वडील पृथ्वीराज कपूर यांच्यासमवेत राज मुंबईत आला. वडिलांसोबत नाटकात कामे करुन अभिनयाच्या क्षेत्रात पदार्पण केले.

वयाने कोवळा, निळसर डोळयांचा, कुरळया केसांचा, भावडया मनाचा आणि महत्वाकांक्षी राज! त्याने आपली चित्रपटांच्या दुनियेतील कारकीर्द सुरु केली ती क्लँपर बॉय म्हणून. ' रणजित मुव्ही टोन ' मध्ये राजकपूर सुरुवातीला फक्त दहा रुपयाच्या पगारावर नोकरीला लागला. केदार शर्मा या तेव्हाच्या अत्यंत चपळ,हुशार आणि नामवंत दिग्दर्शकांच्या हाताखाली राजकपूरने काम केले. ही घटना १९४२ मधील. त्या आणि आजच्या राजमध्ये झालेला फरक म्हणजे जमीन- अस्मानामधील फरक आहे.

वयाच्या २१ व्या वर्षी राजने ' इन्किलाब ' या चित्रपटात पहिली भूमिका केली आणि कलाकार म्हणून सिनेसृष्टीत पदार्पण केले.
आपल्या नावाचा वापर करुन राजकपूरने कोणतीही गोष्ट करणे हे पृथ्वीराज कपूर यांना मान्य नव्हते. सुमारे ४ वर्षांच्या उमेदवारीच्या काळानंतर राजने १९४८ मध्ये ' आग ' या चित्रपटाची निर्मिती केली. निर्माता, दिग्दर्शक आणि कलाकार अशी तिहेरी भूमिका त्याने 'आग'च्या निमित्ताने बजावली आणि भारतातल्या सिनेसृष्टीतल्या आपल्या खास ' राजकपूर ' शैलीची, पहिली झलक दुनियेला दाखवून दिली.

१९४८ मध्ये राजकपूरची आणि नर्गिसची पहिली 'जान-पहचान' झाली---- आणि ---- १९५६ पर्यंत सलग आठ वर्षे ही जोडी गाजली. राजकपूर व नर्गिस या जोडीचा ' चोरी चोरी ' हा शेवटचा चित्रपट. दरम्यानच्या काळात राजकपूरनें आपल्या स्वतःच्या चित्रीकरणासाठी स्वतःचा स्टुडिओ असावा असा निर्णय घेतला आणि १९४९ च्या सुमारास चेंबूरमध्ये राजने चार एकर जागा घेतली व स्टुडिओ उभा केला.
'आवारा ' या तिसऱ्या चित्रपटाचे चित्रीकरण त्याने स्वतःच्या आर. के. स्टुडिओत केले. 'आवारा' तील त्याची भूमिका व गाणी लोकप्रिय झाली. 'आवारा' चित्रपटात चित्राचे काहीं सेट करण्यासाठी तब्बल तीन महीने लागले आणि राजकपूरने त्यासाठी लाखो रुपये खर्च केले. हे सारे केवळ ९ मिनीटांसाठी.

'प्रेमरोग ' या चित्रपटाच्या निर्मितीसाठी सुमारे दोन कोटी रु. ची गरज होती. त्यासाठी त्याने इकडून तिकडून पैसे जमा केले मोठया शिताफीने ' प्रेमरोग' तयार केला. आणि सुदैवाने तो चाललाही. नाहीतर आर. के. स्टुडिओवर पाणी सोडण्याची पाळी आली असती. ' आवारा ' या चित्रपटाला भारतात यश मिळाले. सोव्हीएट युनियन आणि आखाती देशात मात्र त्याला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले.

१९६४ मध्ये महत्वाकांक्षी राजकपूरने त्रिकोणी प्रेमाची एक कथा चित्रपटात आणली, तो चित्रपट म्हणजे ' संगम. ' या चित्राची निर्मिती, दिग्दर्शन, संकलन आणि भूमिका अशा चौहेरी जबाबदाऱ्या राजने मोठ्या हुशारीने पार पाडल्या. ' संगम ' हा राजकपूरने तयार केलेला पहिलाच चित्रपट होय. युरोपमध्ये विविध ठिकाणी जाऊन राजकपूरने या चित्रपटाचे चित्रीकरण केले. या चित्रपटाने ' तुफान बुकिंगचा ' एक विक्रमच केला. सलग पाच वर्षे ' संगम ' बॉक्स ऑफिसला हिट गेला.

परदेशी जाऊन चित्रीकरण करण्याचे धाडस राजपूर्वी कोणाही निर्मात्याने केले नव्हते. ' संगम ' चे हे धाडस पाहून एका निर्मात्याने तर राजकपूरला आणि राजश्रीला बरोबर घेऊन एक युरोप सफर केली आणि ' अराउंड द वर्ल्ड ' हे चित्र तयार केले. राजकपूरचा ' जीस देश मे गंगा बहती है' चित्रीत झाला तो चंबळच्या खोऱ्यातले दरोडेखोर विनोबा भावेना शरण आल्यावर ! ' मेरा नाम जोकर ' यात विदुषकी चेहऱ्याच्या मागे मनात खोलवर एक दुःखी मन असते ही भूमिका स्विकारुन माणसाच्या चेहऱ्यावरच्या नकली बुरख्याआडच्या मनातील माणूसकी शोधण्याचा त्यानें प्रयत्न केला.

यानंतर राजकपूरने ' बॉबी ' चित्रपट दिग्दर्शित केला. आपला मुलगा ऋषीकपूर याच्या समोर कोवळ्या वयाच्या डिंपलला राजने पुढे आणले. दोन तरुण मनांचा रोमान्स यातून राजने दाखविला. आपल्या सगळ्या धाडसाबरोबर त्याने आणखी एक मोठे धाडस केले ते म्हणजे ' राम तेरी गंगा मैली ' हा चित्रपट लावण्याचे आणि 'मैली गंगा' सुपरहिट करण्याचे !

राजकपूरचे फिल्मी करिअर कलाबाह्य झाले असे म्हणायची हिंमत आज कोणीही करु शकणार नाही. अगदी ' आग 'पासून ' राम तेरी गंगा मैली ' पर्यंत त्याने आपला प्रवास न अडखळत केलेला दिसत आहे. ' अमरप्रेमा' या चित्रपटात कृष्ण बनलेल्या राजकपूर समोर राधा बनून मधूबाला उभी होती.

नर्गिस, सुरैया, सायराबानू, वहिदा रेहमान, नूतन, वैजयंतीमाला, हेमामालिनी, पद्‌मिनी, माला सिन्हा राजश्री, कामिनी कौशल अशा अनेक अभिनेत्री समोर राजकपूर हिरो बनून उभा राहीला.

मनस्वी मनाचा, जबरदस्त प्रतिभाशक्ती असलेला, कल्पनेच्या साह्याने उंच भरारी घेऊन प्रयत्नपूर्वक एखादी गोष्ट साकार करण्याची अचाट शक्ती असलेला वार्धक्याकडे झुकलेला राजकपूर मनाने आणि विचाराने अत्यंत टवटवीत होता.

राजने चांगले चित्रपट जसे दिले तसेच हल्ली लोकांना डोळ्यांचे चोचले पुरविण्यासाठी काळाबरोबर नटयांना कमी कपड्यात दाखवण्याचे धाडसही त्याने केले. एवढं सगळे करताना आपण केवळ सौंदर्यपिपासकाच्या भूमिकेतून हे करीत आहोत ही भूमिका त्याने कायम ठेवली. राजकपूरच्या या धोरणावर काही रसिकांनी नापसंतीही व्यक्त केली. पण समाज मनाच्या दिशेने जाणाऱ्या प्रवाहात झोकून काम करण्याचे धाडस राजने कधीही सोडले नाही. परंतु असा हा राज ' फिल्मी चंदेरी दुनिया ' सोडून ' अंधेरी दुनिये ' त निघून गेला. अशा या अष्टपैलू राजला—शतशः प्रणाम !

★★★

---

# बलशाली भारताच्या माझ्या कल्पना


**रेखा मिठबांवकर**

अकरावी कला


भारतमातेच्या प्रत्येक शत्रूचे आम्ही पिस्तुलाच्या गोळ्यांनी स्वागत करु. रक्ताळलेल्या संगिनीने स्वागत करु. आम्ही इंग्रजांच्या क्रूरतेचे खूप नमुने ज्या ज्या वेळी वाचले. त्या-त्या वेळी आमचे हृदय फाटून गेले. अंगातील लाल रक्त विजेसारखे सळसळले आणि क्षणात शस्त्र हातात आल्याचा भास होऊन मूठी आवळल्या गेल्या. या मातेच्या शत्रुची आम्ही केव्हाच गय करणार नाही. त्यासाठी आम्ही अहिंसावादाचे पांघरुण केव्हाच पांघरणार नाही शस्त्राशी शस्त्रानेच लढू. वेळप्रसंगी आम्ही सावरकर बनू, शहिद भगतसिंग बनू.

' रणाविना स्वातंत्र्य कोणा मिळाले ?' भारतीयांनी ते मिळवून दाखविले असे म्हणतात. पण तसे म्हणता येणार नाही कारण तुम्हाला आठवत नाही का? जालियनवाला बागेतील रक्ताने वाहत असलेला तो महासागर, फासावर लटकलेले शेकडो शूर जीव अबालवृद्ध आणि नुकतीच तारुण्यात प्रवेश केलेली ती पोरं, त्यांच्या पाठीवर बसत असलेले आसूड आणि छातीवरच्या त्या असंख्य गोळ्या तुम्हाला आठवत नाहीत का? देशप्रेमाने झपाटलेल्या देशभक्त बाबू गेनूच्या पोटावरुन गेलेले ते अजस्र चाक......

असा रक्ताचा महासागर जेव्हा भारतभूमीवर निर्माण झाला तेव्हा कुठे तिरंगी झेंडयाला तो भगवा रंग प्राप्त झाला. ते त्याचेच प्रतीक आहे. स्वातंत्र्य अतीशय उंचावर होतं. जेव्हा कोटीजनांनी आपले देह ठेवले, तेव्हा त्या देहांचा मजला करुन आम्ही स्वातत्र्यापर्यंत पोहोचू शकलो.

पण आज ! आज त्याच्या उलट परिस्थिती आहे. आज ते स्वातंत्र्य टिकविण्याऐवजी नष्ट करण्यासाठी संगिनी उचलल्या जात आहेत, देशाच्या जबाबदार व्यक्ती आज गोळीला बळी पडत आहेत. ज्या देशभक्तांनी आपल्या बलीदानातून पटवून दिले की 'स्वातंत्र्य हे प्राणाहूनही महान असते.' त्या देशभक्तांच्या प्रतिमा पुजण्यासाठी पुढे झालेल्या हातावर आज गोळ्यांचा वर्षाव होतो आहे. अंदाधुंदी जिकडे–तिकडे माजली आहे. एकेकाळी स्वातंत्र्य चळवळीत अग्रगण्य असणारे ते पंजाबी लोक आज स्वतंत्र्य राष्ट्राची मागणी करत आहेत. तर घुसखोरांच्या पापी पदस्पर्शाने ही भूमी अपवित्र झाली आहे. अशा परिस्थितीत देशाचे स्वातंत्र्य अबाधीत कसे राहील ? हा एकच प्रश्न आम्हा युवक–युवतींसमोर उभा राहतो. अशावेळी देशभक्ताने मातृभूमीसाठी सांडलेल्या रक्ताचे मूल्य शून्य तर होणार नाही ना ? हीच भीती वाटते. आम्ही आमच्या देशातील दारिद्र्य नष्ट करु शकलो नाही की श्रीमंतांच्या गगनचुंबी इमारती पाडू शकलो नाही. भारतीय जनतेनें संघटीत राहण्याचा प्रयत्न केल्यास हे सर्व शक्य आहे. विश्वासावर राज्य करण्याचा मान भारताला आहे, आणि तो मान मिळविण्यासाठी भारतीय जनतेने स्वार्थत्याग करुन संघटीत राहिले पाहिजे. म्हणूनच म्हटले आहे, unity you stand, divide you fall.

अजस्त्र गजेंद्राला एका गवताच्या काडीने आवरता येत नाही, पण एकत्र केलेल्या गवताच्या जुडग्याने मात्र तो बांधता येईल.
सध्या भारतातील अतिरेक्यांचा अतिरेक पाहून आम्हाला वाईट वाटते ते एका गोष्टीचे की ते भारतमातेचे सुपुत्र आहेत. त्यांना पाहून आमची अवस्था पार्थासारखी झाली आहे. पण ते देशद्रोही आहेत, यासाठी आम्ही त्याच्या विरुध्द शस्त्राचा वापर करु. ते आमच्यापेक्षा शक्तिमान ठरल्यास युक्तिवादानं लढून आम्ही भूमिगत राहू.

आम्ही आजचे युवक–युवती बोलत आहोत की देशाच्या रक्षणासाठी आम्ही कुडीत प्राण असेपर्यंत लढत राहू. बचेंगे तो औरभी लढेंगे । आमच्या एका थेंबाथेंबातून हजारो शस्त्रधारी युवक–युवती जन्म घेतील.

★★★

---

# आम्हाला असे शिक्षण हवे !

गीता गोखले
अकरावी विज्ञान

जागा भरती नाही, नोकरी नाही, अशा पाटया वाचीत स्वप्नील आपल्या डिग्र्याचं भेंडोळ घेऊन फिरत होता. बी. कॉम. च्या पहिल्या वर्गात पास होऊनसुध्दा स्वप्नीलसारख्या कितीतरी मुलांची अवस्था आपल्याला अशीच झालेली दिसून येते. म्हणजेच आज आम्हा मुलांना मिळणारं शिक्षण किती प्रमाणात आमचा मानसिक, आर्थिक, सामाजिक विकास करु शकेल याची कल्पना येते. आजचं शिक्षण आपल्याला रोज पोटभर अन्न, वस्त्र, निवारा मिळू शकेल इतकं तरी उपयुक्त आहे का ?

दरवर्षी कॉलेजमधून हजारो मुले पदवीधर होवून बाहेर पडतात. पण किती जणांना नोकऱ्या मिळतात ? हे चित्र आपल्याला भयानक दिसतं. कारण पदवीधर होणं म्हणजे फक्त सुशिक्षीत बेकारांची संख्या वाढविणे यापलीकडे काहीच नाही. एखाद्या बी. कॉम् किंवा बी. एड्. झालेल्या मुलाला कुठेतरी कंडक्टर, हेल्पर अशा अगदी कमी दर्जाच्या नोकऱ्या मिळतात आणि आजची परिस्थितीच अशी आहे की, आपल्या दर्जाची नोकरी मिळेपर्यंत थांबणं शक्यच नसतं. तेव्हा मिळेल त्या नोकरीवर समाधान मानावे लागते.

आपल्या देशातील बेकारीचे प्रमाण आज खूपच जास्त आहे. आपल्या देशातील ३७ टक्के जनता दारिद्र्य रेषेखाली आहे. आणि याला कारण म्हणजे आपल्या देशात उपलब्ध असलेली शिक्षणपध्दती. आपल्याकडील बेकारी ही कायमस्वरुपी आहे.

अमेरिका, इग्लंड सारख्या देशात फक्त ४ ते ६ टक्के बेकारी आढळते. कारण तेथे औद्योगिक विकासाला फार मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे. तेथे प्रत्येक मूल हे वयाच्या ८ व्या वर्षापासून स्वावलंबनाचे धडे गिरवू लागतं. त्याला स्वतःचं पोट स्वतःच भरायचं असतं. त्यामुळे आपण काहीतरी करायचच ह्या भावनेतून त्याची आवड जोपासली जाते. पण आपल्याकडे बी. ए., बी कॉम्. झालेली मुलंसुद्धा पंगूपणाने वागतात. आणि याला कारण आपला समाज, त्यातील जातीयवाद, उच्च-नीच, गरीब-श्रीमंत या भावनेतुन आपण कमी आहोत, ही न्यूनगंडाची भावना वाढीस लागते व त्यामुळे एखाद्या गोष्टीसंबंधी ठाम निर्धार होत नाही.

आजचा विद्यार्थी हा वयाच्या २० व्या वर्षापर्यंत चार भिंतीच्या आड शिक्षण घेत असतो. सरकारने त्यांच्यासाठी विद्यालयाची इमारत, प्रोफेसर, पुस्तकालय इ. सगळ्या सोयी दिलेल्या असतात. परंतु एखाद्या विद्यार्थ्याला वेगळ्या विषयाची आवड असली तरी नेहमीचाच अभ्यास इतका असतो की, त्याला आपला छंद जोपासायला वेळच उरत नाही.

पहिला नंबर एकाच विद्यार्थ्याला मिळतो. बाकी सगळे दोन नंबरच्या खाली असतात. त्यामुळे त्यातील एखाद्या मुलाला त्याच्या गुणांवर नोकरी मिळू शकते. पण उरलेल्यांचे काय ? ज्याला अगदी कमी गुण मिळाले असतील तो बेकारच राहातो. आणि कॉलेजमध्ये जावून चार भिंतीच्या आत शिक्षण घेतल्याने शारिरीक श्रमाची सवय नसते. आणि लोकलज्जेखातर तो हमालीसुद्धा करु शकत नाही. नंतर त्याला कळून चुकते की, आपण वयाची २० वर्षे फुकट घालविली आहेत.

सध्या जे शिक्षण मिळते ते व्यवहार उपयोगी नाही. आपण सध्या कारकुनी दर्जाचे शिक्षण घेतो. आपल्याला खरी गरज आहे ती तांत्रिक शिक्षणाची व ही शिक्षणाची सोय आपल्यातल्या बऱ्याच महाविद्यालयात आढळत नाही. त्यामुळे मुलांना आपला कल तांत्रिक ज्ञानाकडे असूनसुद्धा, मनापासून आवडणारा विषय न निवडता आल्याने मनाविरुद्ध गावात असलेल्या शिक्षणाकडे वळावे लागते. व त्यामुळे मुलांचे अभ्यासातील लक्ष कमी होते. त्या अभ्यासाबद्दल तिटकारा उत्पन्न होतो. म्हणून तांत्रिक शिक्षणाची सोय असलेली महाविद्यालये स्थापन व्हावीत.

लहानपणापासून सगळ्यांना एकाच दर्जाचे शिक्षण मिळते. एखाद्या मुलाला जरी गायनाची किंवा चित्रकलेची आवड असली तरी त्याला त्याच एका विषयात चांगली प्रगती करुन घेता येत नाही. कारण बाकी विषयांचा अभ्यास सांभाळून त्या विषयाचा अभ्यास करता येत नाही व त्याला त्या विषयाचे संपूर्ण ज्ञान मिळू शकत नाही. आणि त्यामुळे आपली इच्छा दाबून दुसऱ्या विषयाकडे वळून त्याला त्याचे अर्धवट ज्ञान प्राप्त होते. म्हणून लहानपणापासून एखाद्या मुलाचा कल जास्त कोणत्या विषयाकडे आहे हे पाहून त्याला त्या विषयाचे शिक्षण द्यावे.

दुसरं म्हणजे एखाद्या खेड्यातील मुलाला जर चांगले शिक्षण घेवून आपल्या पायावर उभे

करण्याची इच्छा असली तरी अडचणी येतात. तो मुलगा किंवा मुलगी खरोखरच हुशार असताना सुद्धा खेडयातील अनेक गैरसोयीमुळे त्यांची टक्केवारी कमी होते. शहरातील मुलांपेक्षा त्याची पात्रता कमी होते. शहरातून अनेक सुविधा निर्माण असतात. तर खेड्यात अनेक गैरसोयी. तरीसुद्धा शहरातील व खेडयातील मुलांचा अभ्यासक्रम एकच ठेवला जातो. आणि त्यांना ज्ञानाच्या एकाच तराजूत तोललं जातं. त्यामुळे खेडयातील मुलांच्या मनात एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो. खरं पाहता खेडयातील व शहरातील मुलांची तुलना एकाच मापाने होऊ नये. कारण खेडे व शहर या दोन शब्दातच फार मोठा फरक दडलेला आहे. शहरात नाना सुखसोयी, अभ्यासाची अत्याधुनिक साधने, तज्ज्ञ व अनुभवी शिक्षकवर्ग, निरनिराळे क्लास यांची उपलब्धता असते. परंतु खेडयात मात्र मुलाना प्रसंगी शेती करुन सुद्धा शाळा–कॉलेजात जावे लागते. रोज बराच प्रवास करणे म्हणजे होडया–गाडया करुन, यातायात करुन, तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. त्यामुळे जेवण्याखाण्याचे हाल व या सगळयाचा परिणाम त्यांच्या कार्यक्षमतेवर होतो. काही करण्याची इच्छा असूनसुद्धा या प्रतिकुलतेमुळे मनातल्या इच्छा मनातच राहतात. खेडे व शहरातला हा फरक लक्षात घेवून खेडयातील मुलांच्या दृष्टीने एक वेगळा दृष्टीकोन ठेवला तरच त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होवून त्यांना पुढे येण्याची संधी मिळेल.

आज आम्हाला ज्याप्रमाणे पोटभर अन्न मिळवण्यासाठी शिक्षण हवंय. त्याचप्रमाणे समाजात एक प्रकारचा दर्जा, प्रतिष्ठा किंवा व्यक्तीचा सर्वांगिण विकास या दृष्टीने शिक्षण हवंय. ज्या एका विशिष्ट धंद्याची आवड आहे त्याची जोपासना झाली पाहिजे. जात्याच असलेल्या गुणांना चालना मिळणे आवश्यक आहे व त्या दृष्टीने संगीत, खेळ, अभिनयाचे दालन यासारख्या विद्यालयांची देखील आवश्यकता आहे.

नियोजनबध्दता हा सुध्दा महत्वाचा मुद्दा आहे. याचा अर्थ असा की, शिक्षणात सुध्दा नियोजन असावे. उदा. बी. एड्. कॉलेज निघाले की उठसूठ सगळे विद्यार्थी बी. एड्. ला. त्यामुळे शिक्षणाचा समतोल ढासळतो. पण खरे शिक्षक आपल्या देशात किंवा एखाद्या राज्यात किती आवश्यक आहेत याचा सखोल विचार करुन तेवढयाच लोकांना ह्या क्षेत्रात प्रवेश द्यावा व इतरांना दुसरा पर्याय सुचवावा. म्हणजे त्या क्षेत्रातील समतोल कायम राहील. आणि शिक्षणाचा दर्जा सुधारेल. म्हणजे शिक्षणात एका विशिष्ट पायरी पर्यंत मर्यादा असाव्यात तरच शिक्षणाचा दर्जा टिकून राहील. आपला देश हा मूलतः शेतीप्रधान आहे. आणि कोकणचा विकास हा शेतीवरच अवलंबून आहे. आणि ही शेती पावसावरच अवलंबून आहे. आणि आपल्याकडील शेतकरी हा फक्त चारच महीने शेतीचा व्यवसाय करतो. त्यावरच त्याची वर्षाची गुजराण होत असते शेतीवर अनेक मर्यादा आहेत. उदा. शेतीचे विभाजीकरण. पावसावर अवलंबीत पारंपारिक पध्दतीचा वापर, त्यामुळे हे उत्पन्न काही वर्षभर पुरण्यासारखे नसते. आणि हा शेतकरी जवळजवळ ८ महीने बेकारच असतो. त्यामुळे बहुतेक लोक शहराकडे धाव घेतात व त्यांना कोणत्याही प्रकारचे तांत्रीक ज्ञान अवगत नसते. त्यामुळे शहराच्या लोकसंख्येत निरर्थक भर पडते, शहरातील बेकारी वाढते.

खेडयात करता येण्यासारखे अनेक उद्योग आहेत. परंतु भांडवलाअभावी व तंत्रशुद्ध ज्ञानाअभावी त्याचा विकास होत नाही. तेव्हा सरकारने थोडयाफार प्रमाणात पैसा व तंत्रशुद्ध ज्ञान पुरवणारा तज्ज्ञ वर्ग पुरवावा. छोटया-छोटया उद्योगांस उदा. पोल्ट्री, नर्सरी, पापड करणे व इतर गृहोद्योगास किती फायदा असतो हे समजून सांगावे. त्यासाठी शक्य तितकी मदत करुन लोकांना एका विशिष्ट उद्योगाकडे प्रवृत्त करणे. यामुळे शहरातील लोकसंख्या काही प्रमाणात कमी होईल व खेडयांचा विकास होईल, यामुळे दरडोई उत्पन्न व यातूनच रा. उत्पन्न यात वाढ होवून देशातील विषमता कमी होण्यास मदत होईल.

कवी व कलावंत याप्रमाणे शिक्षकही जन्मावा लागतो. परंतु तसा जन्म घेणारे शिक्षक कमी होऊ लागले तर उलट 'मागता येत नाही भीक तर मास्तरकी शिक'

या म्हणीप्रमाणे जन्म घेणाऱ्या शिक्षकांची संख्या कमी झाली आहे. हल्लीचे शिक्षक आपल्या भूमिकेकडे पहाताना वर्गात विद्यार्थ्याला शिकविणे, अभ्यासक्रम पूर्ण करुन त्याची परीक्षेसाठी तयारी करुन घेणे, एवढ्याच उद्देशाने शिकवताना दिसतात. ही शिक्षण पद्धती बदलून विद्यार्थ्याचे व्यक्तीमत्व घडवण्याची, त्यांच्या आचार-विचारामध्ये परिवर्तन घडवून आणणारी, नागरीकत्वाचे व जीवनमुल्यांचे संस्कार करणारी व प्रगतीपर दृष्टीकोन बिंबवणारी शिक्षण पद्धती अमलात आणावी.

' शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् । ' शरीर स्वास्थ्य चांगले असेल तरच जीवनानंद घेता येईल. अन्यथा काही नाही. सुदृढ शरीरातच चांगला आत्मा निवास करतो. याचा अर्थ मानवाचे शरीर बळकट असावे. ज्या देशाची जनता निरोगी तोच देश भरभराट करु शकतो, हे आपण जपान, द. कोरीया या देशांवरुन समजू शकतो. कोणत्याही ऑलिंपिक सामन्यात अनेक देश सुवर्ण रौप्य, पदके मिळवीत असतात. परंतू आपला देश मात्र हॉकी, क्रिकेट यांच्या पलीकडे जावू शकत नाही. एखादी पी. टी. उषा निर्माण होते. पण बाकी सगळा अंधारच. पूर्वेची ही सुजलाम्, सुफलाम् धरणी, सोन्याचा धूर काढणारी- निद्रीस्त झाली आहे. आणि याला कारण गर्दसारखी नशा होणारे तरुण. खरी संस्कृती नष्ट होत आहे. देशप्रेम लयाला जात आहे. याला कारण एकच. शारिरीक शिक्षणाकडे दुर्लक्ष, सर्व शाळांमधून मिलीटरी शिक्षण आवश्यक आहे. डॉ. हेडगेवारांनी सुद्धा हाच संदेश दिला की खेळातून संघशक्ती करा. शारिरीक शिक्षणाचा खरा प्रसार शाळातूनच व्हायला हवा.

खेळ हा दुय्यम विषय म्हणून दुर्लक्षिला जातो. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने खेळाचा तास चांगला असला तरी शिक्षकांच्या, पालकांच्या दृष्टीने तो तास वेळ घालविण्याचा असतो. हा विचार बदलण्यासाठी पालकांचे उद्‌बोधन व्हायला हवे.
शारिरीक शिक्षण शिकवण्यासाठी शिक्षक, प्राध्यापक तयार होतील तेव्हा पदव्यूत्तर शिक्षणात शारिरीक शिक्षणाचा अंतर्भाव केलेला असेल. शारिरीक शिक्षण हा विषय घेवून विश्व विद्यालयात पीएच्. डी. मिळवता आली पाहिजे. तंत्रशिक्षणासाठी किंवा शेती शिक्षणासाठी वेगळी विश्वविद्यालये आहेत, त्याचप्रमाणे प्रत्येक राज्यात किमान २-३ संकुले निर्माण झाली पाहीजेत. सध्याच्या पुस्तकी ज्ञानावरुन प्रात्यक्षिक ज्ञानाकडे विद्यार्थ्यांना वळवले पाहिजे.

स्वातंत्र्य मिळून आम्हाला ४२ वर्षे झाली तरी आम्ही वैचारीक पारतंत्र्यातच आहोत. शिक्षणाच्या बाबतीत विचार करता आपली शिक्षणपध्दती भारतीय रुप धारण करु शकली नाही. राष्ट्रीय शिक्षण आम्ही खऱ्या अर्थाने निर्माण करु शकलो नाही. महात्मा गांधींची मूलोद्योग पध्दती, टागोरांची गुरुकूल पद्धती, या अस्सल भारतीय पध्दती आम्ही राष्ट्रीय पातळीवर स्विकारु शकलो नाही हेच आमचे दुर्दैव. आमच्या शिक्षणात मातृभाषा आणि राष्ट्रभाषा यांची अक्षम्य उपेक्षा होत आहे व इंग्रजीचे स्तोम वाढत आहे. आपला मुलगा इंग्रजी माध्यमात शिकतो याचा पालकाला अभिमान वाटतो. आपल्या मुलाला संस्कृत काय कळणार ? त्याला इंग्लीश छान कळत यातच ते धन्यता मानतात त्यामुळे इंग्रजी माध्यमातील मुले ' आम्ही कुणीतरी मोठे' या अर्थाने मराठी माध्यमातील मुलाकडे पाहू लागतात इंग्रजी शिक्षण घेणे, त्यात धन्यता मानणे, याचा अर्थ हाच की या देशाने भावी नागरीक आपली राष्ट्रीय व सांस्कृतिक अस्मिता पार हरवून बसणार आहेत. शैक्षणिक कार्यकर्त्यांनी याचा गंभीरपणे विचार करायला हवा.

मराठी विषयाप्रमाणेच आता संस्कृत भाषेकडेही पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. संस्कृतचे महत्व फारच कमी झाल्याने हल्लीची मुले पूर्वीची संस्कृत पुस्तके वाचू शकत नाही. आपल्या पूर्वजांनी लिहीलेले ज्ञान हे पुस्तकातच रहाणार आहे. पूर्वी तयार केलेले एकाहून एक सुंदर श्लोक नष्ट होणार आहेत. संस्कृत ही सर्व भाषांची जननी आहे, असे म्हणतात. पण हल्लीचा एकंदरीत काळ बघताच ' इंग्रजी ही सर्व भाषांची जननी आहे, ' असे दुर्दैवाने म्हणावे लागते. ही परिस्थिती बदलण्यासाठी शाळा - कॉलेजमधून संस्कृत शिक्षणाचा प्रसार व्हावा. दहावी

पर्यंत संस्कृत शिक्षण सक्तीच व्हाव. शिक्षणाने प्रश्न संपले पाहिजेत. सध्याच्या शिक्षणाने प्रश्न निर्माण होत आहेत. आता डिग्री घेवून बाहेर पडलेला विद्यार्थी 'आता काय करायच ?' या विचारात असतो. डिग्री मिळेपर्यंत त्या मुलाला आपला भारत काय आहे हे माहीत नसते. त्याच्या सीमा तो फक्त नकाशातच पाहू शकतो. त्याचा एखादा भागही पाहू शकत नाही. हा प्रश्न सुटण्यासाठी डिग्री मिळेपर्यंत त्या मुलाने संपूर्ण भारत, किमान त्यातील थोडे भाग पाहून त्याचा संपूर्ण अभ्यास केला पाहिजे. आपल्या कॉलेजची ट्रीप एखादे प्रेक्षणीय स्थळ पाहून येते पण एखाद्या प्रसिद्धीला न आलेल्या भागाबद्दल आपण अज्ञात असतो.

राष्ट्रीय एकात्मता साधताना पंजाबमधील लोकांनी महाराष्ट्रातील लोकांशी प्रेमाने वागले पाहिजे परस्परात प्रेमसंबंध निर्माण झाले पाहिजेत असे तोंडाने बोलून उपयोग नाही तर इथल्या काही मूलांना वर्षातून १५ दिवस तिकडे पाठवून त्या प्रदेशाचा भूप्रदेश, लोकांचे राहणीमान, तेथील अर्थव्यवस्था, शिक्षणपध्दती, आचार विचार याचा अभ्यास केला पाहिजे. ही सोय संस्थेतर्फे किंवा सरकारतर्फे करुन तो शिक्षणाचा भाग केला पाहिजे. या गोष्टीमुळे राष्ट्रीय एकात्मता साधली जाईल.

अशातऱ्हेने देशातील बेकारी कमी करायची असेल, राष्ट्रीय एकात्मता साधायची असेल, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करायची असेल, तंत्रज्ञानाचा विकास करायचा असेल तर शिक्षणात योग्य फेरबदल केले पाहिजेत. त्याद्वारे आपणाला आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि शारिरीक विकास घडवून आणता येईल.

★★★

---

# 'आव्हान' चे आवाहन

स्मिता सोमण
अकरावी वाणिज्य

'नारीला समजून अबला
छळ आजवरी जो झाला'

हे शीर्षकगीत ऐकलं की वाटतं काहितरी वेगळं असेल. आठवली ना ती दूरदर्शन मालिका ? आपण सर्वजण तद्रूप होऊन ती पहात होतो. आपणच काय पण स्त्रियासुद्धा घरातील सर्व कामे पटापट ओटोपून ती पहायच्या.

या मालिकेमुळे स्त्रियांना दिलासा मिळाला. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फुटली म्हणून समाधान वाटलं असेल. मालिका बघताना नायिकेचे सासूकडून व नवऱ्याकडून होणारे हाल पाहून त्या मनात हळहळल्या असतील, कदाचित डोळ्यातून अश्रुही आले असतील. आज सर्वत्र हेच चालले आहे. आपण सुशिक्षीत मुलींचे बळी जातात हे वाचतो, ऐकतो. आपण म्हणू या सुशिक्षीत मुली हे सारं सहन का करतात ? त्यांचा नाईलाज असतो. त्या आपण सुखी होण्यासाठी आई–वडिलांना दुःखी करु शकत नाहींत. कारण स्त्रीचे हृदय हे जुईच्या फुलाप्रमाणे नाजूक, कोमल असते. आपल्या जन्मदात्या

मातापित्यांना कष्ट होऊ नयेत म्हणून त्या सारं-सारं सहन करतात. अगदी असह्य झालं तर मातापित्यांकडे न जाता देवाकडे जातात, बिचाऱ्या प्राणाला मुकतात. आज खेड्यात जवळ जवळ सर्वत्रच हे चित्र दिसून येतं. एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीचा छळ करते. शहरातसुद्धा हेच चित्र दिसून येतं. स्त्रीचा शारिरीक नाही पण मानसिक छळ होत असतोच. खरोखरच ही मालिका समाजाच्या या ज्वलंत प्रश्नाला 'आव्हान' ठरली आहे.(?)

'आव्हान' हे शीर्षक मालिकेच्या दृष्टीने जरी योग्य असले तरी आपण त्याचा सारासार विचार केला तर काही विसंगत गोष्टी जाणवतात. 'श्री' (कथानकातला नायक) ची पहिली बायको मेली. मेली कसली? जीवच दिला हो! या निर्दयी 'श्री' ने दुसरं लग्न केले. दुसरी बायको वीणा. हिचाही सासू व नवऱ्याने छळ केला. तिला हे सारं सहन झालं नाही. तिने आत्महत्या केली. आत्महत्या नव्हे, खूनच म्हणा हवंतर. या सासू व नवऱ्याने तिचा खून केला. पण . . . पण या नीच, हव्यासी, पैशाला हपापलेल्या श्रीची लग्नाची हाव सुटली नव्हती. अजून किती जणींचा बळी जायचा कोण जाणे ?

'श्री' ने 'उमाशी' तिसरं लग्न केलं. या उमाने शेजाऱ्यांच्या मदतीने सारा इतिहास जाणून घेऊन सासू व नवऱ्याला धूर्त, कावेबाजपणे धडा शिकवायला सुरवात केली. 'श्री' तिला मारत असताना उमाने 'श्री' चा हात धरला. आणि इथूनच त्यांच्यातील संघर्षाला सुरवात झाली. तिने मारुन घेतलं नाही. आज देशात अशाच बायका निर्माण व्हायला हव्यात. का म्हणून छळ सहन करायचा त्यांनी? आजपर्यंत पुरुष समजत आले की स्त्री ही अबला आहे. पण नाही! स्त्री आता अबला राहिली नाही, ती सबला झाली आहे !

आपला मुलगा व बायको काय लायकीची आहेत हे माहीत असतानासुद्धा सासऱ्याने मुलाला तिसरे लग्न करायला दिले. या सासऱ्याला दुसऱ्या बळीनंतर सोबती संघटना मिळाली. तिथपर्यंत काय त्याचे डोळे उघडले नव्हते ? का मदत घेऊ शकला नाही तो सोबती संघटनेची ? स्वतःच्या दोन मुलींसारख्या सुनांचे बळी जातात आणि त्याने गप्प बसावं ? सोबती संघटना का मदत करु शकली नाही ? या खवीस, महाधूर्त सासूला अद्दल घडवायला दोन निष्पाप मुलींचे बळी गेले. अशा सासवांना अद्दल घडवायला जर प्रत्येकी २ बळी जात असतील तर हिशोब करायला हवा किती बळी जातील त्याचा ! किती निरपराध स्त्रिया प्राणाला मुकतील ? दिग्दर्शक आत्माराम भेंडे यांनी किती सहजपणे मारलं या दोघींना ! ते हाडामासाचे गोळे घडवायला काहीच श्रम पडले नसतील का त्यांच्या मातापित्यांना ? किती कष्ट सहन करुन शिकवलं, मोठ केलं असेल त्याना ! हेच जर त्यांनी दोघींचा बळी न देता पहिलीच सून धडा शिकवते असं दाखवलं असतं तर कथानकाला वेगळं वळण लागलं असत.

ह्या मालिका पहाणाऱ्यांमध्ये सासू व नवऱ्याकडून छळ होणाऱ्या स्त्रिया असतील तर त्यांनी काय बोध घ्यावा यातून ? असाच ना, की आपण मरणार, आपल्यानंतर अजून एक व नंतर तिसरीकडून सासू व नवऱ्याला अद्दल व छळाला पूर्णविराम ! मग ही आमची सोबती संघटना धावून येईल. आपली शास्त्रपुराणं म्हणतात–

'अहं भारती स्त्री स्वयं शक्तिरुपा !<br>
मयिश्चैता दुर्गा तथा शारदा<br>
त्यजेय कदाचित् नशीलाभिजानम्<br>
विरोद्धुं तु सिद्धाऽहम् अन्यायरुढो : ॥

★★★

# आघात ........

**मधुबाला गुणगेकर**
बारावी कला

यमुनाबाई आली तीचमुळी आज फार थकलेली दिसत होती. आता तिला कामे झेपत नव्हती. पण दोन चिमण्या जीवांसाठीच ती जगत होती. मुलगे मोठे झाले म्हणजे आपली परिस्थिती सुधारेल या आशेवरच ती जगत होती. दिवसभर कोणाच्यातरी शेतात राबून ती रोजी आणीत होती, आणि त्यावरच तीन पोटे भरत होती. नवरा वारला तरी मुलांसाठी तिने ते दुःख गिळले होते. धाकट्या अनिलला सांभाळण्यासाठी श्रीधरला तिने शाळेचे तोंड दाखवले नव्हते. पण अनिलला भरपूर शिकवण्याची स्वप्ने तिने रंगवली होती. त्याप्रमाणे अनिल सहा वर्षाचा झाल्यावर तिने त्याचे नाव वाडीवरच्याच शाळेत दाखल केले. अनिल आपल्या तेजबुद्धीने वर्षाविर्षाला पास होऊन पुढच्या वर्गात जात होता. आता तो सातवी इयत्ता शिकत होता. अनिल शाळेतून आला तोच त्याने आपल्या आईकडे सहलीला जाण्याचा हट्ट धरला. सहलीला न जाण्याची सूचना आईने केली, आणि त्याची फार समजूत घातली. पण अनिल काही केल्या ऐकेना. यमुनाबाईने आत्तापर्यंत मुलांना आपल्यापासून कधी दूर ठेवले नव्हते. म्हणूनच ती त्याला सहलीला पाठवत नव्हती. श्रीधरचे बंधुप्रेम जागे झाले. आणि त्याने आईला अनिलला पैसे देण्यास सांगितले. आईने सहलीला जाण्याची परवानगी दिल्यावर आनंदित झालेल्या अनिलने श्रीधरला पटकन मिठीच मारली. भात्राभावातील माया पाहून यमुनाबाईला अत्यानंद झाला. भावाभावातील प्रेम असेच राहू दे म्हणून तिने देवाकडे प्रार्थना केली. गप्पागोष्टीत जेवण झाल्यावर सकाळी लवकर उठण्याच्या विचाराने सर्वांनी झोपण्याचे ठरविले. अनिलने आपली सर्व तयारी आत्ताच करुन ठेवली होती. दोन मुलांना दोन कुशीत घेऊन यमुनाबाई पडल्यापडल्या झोपी गेल्या.

कोंबडा आरवला तशी यमुनाबाईला जाग आली. तिने दिवा पेटवला आणि ती न्हाणीघरात गेली. इतक्यात श्रीधरला जाग आली. पण अनिल अजून झोपेतच होता. श्रीधर न्हाणीघरात गेला आणि पाणी तापवण्याची जबाबदारी स्वतः घेऊन आईला झोपण्याची सूचना केली त्रासलेली यमुनाबाई आपल्या अंथरुणावर जाऊन झोपली. थोड्याचवेळाने श्रीधरने अनिलला जाग आणली आणि तो आपल्या कामाला गेला. अनिल उठला तोच न्हाणीघरात जाऊन जाळ करुन पाणी तापवत राहिला. पाणी लवकर तापावे म्हणून तो सरपण सारीत राहिला. आग भडकली 'आग! आग!' म्हणून त्याने श्रीधरला हाक मारली श्रीधर धावत आला. आगीने छपराला स्पर्श केला. गवताचे घराने क्षणार्धात पेट घेतला. पहाटेच्या वाऱ्याने साथ दिल्यावर आगीने रौद्र रुप धारण केले आगीने घराला चहूबाजूनी घेरले. सर्वांचे प्रयत्न असफल झाले आणि संपूर्ण घर आगीच्या घशात गेले. यमुनाबाईचे नाव कानावर पडताच दोघे भाऊ समोरील गर्दीत आपल्या आईचा शोध घेऊ लागले. पण त्यांना त्यांची आई कुठेच दिसली नाही. आई ! आई! करुन त्यांनी टाहो फोडला पण आईचा आवाज त्यांच्या कानावर पडेना. गर्दीतल्या लोकांनी त्यांना समजावण्याचा खूप प्रयत्न केला. सूर्य डोंगरमाथ्यावरुन डोकावून पहात होता. त्याच प्रकाशात कोणाचेतरी लक्ष समोरील काळ्या ढिगाकडे गेले. तो ढीग म्हणजे यमुनाबाईचा देह होता. आईचा देह पाहिल्यावर

दोघा भावांनी हंबरडा फोडला. त्यांनी आपल्या आईला मिठी मारली. समोरील दृश्य पाहून प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले होते. प्रत्येकजण हळहळत होता. सगळीकडे कशी शांतता पसरली होती पण दोन जीवांच्या विरहाने ती भंग पावत होती.

सगळ्या लोकांनी समजूत घातल्यावर श्रीधरने सर्व दुःख गिळून आईचे सर्व संस्कार पुरे केले. श्रीधरवर मोठी जबाबदारी पडली. पण भावासाठी त्याला ते करावेच लागणार होते. अनिलसाठी वाट्टेल ते कष्ट करण्याची तयारी त्याने आपल्या मनाशी केली होती. आईच्या मायेने तो अनिलला सांभाळीत होता. भावाबरोबर दुसऱ्यांच्या ओसरीत राहून अनिल आपले शिक्षण करीत होता. मधूनमधून तो भावाला कामात मदत करीत होता. अनिल भरपूर शिकला पाहिजे, त्याने ऊंची किमतीचे कपडे घालावेत असे श्रीधरला मनोमन वाटत होते. त्याने आपले विचार अनिलला बोलून दाखवले. दिवसामागून दिवस सरत होते. श्रीधर गावात मोलमजुरी करुन दोन पोटे भरत होता.

नेहमी लवकर उठणारा आपला भाऊ सूर्याची किरणे घरात डोकावू लागली तरी अजून का ऊठला नाही, म्हणून अनिलने त्याला ऊठवले. त्याच्या हाताला चटका लागला. श्रीधरचे सर्व अंग तापाने गरम झाले होते. अनिलने डॉक्टरांकडून औषध आणले. तो आपल्या भावाची शुश्रुषा करु लागला. पण आजार कमी होईना. आठ–दहा दिवस झाले. श्रीधरला दवाखान्यात हलवले. डॉक्टरांनी परीक्षा केली व आपले उपाय चालू केले तो मुदतीचा ताप होता. अनिल घाबरला, त्यातच घरातील पैसाअडका दाणागोटा संपला होता. डॉक्टरांनी उपाय चालू ठेवले होते. श्रीधरच्या तब्येतीत सुधारणा होत होती. डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला देऊन श्रीधरला घरी पाठवले. घरातील परिस्थितीचा व अनिलच्या परीक्षेचा विचार करुन श्रीधरने चार पाच दिवस विश्रांती घेऊन कामावर जाण्यास सुरुवात केली.

सातवीची परीक्षा पास झाल्यावर गावातील माणसांच्या सांगण्यावरुन अनिलला श्रीधरने मुंबईला पाठवले. त्याला रोजगार पण मिळाला. पहिल्याच पगारातील निम्मे पैसे त्याने भावाला पाठवले. श्रीधरला थोडा धीर आला. त्याने पैसे जमा करुन एक साधेसे घर बांधले आजुबाजुला अनिलच्या आवडीची झाडं लावली. अनिलच्या व स्वतःच्या विचाराने त्याने घर सुशोभित केले. सर्वकाही एका विचाराने चालले होते. अनिलच्या खुशालीचे पत्र यायला एक दोन दिवस उशीर झाला तर श्रीधर घाबरायचा. मग काय, भावाच्या खुशालीसाठी या ज्योतीषाकडे जा, त्या भगताकडे जा, असे करुन मनाची समजूत घालायचा. खुशालीचे पत्र आल्यावर नाचायचा आणि पत्र जीवापाड जपायचा. या पत्रात तर अनिलने आपण मे महिन्यात गावी येणार असे लिहीले होते. त्याच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. अनिल केंव्हा येईल व त्याला आपण कधी भेटू असे श्रीधरला झाले होते. त्याला आता कामाचा त्रास वाटत नव्हता. तो आणखी जोमाने कामाला लागला होता. तो अनिलच्या आवडीच्या खाद्य वस्तू जमा करु लागला.

'श्रीधरभाऊ तुमची तार आहे.' असे म्हणून पोस्टमनने श्रीधरच्या हातात तार दिली. तार पाहिल्यावर श्रीधरला घाम सुटला. त्याचे सर्व शरीर थरथरु लागले. त्याला काहीच सुचेना. अनिल आधी ठरल्यापेक्षा लवकर येत असेल, अशी मनाची समजूत करुन हातात तार घेऊन तो तसाच धावत गावातील शेलार मास्तरांकडे गेला. मास्तरनी तार वाचली. थोडावेळ थांबून मास्तर म्हणाले, "श्रीधर तुला आज ना उद्या मुंबईला जायला हवे." ते ऐकून श्रीधर आणखीनच घाबरला. तो जड पावलांनी घरी आला, त्याने ताबडतोब मुंबईला जाण्याची तयारी केली. अनिलला आवडणाऱ्या सर्व वस्तू एका पिशवीत कोंबल्या. दोरीवरचे आपले १–२ कपडे ओढून पिशवीत भरले. मुख्य दरवाजाला कुलूप लावून तो निघाला. धावत पळत जाऊन त्याने गाडी पकडली. गाडीने वेग घेतला. त्याचे विचारचक्र चालू झाले मुंबईच्या धकाधकीच्या जीवनात भावाला

एकटे ठेवण्यापेक्षा त्याला आपल्याबरोबर गावी घेऊन यावे. त्याला गावीच एखादी लहानशी नोकरी पाहून गावीच एकत्र रहावे, असा विचार करीत तो बाहेर पाहात प्रवास करीत होता. प्रवासात रात्रभर अशाच प्रकारचे विचार त्याच्या मनात येत होते. मध्येच केंव्हातरी बाजूच्या प्रवाशाला किती वाजले ? असे खुणेनें विचारीत होता. पहाटेचे चार वाजले व गाडी स्टँडवर थांबली. आपली पिशवी घेऊन धावत धावत त्याने रिक्षा केली. थोड्याच वेळात रिक्षा अनिलच्या खोलीसमोर थांबली. श्रीधर उतरला. खिशातली पाच रुपयाची नोट रिक्षाचालकाच्या हातात कोंबून तो भरभर पायऱ्या चढून दरवाजात उभा राहिला. दरवाजावर थाप मारणार तोच त्याचे लक्ष दरवाजाच्या कुलपाकडे गेले. लगेच बाजूच्या दरवाजावर थाप मारुन 'वसंतमामा !' अशी हाक मारली. दार उघडून वसंतमामांनी चेहऱ्यावर उसने हसू आणून श्रीधरचे स्वागत केले. इकडील तिकडील खुशाली विचारुन त्यांनी श्रीधरला आंघोळ करायला सांगितले. आंघोळ केल्यावर त्याला चहा वगैरे दिल्यावर अनिलचा अपघात कसा झाला, त्याला मार किती लागला, हे सांगून ते श्रीधरला हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले. हॉस्पिटलमधील अनिलची स्थिती पाहून धावत जाऊन त्याने अनिलला मिठी मारली. त्याने आपल्याकडे पहावे म्हणून विनंती करु लागला. पण अनिल बोलत नाही की डोळे उघडून पहात नाही हे पाहिल्यावर त्याने हंबरडा फोडला व क्षणार्धात तो जमिनीवर कोसळला.

★★★

## पण का... ?

तुमची मुलगीच होती ती
'सून' म्हणून घरात आणलेली
तुम्ही जाळलेत तिला
पण का ?

तुम्हाला संपत्तीच हवी होती ना ?
तुमची बहीणच होती ती
'वहिनी' म्हणून घरात आणलेली
तुम्ही जाळलेत तिला
पण का ?

तुम्हाला श्रीमंतीच हवी होती ना ?
तुझी प्रेमळ व्यक्ती होती ती
'पत्नी' म्हणून घरात आणलेली
तू जाळलेस तिला
पण का ?

तुला ऐश्वर्यच हवे होते ना ?
मग हे का ?
संपत्ती, श्रीमंती, ऐश्वर्य
हे सारे त्या निष्पाप देहाला
जाळून मिळाले का ?

मधुबाला मुणगेकर
बारावी कला

## न्याय

अपराध कुणाचा
शिक्षा कुणाला
लाच-लुचपत भ्रष्टाचारी
सदा वाढली भारी
होईल कसा न्याय ?......

काळ्या कोटाच्या खिशात
इभ्रत त्यांची सारी दडली
होई सत्याचा नाश
खोटाचे होई खरे
गरीबांवर वळती पाश

असहाय्य होऊनी रडती बिचारे
ही शान होती त्या ......
काळ्या कोटावाल्यांची
जगात नाही राहिला
सत्याचा कुणी वाली

बनवून न्याय देवता सदा आंधळी
न्याय खरा कधी मिळेल का ?

संतोष कोयंडे
अकरावी कला

## श्रावण आला

श्रावण आला आला
रंग रुपे ही घेऊन आला,
बागा आल्या बहरोनी
चाफ्यांच्या फुलांनी

असा हा आला श्रावण
आनंदाचे घेऊनी सण,

वारुळाला जाऊन
करु नागाचे पूजन,

श्रावणातील एक रात
मंगळागौरीच्या झिम्मा फुगडीत,

राखी बांधुया आपण
बंधू प्रेमाची ती खूण.

आला श्रीकृष्ण जन्माचा सोहळा
गर्जुया आपण गोविंदा गोपाळा,

श्रावण आला आला
सप्त रंग उधळोनी गेला.

राजेश आंबेरकर
बारावी वाणिज्य

## कशासाठी... ?

कशासाठी ? वीतभर पोटासाठी
कोण कुणावर हल्ला करतो,
कोण कुणाची घरे फोडतो,
खून करुनी शिक्षा भोगतो,
कशासाठी ? वीतभर ......

कोण कुणाकडे 'लाच' मागतो,
कोण कुणाला 'लाच' देतो,
गरीब बिचारा गल्ली फिरतो,
कशासाठी ? वीतभर ......

कोण भगवी वस्त्रे नेसुनी,
साधुंची नक्कल करतो,
अपकीर्तीचा कळस होतो,
तरी माताने जगतो,
कशासाठी ? वीतभर ......

कोण कुणाला वचने देतो,
कोण कुणाची वचने मोडतो,
शिव्या शापही ओढवूनी घेतो,
कशासाठी ? वीतभर ......

कोण कुणाची स्तुती करतो,
कोण कुणाचा मत्सर करतो,
कशासाठी ? वीतभर......

अशोक मसुरकर
अकरावी वाणिज्य

# मुंबयचो झिलगो

भाद्रपद जसो जवळ इलो ।
तसो गावचांका उत इलो ।
सगळा कसा झाक करुक लागलो ।
गाव जसो नयो नयो दिसाक लागलो ।

गनपतिक चाकरमानी गावाक धावलो ।
मागारणीचो घरवालो गावाक धावलो ।
घरवालो इलो म्हणान मागारीण चकळाक लागली ।
बापूस इलो म्हणान पोरगी चकळाक लागली ।

मुंबईचो अडाणी झिलगो गावाक येवूक लागलो ।
झ्याक–पाक कपडे घालून मिथून दिसाक लागलो ।
चिकनो पोरगो म्हणान पोरी बघूक लागलो ।
सगळा जसा नया नया दैकवूक लागलो ।

ह्यचो–त्यचो गनपती बघूक जावक लागलो ।
गनपतीच्या निमतान चाय–लाडू खावक लागलो ।
येळ जात नाय म्हणान आरतेक जावक लागलो
दोन चार बंडला मारुन येळ घालवूक लागलो

वडाखाली बसान पोरींच्यो कळी काढूक लागलो ।
येळ जात नाय म्हणान इडयो फुकाक लागलो ।
सगळा संपला तसा उपाशी ऱ्हवाक लागलो ।
लोकांका समजात म्हणान मुंबयक चलत ऱ्हवलो ।

**गणेश राणे**
अकरावी वाणिज्य

# ते फूल

सगळ्यांनाच पडावी भूल
असं होतं ते फूल ,
होता इतका प्रचंड थाट
की दिसू नये पुढची वाट.

कुणासही नसता कल्पना
फूल गेले कोमेजून,
आमच्या मात्र फुकट वल्गना
फूल हासत असेल अजून.

**प्रमोद कोयंडे**
बारावी वाणिज्य

## मृगदिन

मेघ दाटले आकाशी
पक्षी जमले घरट्यांपाशी
होई आनंद सर्वांशी ॥ १ ॥

जशी पडे पावसाची सर
तसा सुटे मातीला सुगंध
त्यात खोंड होई धुंद ॥ २ ॥

ओली चींब होई माती
अंकुर डोकावून पाहती
गुरे चरावया जाती ॥ ३ ॥

रौद्र रुप धारण करुनी
वाहती नद्या नाले
खेळ खेळती पाखरे त्या वेलीवर ॥ ४ ॥

गडगडा वाजे मेघांचा ढोल,
मोर फुलवी पिसांचा डौल
सृष्टी का न होई भूल ? ॥ ५ ॥

सत्यवान घाडी
बारावी कला

## निसर्गलीला

आले आले आक्रमण आले
जणू गजदळच दौडत आले
सारा नूरच पालटून गेला
क्षणात दाटले घोर तम.

निसर्गाने मांडीला भीषण खेळ
तरुंचे तांडवनृत्य सुरू जाहले
विजांनी तर आकांत मांडीला
सारी सृष्टीच थरथरु लागली.

क्षणात आले टपोरे थेंब
धरणीची तृषा क्षमवू लागले
सारी धरणी हिरवी जाहली
आनंदाची लाट पसरु लागली.

विद्याधर जोशी
अकरावी विज्ञान

# "The Place of English in India Today."

*Daya Khadilkar*
XII Commerce

There are two extreme views about the place of English in India. At one end, people possessed by national sentiment have always wanted to get rid of the English language from their country. 'Angrezi Hatao' (down with English) is their favourite slogan which reflects their attitude towards English. A feeling of this kind of hatred towards the foreign language i. e. English dates back to pre-Independence days. According to Taraporewala (1931:520) 'the political struggle in India during the last half century has had its repercussions in the linguistic field as well. In a sense this political struggle has brought about a linguistic awakening as well. Side by side with the growing pride in the past of our land there has come also a pride in our vernaculars. Recent years have seen a renaissance of every literary vernacular of India. The present generation of students have been taking as much pride in their knowledge of the mother-tongue as their fathers did in their mastery of English. There is a distinct movement in every centre of education to give to the mother tongue its rightful place in the life and education of the people.'

There is another trend-some people think that English should be 'The sole medium of education.' Some of our educational thinkers, however, are silent about the place of English in our educational set-up. There is confusion and lack of consensus about the medium of instruction for teaching some of our subjects in the curriculum. The recent decision of the Government of Maharashtra to teach Science and Mathematics through the English medium is an example not only of a lack of consensus but of inconsistency. The educationists fear that the student learning through the medium of their mother-tongue would find it difficult to pursue their studies in their subjects at the higher levels. Again, English being 'a world language' offers opportunities at the international level to communicate with the people of other countries.

Whatever the extreme views of the people towards English, we are not concerned with them here. Let us be clear about some of the terminologies that are used while describing the status of a particular

language in a particular country. Terms like ' First ' language, ' second ' language, ' third ' language and ' Foreign ' language are used while describing the place of a foreign language in the educational set-up of a country. These terms have an aura of a particular meaning around them. Here the two sets of terms $L^1$, $L^2$ and $L^3$ and ' first ' language, ' second ' language and ' third ' language are used synonymously.

Let us follow V. V. Yardi as far as the explanation of these terms is concerned. According to Yardi ( 1977:5 ) ' conventional abbreviations like $L^1$= mother tongue/ regional language, $L^2$= Hindi/ Second Indian language, $L^3$= English and ' Foreign ' language = French, German, Russian, Spanish, etc., are used. Yardi further states that the terms first language, second language and third language are often used to indicate chronology of learning languages. (However , We may use (these) terms to indicate the relative dominance of languages in the life of a speech community. '(Yardi 1977 : 4 ) Any language as a ' second ' language refers to a situation where it is used widely for the purpose of administration and as a common link language, and as a ' foreign ' language it refers to a situation where it is taught for certain specific purposes viz-reading scientific works, translation, communication at certain levels and for certain purposes only.

At present, we can say that the hey day of English in India is now over. Hindi will replace English in course of time. The Government of India is also cautiously making efforts in this direction. However, English is retained as a medium of instruction in the faculties of law, medicine, engineering, technology, agriculture and the like. The Indian railways and some of the other departments have started using Hindi in place of English on a large scale. The opposition to Hindi in the South is not so severe as compared to their reactions witnessed previously. It has been weakening over the years. Under the new pattern of education English has been accorded the place of a third language in a majority of the states and Union Territories of India that have implemented this pattern. In Maharashtra, to cite an example, which has implemented this pattern, Marathi, the regional language, is now L1, Hindi, the Union language, is L2 and English, the associate link language, is L3. This is the general pattern for most pupils studying in Marathi-Medium schools which greatly outnumber Hindi and English medium schools. The terms L1, L2 and L3 and 'foreign' language have been used here to indicate the relative dominance of

languages in the life of a speech community. English is now a third language in the sense that the range of uses to which it is put in the life of the community, by and large is now restricted. In India, English is a compulsory third language and this element of compulsion makes it off from other foreign languages which are taught optionally.

